

मासिक वार्तापत्र • अंक ५ • डिसेंबर २०१६ • सहयोग राशी - रु. ५ • १६ पाने

# कामगार बिगुल

नव्या समाजवादी क्रांतीचा उद्घोषक

भांडवलशाही आणि आजारी आरोग्यसेवा ५

राष्ट्रीय स्वयंसेवक संघ आणि देशाचा स्वातंत्र्यलढा १३

गरीबांच्या तोंडचा घास पळवून फुगतोय मालकांचा नफा १५

## महान ऑक्टोबर क्रांतीच्या शताब्दी वर्षाची सुरुवात

# ऑक्टोबर क्रांतीच्या स्मृतींतून प्रेरणा घ्या!

# नव्या शतकाच्या नव्या समाजवादी क्रांतीची तयारी करा!!

**संपादक मंडळ**

गेल्या ७ नोव्हेंबर रोजी महान ऑक्टोबर क्रांतीला ९९ वर्षे पूर्ण झाली आणि तिचे शताब्दी वर्ष सुरु झाले. जगभरातील कष्टकऱ्यांसाठी ही अत्यंत महत्त्वपूर्ण घटना आहे. हे वर्षभर जगभरातील क्रांतिकारी कामगार आणि कम्युनिस्ट संघटना ऑक्टोबर क्रांतीच्या गौरवशाली वारशाचे स्मरण करतील तसेच भविष्यातील संघर्षासाठी संकल्प करतील. कामगार वर्गाच्या ऐतिहासिक विजयाचा हा उत्सव आहे.

जगभरात भांडवली व्यवस्था संकटात सापडलेली असताना आपण ऑक्टोबर क्रांतीच्या शताब्दी वर्षात पदार्पण करीत आहोत. गेल्या ८ वर्षांपासून भांडवली व्यवस्थेला विळखा घालून बसलेली मंदी ओसरता ओसरत नाहीय. संकटातून बाहेर पडण्याचे दावे दर वर्षी कार्पोरेट घराण्यांचे बोरूबहाद्दर अर्थशास्त्रज्ञ आणि बुद्धिजीवी करीत आहेत. परंतु अति उत्पादन आणि भांडवलाच्या अति संचयाच्या संकटातून बाहेर पडण्याऐवजी भांडवली व्यवस्थेचा पाय खोलातच जात आहे. या संकटाचे ओझे कष्टकरी जनतेच्या पाठीवर लादण्याचे काम जगभरातील सत्ताधारी करीत आहेत. म्हणूनच नफ्याची आंधळी हाव आणि जुगारातून झटपट नफा कमावण्याच्या शर्यतीने जे संकट निर्माण केले आहे, त्याचे ओझे सरकारी खर्चातील कपात (म्हणजेच शिक्षण, आरोग्य, शेती, खाद्यान्न आणि इतर मूलभूत वस्तूंच्या दरातील वाढ), कामगार कपात, तालाबंदीतून होणारी बेरोजगारी आणि महागाईच्या रूपात कामगार वर्गाच्या खांद्यावर टाकले जात आहे. त्यामुळे जगाच्या वेगवेगळ्या भागांमध्ये कष्टकरी जनता रस्त्यावर उतरते आहे. कित्येक देशांमध्ये लोकविद्रोहसुद्धा भडकले. अरब देशांमध्ये गेल्या काही वर्षांत काही मोठे लोकविद्रोह झाले. ट्यूनिशिया आणि इजिप्तमध्ये या विद्रोहांनी अलोकप्रिय सत्ताधाऱ्यांना सत्तेवरुन खाली खेचले. इजिप्तमध्ये मुस्लिम ब्रदरहूडच्या धार्मिक कट्टरतावादी सत्तेलाही लोकविद्रोहाने उलथून टाकले. परंतु तिच्या जागी आलेली हुकूमशाहीसुद्धा सामान्य कष्टकरी जनतेचे दमन करणारीच ठरली. म्हणूनच इजिप्त आजही धुमसते आहे. संकटातून स्वतःची सुटका करून घेण्यासाठी साम्राज्यवादी अमेरिका आणि युरोप जगभरात, आणि प्रामुख्याने मध्य-पूर्व आणि युक्रेनमध्ये युद्धे भडकवीत आहेत. भारतीय भांडवलदार वर्गसुद्धा संकटामुळे वाढलेली बेरोजगारी, गरीबी आणि महागाई यांच्यापासून कष्टकरी जनतेचे लक्ष विचलित करण्यासाठी युद्धाचा उन्माद पेटवण्यापासून धार्मिक तणाव आणि जातीय झगडे पसरवण्यापर्यंत वेगवेगळे डावपेच खेळतो आहे. आर्थिक संकटाच्या या काळात जगातील वेगवेगळ्या देशांमध्ये फासीवादी शक्ती बळकट होत आहेत. कित्येक ठिकाणी त्यांनी सत्ता हस्तगतही केली आहे. कित्येक देशांमध्ये प्रतिक्रियावादी, उजवे आणि कामगारविरोधी पक्ष किंवा नेते सत्तेचे सोपान चढत आहेत. अमेरिका आणि युरोपमध्ये वंशवादाला खतपाणी घालून कामगार वर्गामध्ये फूट पाडण्याचे प्रयत्न होत आहेत. प्रवासी कामगारांच्या विरोधात गोऱ्या कामगारांना भडकवले जात आहे. गोऱ्या जनतेमध्येच वर्ग अंतर्विरोध वाढत आहेत, हे यामागचे खरे कारण आहे. भारतातही कामगार वर्गामध्ये जाट आणि बिगर जाट, पटेल-पाटीदार आणि बिगर पटेल पाटीदार तसेच मराठा आणि बिगर मराठा अशी फूट पाडण्याची आणि आरक्षणाच्या प्रश्नावरुन त्यांच्यामध्ये झगडे लावून देण्याची कारस्थाने शिजत आहेत. या सर्व कारस्थानांवरून हेच दिसून येत आहे की भांडवलदार शासक वर्ग आर्थिक संकटामुळे राजकीय संकटाच्या भोवऱ्यातही अडकला आहे. अमेरिकेतील डोनाल्ड ट्रंप यांची निवडसुद्धा हेच सुचवीत आहे. परंतु ही कारस्थाने जगाच्या कानाकोपऱ्यात कामगार वर्गाला स्वतःच्या हक्कांसाठी रस्त्यावर उतरण्यापासून अडवू शकलेली नाहीत. ग्रीस, इटली, पोर्तुगाल आणि स्पेनसारखे दक्षिण युरोपमधील अनेक देशसुद्धा आज कामगार आणि तरुणांच्या व्यवस्थाविरोधी आंदोलनांच्या कचाट्यात सापडले आहेत. आपल्या देशातसुद्धा होंडाच्या कामगारांपासून

पान १० वर

## भांडवलशहांचे कारस्थान ओळखा
## शासक वर्गाद्वारे कष्टकऱ्यांच्या जातीय मोर्चेबांधणीचा विरोध करा

कोपर्डीत एका मराठा मुलीवर बलात्कार आणि हत्येनंतर महाराष्ट्रभरात शासक वर्गाने मराठा समुदायाला मूक मोर्चे काढण्यासाठी फूस लावली. नाशिकसह ठिकठिकाणी नवबौद्धांवर हल्ले झाले. श्रीमंत मराठा वर्ग आणि राजकारण्यांनी या घटनेचा वापर कष्टकरी जनतेमध्ये जातीच्या पायावर उभी फूट पाडण्यासाठी केला. सध्या महाराष्ट्रातील वाढती बेरोजगारी, शेतीचे संकट, गरीबी आणि महागाईच्या विरोधात लोकांमध्ये धुमसत असलेल्या असंतोषाला जातिगत मोर्चेबांधणीचे रूप दिले जात आहे. याला प्रत्युत्तर म्हणून दलित आणि नवबौद्धांच्या नावाने अस्मितावादी राजकारण करणाऱ्यांनी "बहुजन" मोर्चे काढण्यास सुरुवात केली आहे. यामुळे सामान्य कष्टकरी जनतेच्या क्रोधाची कुऱ्हाड परस्परांवर कोसळू लागली आहे. या असंतोषामागचे खरे कारण आहे वाढती बेरोजगारी आणि शेतीचे संकट. याला जबाबदार असणारा भांडवलदार वर्ग आणि एकूण भांडवली व्यवस्था मात्र नामानिराळी राहते आहे. शासक वर्गाचे हे कारस्थान समजून घेण्यासाठी महाराष्ट्रातील सामाजिक आर्थिक परिस्थितीवरुन एकदा नजर फिरवावी लागेल.

**महाराष्ट्रातील सामान्य कष्टकरी जनतेची अवस्था**

रोजगार विनिमय केंद्रानुसार २०१३ मध्ये महाराष्ट्रातील बेरोजगारीचे प्रमाण ४-५ टक्क्यावर पोहोचले होते. या आकड्यांतून फक्त रोजगार विनिमय केंद्रात नोंदणी झालेल्या बेरोजगारांची संख्या तेवढी कळते, व बहुतेक बेरोजगार या कार्यालयांमध्ये नोंदणी करतच नाहीत. म्हणूनच हे आकडे पूर्ण सत्य सांगतात असे म्हणता येणार नाही. २००८ मध्ये फक्त ४५.९ टक्के लोकांपाशी नियमित वेतन असणारा रोजगार होता. २०१२ मध्ये दर १००० माणसांमागे ३२ माणसे बेरोजगार होती. हे सर्व आकडे दोन वर्षांपूर्वीचे वा त्याआधीचे आहेत. महाराष्ट्रात बेरोजगारी गेल्या दोन वर्षांमध्ये झपाट्याने वाढली आहे. शेतीचे संकट गेल्या दोन दशकांमध्ये भयंकर वेगाने वाढले आहे. सरकारच्या नवउदारवादी धोरणांमुळे लहान आणि मध्यम शेतकरी उद्ध्वस्त होत आहेत. भूमिहीन मजुरांच्या संख्येत - ज्यांपैकी निम्म्याहून अधिक लोकसंख्या नवबौद्ध व दलित मजुरांची आहे - मोठी भर पडली आहे. ही जनता गावांमध्ये अत्यंत भयंकर परिस्थितीत जगते आहे. सहकारी संस्थांचेसुद्धा वेगाने पतन झाले आहे. नवबौद्ध, दलित आणि आदिवास्यांसह बहुसंख्य मराठा समुदाय आज शेतीच्या संकटाचे, वाढत्या बेरोजगारीचे आणि महागाईचे तडाखे खातो आहे.

**मराठा समुदायाची अवस्था - पाच प्रमुख वर्ग आणि त्यांची अवस्था**

मराठा समुदाय महाराष्ट्राच्या एकूण लोकसंख्येच्या ३३ टक्के आहे. या मराठा जनतेपैकी २०० अतिधनाढ्य मराठा कुटुंबांचे आज प्रदेशातील जवळपास सर्व प्रमुख आर्थिक संसाधनांवर आणि राजकीय सत्तेच्या केंद्रांवर वर्चस्व आहे. थेट सत्तेच्या केंद्रांवर पकड ठेवणारा हा वर्ग मराठ्यांमध्ये सर्वांत वरच्या स्थानी आहे. यामध्ये नेते, मंत्री (जे बऱ्याचदा स्वतः मोठे भांडवलदारसुद्धा असतात), वेगवेगळ्या आयोगांचे अध्यक्ष, तमाम सहकारी पतपेढ्यांचे बोर्ड मेंबर, सहकारी साखर कारखान्यांचे बोर्ड मेंबर, जिल्हा परिषदांच्या सदस्यांपासून ग्राम पंचायत प्रमुखांचा समावेश होतो. यांच्या खालोखाल मराठा

पान ४ वर

## राष्ट्रीय स्वयंसेवक संघ आणि देशाचा स्वातंत्र्यलढा

पान १३ वरून

भासली नाही. मुसलमानांना देशाचे शत्रू ठरवून त्यांच्याविरोधात शस्त्रे अवश्य वापरावीत, परंतु स्वयंसेवकांनी इंग्रजांच्या विरोधात शस्त्रास्त्रांचा वापर करून नसती आफत ओढवून घेऊ नये, याबद्दल संघाचे सरसंघचालक डॉ. केशव बळिराम हेडगेवार किती दक्ष होते, हे हुद्दारांच्या उदाहरणावरून दिसून येते. 'सुक्याबरोबर ओलेही जळते', या म्हणीनुसार प्रत्यक्षात कोणत्याही प्रकारच्या इंग्रजविरोधी कारवायांमध्ये न गुंतलेल्या संघटनांवरसुद्धा ज्यावेळी इंग्रज सरकार बंदी घालत होते, त्या काळातही संघावर बंदी येणार नाही, असा सार्थ विश्वास डॉ. हेडगेवारांना वाटत होता तो उगाच नाही. इंग्रजांनी संघाचे स्वरूप पूर्णपणे ओळखले होते. म्हणूनच संघाच्या स्वामीनिष्ठेवर इंग्रजांचा पूर्ण विश्वास होता. संघाबद्दल ब्रिटीश कागदपत्रांमध्ये पुढची नोंद सापडते, भविष्यात संघ भारतासाठी तीच भूमिका बजावू इच्छितो, जी जर्मनीमध्ये नाझींची आणि इटलीमध्ये फासिस्टांची आहे.

संघाला देशरक्षणाबद्दल असलेली ॲलर्जी अगदी संघाच्या पहिल्या प्रार्थनेतही प्रतिबिंबित झाली आहे. संघाच्या पहिल्या प्रार्थनेत एक मराठी आणि एक हिंदी श्लोक होता. पैकी हिंदी श्लोक आर्यसमाजात रुढ असणाऱ्या प्रार्थनेत काही बदल करून स्वीकारलेला होता. आर्यसमाजाच्या प्रार्थनेचा मूळ पाठ असाः

हे प्रभो, आनंददाता ग्यान हमको दीजिये
शीघ्र सारे दुर्गुणोंको दूर हमसे कीजिये
लीजिये हमको शरणमें हम सदाचारी बने
ब्रह्मचारी देशरक्षक वीर व्रतधारी बने

यात बदल करून संघाने स्वीकारलेली प्रार्थना पुढीलप्रमाणेः

हे गुरो, श्रीरामदुता शील हमको दीजिये
शीघ्र सारे सद्गुणोंसे पूर्ण हिंदू कीजिये
लीजिये हमको शरणमें रामपंथी हम बने
ब्रम्हचारी धर्मरक्षक वीरव्रतधारी बने? [३]

यात केलेले बदल पाहाण्यासारखे आहेत. पूर्ण हिंदू करण्याची रामापाशी केलेली याचना, रामपंथी बनण्याची इच्छा हे तर आहेच, परंतु देशरक्षक होण्याबद्दलची संघाची अनिच्छा इतकी टोकाची होती व धर्मासमोर देशाला इतके दुय्यम स्थान होते की मूळ प्रार्थनेच्या शेवटच्या ओळीत असलेला देशरक्षक हा शब्द काढून धर्मरक्षक हा शब्द घालायला संघाचे नेतृत्त्व विसरले नाही.

स्वातंत्र्यलढ्यात भरीव योगदान देणाऱ्या सर्वच देशभक्तांशी संघ आज आपला संबंध जोडत आहे. खोटा इतिहास पसरवला जात आहे. मात्र देशासाठी लढता लढता आयुष्य उद्ध्वस्त करून घेणाऱ्या देशभक्तांबद्दल संघाने आपल्या लिखाणातून, व्याख्यानांतून व्यक्त केलेली मते मात्र संघाच्या स्वातंत्र्य चळवळीतील संघाच्या भूमिकेशी अगदी सुसंगत अशीच आहेत. स्वयंसेवकांना मार्गदर्शन करताना संघाचे दुसरे सरसंघचालक गोळवलकर गुरूजी म्हणतात, "इंग्रजांबद्दल असलेल्या रागामुळे अनेकांनी अद्भुत पराक्रम गाजवला. आपणसुद्धा तसे करावे असा विचार आपल्या मनातही एखादेवेळी येऊ शकतो. परंतु त्यामुळे संपूर्ण राष्ट्राचे हित साध्य होणार आहे का, याचा विचार केला पाहिजे. बलिदान केल्यामुळे उभ्या समाजात राष्ट्राच्या हितासाठी सर्वस्व अर्पण करण्याची तेजस्वी भावना निर्माण होत नाही. हृदयतील हा अंगार सर्वसाधारण लोकांना असह्य वाटतो, असा आजपर्यंतचा अनुभव आहे."[१] देशभक्तांचा मार्ग सर्वसाधारण लोकांना असह्य वाटतो, एवढाच संघाचा आक्षेप नाही, तर या देशभक्तांबद्दल संघाला वाटणारा आकस इतका टोकाचा आहे की त्या देशभक्तांचा अधिकाधिक अपमान करणे, हे संघाला आपले कर्तव्य वाटते, असे त्यांच्या विचारांवरून तरी दिसते. 'डा. हेडगेवार क्रांतदर्शी युगपुरुष' या पुस्तिकेचे लेखक वि. ना. नेने देशभक्तांबद्दलची डॉ. हेडगेवारांची भूमिका स्पष्ट करताना म्हणतात, "ब्रिटीशविरोधी भावना हीच त्या चळवळींमागची प्रमुख प्रेरणा असे. राष्ट्राच्या स्वातंत्र्यासंबंधी, स्वराज्यासंबंधी विधायक दृष्टी वा धारणा असल्याचे कोठेही आढळत नसे? सत्याग्रह करणाऱ्या बहुतेकांना लहानमोठ्या शिक्षा होत. अशा प्रकारे सत्याग्रह करून, तुरुंगवास भोगून आलेल्या लोकांना आपण देशभक्तीचे काही विशेष कार्य केले आहे, असे वाटे. ओघानेच, आपण इतर जनांपेक्षा श्रेष्ठ आहोत, पुढारी आहोत, इतरांनी आपला जयजयकार करावा, अनुयायी म्हणून आपला पडता बोल झेलावा अशी भावना त्यांच्यात बळावू लागली. देशभक्तांचा असा एक निराळा वर्गच तयार होऊ लागला."[२] भगतसिंह, राजगुरू, सुखदेव यांच्यासारख्या देशासाठी प्राणांची आहुती देणाऱ्या देशभक्तांचा आदर्श तर तरुणांनी घेऊच नये, असा संघाचा आग्रह आहे. स्वयंसेवकांना याविषयी सावध करताना गोळवलकर म्हणतात, "आपली भारतीय संस्कृती सोडून इतर सगळ्या संस्कृतींनी अशा प्रकारच्या बलिदानांची पूजा केली आहे व त्यांना आदर्श मानले आहे, व अशा बलिदान करणाऱ्यांना राष्ट्रनायक म्हणून स्वीकारले आहे. परंतु आपण आपल्या भारतीय परंपरेत अशा प्रकारच्या बलिदानाला सर्वोच्च आदर्श मानलेले नाही."[१] या देशभक्तांना आदर्श मानू नये, एवढेच सांगून गोळवलकर थांबत नाहीत तर यापुढे जाऊन ते म्हणतात, "जे जीवन अपयशी ठरले आहे त्यात नक्कीच एखादी फार मोठी उणीव असली पाहिजे. जो स्वतः पराजित झाला आहे तो इतरांना कसा काय प्रकाश देऊ शकतो, आणि त्यांना यशाच्या दिशेने कसे काय घेऊन जाऊ शकतो? हवेच्या प्रत्येक झुळूकेसरशी कंपित होणारी ज्योत आपला मार्ग कसा प्रकाशित करू शकेल?"[१] बलिदान करणारे देशभक्त हे संघाच्या दृष्टीने अपयशी नायक आहेत, आणि ब्रिटीशांची माफी मागून पुन्हा कोणत्याही प्रकारची इंग्रजविरोधी कारवाई न करण्याचे वचन देऊन स्वतःची कैदेतून सुटका करून घेणारे सावरकर हे स्वातंत्र्यवीर आहेत. देशाला स्वातंत्र्य मिळवून देण्यासाठी जीवन पणाला लावणाऱ्या थोर देशभक्तांचा असा अपमान साम्राज्यवादी ब्रिटीशांनीसुद्धा कधी केलेला नाही.

राष्ट्रीय स्वयंसेवक संघ आज देशभक्ती आणि राष्ट्रप्रेमाचा ठेकेदार बनला आहे. जनतेला अंधारात ठेवण्यासाठी, खऱ्या मुद्द्यांपासून जनतेला विन्मुख करण्यासाठी राष्ट्रवादाचा अफूच्या गोळीसारखा वापर केला जात आहे. धनदांडग्यांची आणि भांडवलदारांची चाकरी करण्याचे कार्य चोख बजावण्याच्या योजनेत संघाने राष्ट्रभक्ती हा एक बाजारू माल बनवला आहे. पतंजलीची उत्पादने खरेदी करेल, तोच खरा राष्ट्रभक्त या रामदेव बाबांच्या घोषणेत या बाजारू राष्ट्रप्रेमाचा सर्वात घृणास्पद आविष्कार आपण नुकताच पाहिला. निरनिराळ्या भांडवली प्रसारमाध्यमांतून चालणाऱ्या मोहक-अलंकारिक प्रचाराच्या आत दडलेले विषारी सत्य ओळखण्यासाठी, जनतेला दारिद्र्यात ढकलणारे, जनतेत फूट पाडणारे संघाचे राजकारण हाणून पाडण्यासाठी संघाचा इतिहास लोकांसमोर येणे गरजेचे आहे. आज संघाने राष्ट्रप्रेमाच्या कितीही बाता मारल्या तरी त्यांचा खरा काळाकुट्ट भूतकाळ इतिहासाने संघाच्याच साहित्यातून जपून ठेवला आहे. हाफ पँट सोडून फूल पँट वापरली म्हणून राष्ट्रीय स्वयंसेवक संघाला आपला नंगेपणा झाकता येणार नाही.

**'कामगार बिगुल' ची वेबसाइट**

**www.marathi.mazdoorbigul.net**

**फेसबुक पेज**

**www.facebook.com/kamgarbigul**

सहकाऱ्यांनो

'कामगार बिगुल' आपले स्वतःचे वृत्तपत्र आहे. हे वृत्तपत्र अधिक चांगले बनवण्यासाठी आपल्या सूचनांचे आम्ही स्वागत करतो. त्याच बरोबर आपण जर देशभरातील कामगारांपर्यंत आपल्या कारखान्यातील, ऑफिस मधील परिस्थिती, मालक वर्गाकडून केली जाणारी लुट, संसदीय राजकीय पक्षांचा श्रीमंत धार्जिणेपणा, पोलिस व मालकांच्या खाजगी गुंडांकडून केले जाणारे अत्याचार, तुमच्या रहिवासी वस्त्यांमधील खराब परिस्थिती, शिक्षण, आरोग्य यांसारख्या सुविधांचा अभाव इत्यादी विषयी आपली मतं पोहचवू इच्छित असाल तर आम्हाला आपले लेख किंवा प्रतिक्रिया पाठवू शकता. आपण आम्हाला खालील पत्त्यावर पत्र पाठवू शकता किंवा फोन करून सुद्धा संपर्क साधू शकता.

- रूम नंबर १०३, बिल्डिंग नंबर ६१, लल्लुभाई कम्पाउण्ड, मानखुर्द (वेस्ट) मुंबई ४०००४३ मो. नं. ९७६४५९४०५७, ९६१९०३९७९३
- सोमनाथ, दिपनगर, केडगाव, अहमदनगर ४१४००५ मो. नं. ९१५६३२३९७६, ९६५७५९०४९१

### 'कामगार बिगुल'चे स्वरूप, उद्देश आणि जबाबदाऱ्या

**1. 'कामगार बिगुल' व्यापक कष्टकरी जनतेमध्ये क्रांतिकारी राजकीय शिक्षक व प्रचारकाची भूमिका पार पाडेल. हे वृत्तपत्र कामगारांमध्ये क्रांतिकारी वैज्ञानिक विचारधारेचा प्रचार करेल आणि खऱ्याखुऱ्या सर्वहारा संस्कृतीचा वाहक बनेल. हे वृत्तपत्र जगभरातील क्रांतींचा इतिहास आणि त्यांच्यातून घ्यावयाचे शिक्षण, आपल्या देशातील वर्ग संघर्ष, कामगार चळवळीचा इतिहास आणि त्यातून घ्यावयाचे धडे यांच्याशी कामगार वर्गाला परिचित करेल. त्याच बरोबर समस्त भांडवली अफवा-दुष्प्रचारांचा भांडाफोड करेल.**

**2. 'कामगार बिगुल' भारतीय क्रांतीचे स्वरूप, मार्ग आणि समस्यांविषयी क्रांतिकारी कम्युनिस्टांमध्ये चालणाऱ्या विविध चर्चा नियमित रुपात छापेल आणि देश-विदेशातील राजकीय घटना आणि आर्थिक परिस्थितीचे योग्य विश्लेषण मांडून कामगार वर्गाला शिक्षित करण्याचे काम करेल.**

**3. 'कामगार बिगुल' स्वतः अश्या चर्चा चालवेल जेणे करून कामगारांचे राजकीय शिक्षण होईल. तसेच त्यांच्यामध्ये योग्य लाइनची समज विकसित होऊन ते क्रांतिकारी पार्टी बनवण्याच्या प्रक्रियेमध्ये सहभागी होऊ शकतील आणि त्यातून व्यवहारामध्ये योग्य लाइनच्या सत्यापनाचा आधार तयार होऊ शकेल.**

**4. 'कामगार बिगुल' कामगार वर्गामध्ये राजकीय प्रचार आणि शिक्षणाचे कार्य चालवत सर्वहारा क्रांतीच्या ऐतिहासिक जबाबदारीशी त्याला परिचित करेल, त्याला आर्थिक संघर्षांसोबतच त्याच्या राजकीय अधिकारांसाठी लढायला शिकवेल, चार आणे-आठ आण्याच्या किरकोळ आर्थिक लढायांमध्ये कामगारांना अडकावून टाकणाऱ्या नकली कम्युनिस्टांपासून आणि भांडवली राजकीय पक्षांचे शेपूट असलेल्या किंवा व्यक्तिवादी-अराजकतावादी ट्रेड युनियन्स पासून सावध करत त्याला हरतऱ्हेच्या अर्थवाद व सुधारवादाविरुद्ध लढायला शिकवेल, त्याच बरोबर त्याच्यात सच्ची क्रांतिकारी चेतना निर्माण करेल. 'कामगार बिगुल' सर्वहारा वर्गाच्या फळ्यांमधून क्रांतीकारकांची भरती करण्याच्या कामात सहाय्यक बनेल.**

**5. 'कामगार बिगुल' हे वृत्तपत्र कामगार वर्गाचा क्रांतिकारी शिक्षक, प्रचारक आणि आवाहनकर्ता ह्या भूमिकांबरोबरच क्रांतिकारी संघटनकर्ता व आंदोलनकर्त्याची भूमिका सुद्धा पार पाडेल.**


# कामगार बिगुल

खाजगी वितरणासाठी

संपादक मंडळ : नारायण खराडे, सत्यनारायण

संपादकीय कार्यालय : रुम नंबर १०३, बिल्डिंग नंबर ६१, लल्लुभाई कम्पाउण्ड, मानखुर्द (वेस्ट) मुंबई ४०००४३

संपर्क : ९७६४५९४०५७, ९६१९०३९७९३

ईमेल : bigulakhbar@gmail.com

सहयोग राशी : रु. ५ (एका अंकासाठी)
वार्षिक - रु. १०० (टपाल शुल्कासह)




**बुर्झ्वा वृत्तपत्रे भांडवलाच्या विशाल ढिगांच्या बळावर चालतात, कामगारांची वृत्तपत्रे स्वत: कामगारांनी गोळा केलेल्या पैशावर चालतात.**

**लेनिन**

# नोटाबंदीविरोधात बिगुल मजदूर दस्ताची जनजागृती मोहीम

काळ्या पैशावर सर्जिकल स्ट्राइकच्या नावाखाली मोदी सरकारने नोटाबंदी जाहीर केली आणि देशातील कष्टकरी जनतेची अभूतपूर्व अशी होरपळ सुरू झाली. कित्येक माणसांचे बँकेच्या रांगेत राहून जीव जात असताना सरकार देशवासीयांना देशभक्तीची शपथ देत राहिले, आणि काही अपवाद वगळता भाडोत्री प्रसारमाध्यमे लोकांवर कोसळलेल्या संकटाला वाचा फोडण्याऐवजी धादांत खोट्या बातम्यांसह लोकांना भ्रामक स्वप्ने दाखवून भुलवण्याच्या कामाला लागली. चित्रपटांपासून उद्योग आणि क्रीडाक्षेत्रातील, सामान्य माणसाच्या दुःखांची कसलीच जाणीव नसलेल्या धनाढ्य ख्यातनाम व्यक्तिमत्वांनी देशभक्तीच्या नावाखाली आपल्या सरकारभक्तीचे प्रदर्शन मांडण्यात कसलीच कसूर बाकी ठेवली नाही आणि सुखवस्तू अडाणी मध्यमवर्गालासुद्धा कॅशलेस इकानामीची स्वप्ने पडू लागली. अशा वेळी लोकांच्या मनातील असंतोषाला वाचा फोडण्यासाठी तसेच सरकारच्या या निर्णयाचे खरे स्वरूप लोकांसमोर ठेवण्यासाठी बिगुल मजदूर दस्ता, नौजवान भारत सभा या संघटनांनी देशाच्या वेगवेगळ्या भागांमध्ये सरकारविरोधी जनजागृती मोहीम सुरू केली. **मुंबई, अहमदनगर, दिल्ली, चण्डीगढ़, लुधियाना, पटना, सिरसा, कैथल, लखनऊ, गोरखपुर, इलाहाबाद, गाजियाबाद इत्यादी ठिकाणी लाखो पत्रके वितरित करण्यात आली, तसेच सरकारच्या निर्णयाच्या विरोधात निदर्शने करण्यात आली.**

सरकारच्या या निर्णयामागचे खरे अर्थकारण आणि राजकारण लोकांसमोर उघडे करण्यासाठी या मोहीमेदरम्यान हजारो पत्रके वाटण्यात आली तसेच ठिकठिकाणी कोपरा सभा घेऊन कार्यतर्त्यांनी लोकांसमोर आपले म्हणणे मांडले. २०१४ च्या निवडणुकीपूर्वी सत्तेत आल्यावर विदेशातील काळा पैसा परत आणून प्रत्येक नागरिकाच्या खात्यात प्रत्येकी १५ लाख रुपये जमा करण्याच्या वल्गना करणाऱ्या नरेंद्र मोदी सरकारने अपेक्षेनुसार सत्ता हाती येताच मोठ्या भांडवलदारांची उत्तम प्रकारे सरबराई करण्यास सुरुवात केलेली असून ही नोटाबंदी म्हणजे त्याचाच एक भाग आहे. पनामा पेपर फुटल्यानंतर त्यात नावे असलेल्यांवर कारवाई करण्याऐवजी ते प्रकरण सरकारने हुशारीने दाबले. विदेशात काळा पैसा गुंतवलेल्यांची नावेसुद्धा जाहीर करण्याचे धैर्य सरकारने दाखवले नाही. महागाई कमी करण्यात, रोजगाराच्या संधी उपलब्ध करून देण्यात सरकार सपशेल अपयशी ठरले. दुसरीकडे दोन वर्षांत देशातील वरच्या एक टक्के लोकांच्या हातात केंद्रित झालेला एकूण संपत्तीचा वाटा ५१ टक्क्यावरून ५८ टक्क्यावर पोचला. सामान्य माणसाला मात्र सरकार चांगल्या दिवसांची वाट बघण्याचा सल्ला देत राहिले व शेवटी नोटाबंदी करून सरकारने सामान्य माणसाच्याच खिशावर दरोडा घातला. देशातील सत्तर टक्के काळा पैसा विदेशात आहे, देशात असलेल्या काळ्या पैशापैकी फक्त ६ टक्के भाग रोख रकमेमध्ये म्हणजे नोटांच्या रूपात आहे. उर्वरित ९४ टक्के वेगवेगळ्या माध्यमांमध्ये गुंतवलेला आहे. असे असताना ५०० आणि १००० च्या नोटा बंद करून काय साध्य होणार? पुन्हा २००० ची नोट काढून यापुढे काळ्या पैशाचा व्यवहार सरकारने अधिक सुलभ करून दिलेला आहे. या निर्णयाबाबत किती गुप्तता पाळण्यात आली होती याबद्दल सरकारने कितीही अतिशयोक्तीपूर्ण दावे केले तरी आप्तस्वकियांना तो अगोदर कळवण्यात आला होता व त्यांना आपल्याकडच्या भरमसाठ पैशाची योग्य ती सोय करण्याची पूर्ण संधी देण्यात आलेली होती, हे अनेकानेक उदाहरणांवरून दिसून आलेले आहे. उलट या निर्णयानंतर ५०० आणि १००० च्या नोटांचा जणू बाजार सुरू झाला आणि २० टक्के कमिशनवर नोटा विकल्या जाऊ लागल्या. सामान्य माणसाला सबुरीचा आणि देशभक्तीचा उपदेश करीत असताना दुसरीकडे सरकार काळा पैसाधारकांच्या सोयीसाठी वेगवेगळ्या योजना राबवू लागले. वास्तविक कर्जबुडव्या उद्योगपतींना नवीन कर्जे देण्यासाठी बँकांकडे रोख रक्कमेचा अभाव होता, तो दूर करण्यासाठी लोकांच्या खिशातील पैसा सक्तीने बँकांकडे वळवण्यासाठीच सरकारने हे पाऊल उचलले आहे, व सामान्य माणसे बँकेसमोर, उपचाराअभावी, उपासमारीमुळे जीव गमावत असताना अदानीसारख्या उद्योगपतींना नवीन कर्जांचे वाटपही सुरू झाले आहे, हे वास्तव बिगुलच्या कार्यकर्त्यांनी लोकांसमोर मांडले.




दि.२२ नोव्हेंबर रोजी मानखुर्द मुंबई येथे सरकारच्या या निर्णयाचा निषेध म्हणून मोर्चा काढून पंतप्रधान नरेंद्र मोदींचा पुतळा जाळण्यात आला. तसेच सध्याच्या परिस्थितीत सामान्य माणसाला औषधोपचार, अन्नधान्य यांसारख्या मूलभूत गरजा पूर्ण करण्यातही अडथळे येत असल्यामुळे खास उपाययोजना करण्याची मागणी स्थानिक आमदार यांच्याकडे निवेदनाद्वारे करण्यात आली.

# गरीबांच्या तोंडचा घास पळवून फुगतोय मालकांचा नफा?.

पान १५ वरून

आपल्या दैनिक शारीरिक पोषणाच्या गरजेपेक्षा कमी भोजन मिळालेले आहे. या अहवालानुसार भारतातील गरिबांच्या भोजनात फक्त कसेबसे जिवंत ठेवू शकतील अशाच पदार्थांचा समावेश आहे कारण खाद्य पदार्थांच्या वाढत्या किंमतींमुळे गरीब जनता पोषक अन्न खरेदी करू शकत नाही.

या परिस्थितीचे कारण काय? आताच १५ सप्टेंबर रोजी प्रकाशित झालेल्या कोर्न फेरी हे ग्रुपच्या २००८ च्या आर्थिक संकटापासून आतापर्यंत ५१ देशांच्या रोजगार आणि वेतनाच्या तुलनात्मक अभ्यासानुसार या ८ वर्षांमध्ये भारताची जीडीपी ६३.८ टक्क्यांनी वाढली आहे परंतु सरासरी वेतनातील वाढ फक्त ०.२ टक्के इतकीच आहे. या बाबतीतसुद्धा अधिक खोलात जाऊन पाहिल्यास वरच्या पदांवरील उच्च प्रबंधकांचा पगार ३० टक्के वाढला आहे परंतु सर्वात तळाशी असलेल्या कामगारांचा वास्तविक पगार ३० टक्के कमी झाला आहे. सर्व ५१ देशांपैकी उच्चतम आणि निम्नतम स्तरावरील कर्मचाऱ्यांच्या वेतनातील विषमता सर्वात जास्त भारतातच आहे कारण येथे रोजगारांमध्ये वाढ कमी झाली आहे आणि श्रमिकांचा पुरवठा जास्त आहे. तसेही आता नियमित वेतनावर स्थायी कामगार ठेवण्याऐवजी त्यांच्याहून तीन चतुर्थांश मजुरी असणाऱ्या अस्थायी कामगारांची संख्या वाढते आहे.

खुद्द सरकारी लेबर ब्युरोचे सर्वे या तथ्याची पुष्टता करतात. रोजगार देणाऱ्या ८ प्रमुख उद्योगांच्या लेबर ब्युरो सर्वेच्या मागच्या अहवालानुसार गेल्या ८ वर्षांमध्ये सर्वात कमी रोजगार म्हणजेच १ लाख ३५ हजार रोजगार २०१५ मध्ये निर्माण झाले. आता एप्रिल जून २०१६ च्या लेबर ब्युरोच्या सर्वेच्या अहवालानुसार आता रोजगार वाढण्याऐवजी कमी होत आहेत. या तिमाहीत ०.४३ टक्के रोजगार कमी झाले आहेत. आटोमोबाइलमध्ये १८ टक्के, अलंकार-आभूषणांमध्ये १६ टक्के, हँडलूम पावरलूममध्ये १२ टक्के तसेच ट्रान्सपोर्टमध्ये ४ टक्के श्रमिकांच्या नोकऱ्या गेलेल्या आहेत. चार्मोद्योगात शून्य रोजगार वृद्धी आहे. अशाच प्रकारे सेंटर फार मानिटरिंग आफ इंडियन इकानामीच्या अहवालानुसार या वर्षी जानेवारीमध्ये बेरोजगारीचा दर ८.७२ टक्के होता, तो आगस्टमध्ये वाढून ९.८ टक्के इतका झाला.

त्यामुळेच २०११ -१२च्या उपभोक्ता खर्चाच्या नॅशनल सँपल सर्वेनुसार जर शहरात राहणारी कोणतीही व्यक्ती जर ६३८३ रुपये दरमहिना व ग्रामीण भागातील कोणतीही व्यक्ती जर २८८६ रुपये महिना खर्च उपभोगावर करण्याची क्षमता बाळगत असेल तर तो भारतातील ५ टक्के सर्वाधिक श्रीमंत लोकांमध्ये समाविष्ट आहे, म्हणजेच मुकेश अंबानी, रतन टाटा, गौतम अडानी, मूर्ती, प्रेमजी यांच्या रांगेत. आणि याच वर्षी संसदेत सादर झालेल्या आर्थिक सर्वेनुसार १७ राज्यांतील शेतकरी कुटुंबांची सरासरी वार्षीक उत्पन्न २०००० आहे, म्हणजेच दर महिना रुप. १६६६. त्यांतून मोठ्या शेतकऱ्यांना वगळले तर ही संख्या आणखी कमी होईल. आणखी एक तथ्य सामाजिक आर्थिक सर्वेक्षणातील, ज्यानुसार देशामध्ये २१ कोटी माणसे अशी आहेत, ज्यांच्यापाशी शून्य, होय, शून्य संसाधने आहेत. पैकी आठ कोटी आदिवासी आहेत. सायकल, रेडिओ किंवा मोबाइल वा टेलिफोनसारख्या मूल्यवान वस्तू किती लोकांपाशी आहेत त्याच्या आधारे ही गणना केली जाते. या गणनेत हे २१ कोटी लोक असे आहेत ज्यांच्याकडे यापैकी काहीच नाही.

उपरोक्त आकडेवारी हे दाखवण्यासाठी पुरेशी आहे की कार्पोरेट मिडियावर ज्याचा भरपूर प्रचार होत असतो अशा समावेशी विकास आणि त्याच्या ट्रिकल डाउन (थेंब थेंब झिरपण्यामुळे) देशातील गरीब श्रमिक अर्धश्रमिक निम्नमध्यमवर्गीय जनतेला किती लाभ मिळतो आहे. फायद्याच्या अगदी विरुद्ध वास्तविक या अर्थव्यवस्थेची ही सारी वृद्धी त्यांच्या तोंडातला घास हिसकावून भांडवलदार वर्गाच्या तिजोऱ्या भरण्यातून होते आहे. मग वाढती गरिबी, कुपोषण, रोगराई, आत्महत्या यात आश्चर्य कसले? बहुसंख्य समाजाच्या जीवनात सुधारणा न होता जीडीपी वाढणे म्हणजे आपल्या शरीरातील काही कोशिका अचानक वाढतात तेव्हा त्यातून शरीर बळकट होत नाही तर भयंकर वेदना होतात व कॅन्सर होतो, तसेच आहे. त्याचप्रकारे भांडवली व्यवस्थेत होणारी जीडीपीची वृद्धी म्हणजे समाजासाठी प्रगती नाही तर कॅन्सर बनली आहे. यावर लवकर उपचार केला नाही तर हे दुखणं वाढतच जाणार.

# शासक वर्गाद्वारे कष्टकऱ्यांच्या जातीय मोर्चेबांधणीचा विरोध करा

पान १ वरून

समुदायाचा दुसरा वर्ग आहे. श्रीमंत शेतकरी वर्ग किंवा नकदी पिके काढणारा ग्रामीण भागातील भांडवलदार वर्ग. या वर्गाची सत्ताकेंद्रांवर थेट पकड नसली तरी हा महाराष्ट्रातील एक प्रमुख दबावगट आहे. त्याचा धोरण निश्चितीवर प्रभाव असतो. त्यांच्या खालोखाल आहे मराठ्यांचा तिसरा वर्ग म्हणजेच मध्यम शेतकरी. हा वर्ग ना धड सुखी आहे, ना बर्बाद. ते अनिश्चिततेत जगत आहेत, आणि शेतीसाठी ते पाऊसपाण्यासारख्या नैसर्गिक घटकांवर व सरकारी धोरणांवर विसंबून असतात. श्रीमंत शेतकऱ्यांच्या जीवनशैलीचे अनुकरण करण्यासाठी त्यांची धडपड सुरू असते. परंतु ते शक्य होत नाही तेव्हा त्यांची चिडचिड होऊ लागते. ते सावकारांकडून आणि बँकांकडून थोडेफार कर्ज घेतात आणि जेव्हा कर्ज फेडणे मुश्कील बनते व सावकार- बँकांकडून तगादा सुरू होतो तेव्हा कित्येकदा आत्महत्येचा मार्गसुद्धा पत्करतात. मध्यम शेतकऱ्यांच्या या वर्गाचा खालचा हिस्सा वेगाने शेतमजुरांच्या पंक्तीत जाऊन बसतो आहे. यांच्या खालोखाल असलेला मराठ्यांचा चौथा वर्ग म्हणजे गरीब मराठा शेतकरी. ते फक्त शेतीतून उपजीविका प्राप्त करू शकत नाहीत, व त्यांचा बऱ्यापैकी हिस्सा मोठ्या शेतकऱ्यांच्या शेतावर मजुरीसुद्धा करतो. याची अवस्था जवळपास शेतमजुरांसारखीच आहे. ते आपल्या मुलांना उच्चशिक्षण देऊ शकत नाहीत. शहरी रोजगाराकरिता शहरांचे दरवाजे त्यांच्यासाठी बंद आहेत. त्यांच्यामध्ये शैक्षणिक आणि सांस्कृतिक मागासलेपण भरून राहिलेले दिसते. पाचवा वर्ग आहे सर्वाधिक गरीब मराठा सुमदायाचा म्हणजेच शेतमजुरांचा, जे दुसऱ्याच्या शेतातील मजुरीवर किंवा सरकारच्या रोजगार हमी योजनांवर विसंबून असतात. ते सर्वात भयंकर गरीबीचे जगणे जगत आहेत.

तात्पर्य, मराठा समुदायाचा वरचा १५ - २० टक्के हिस्सा प्रदेशातील सर्व आर्थिक संसाधनांवर आणि राजकीय शक्तीवर एकाधिकार करून बसला आहे. मराठा समुदायाचा ८० टक्के हिस्सा कामगार, निम्न मध्यम वर्ग, गरीब शेतकरी आणि शेतमजुरांनी बनलेला आहे. या ८० टक्के समुदायाचे जगणे काँग्रेस - एनसीपी सरकार आणि त्यानंतर भाजप शिवसेना सरकारच्या काळात दिवसेंदिवस बिकट होत गेले आहे. काँग्रेस एनसीपी सरकारच्या काळात हताश झालेल्या या मराठा समुदायाच्या एका मोठ्या हिश्शाने "अच्छे दिन" ची आस धरून भाजपाला मतदान केले होते. परंतु अच्छे दिन काही येईनात. उलट आणखी वाईट दिवस आले. गेल्या दोन वर्षांमध्ये देशभरात बेरोजगारांच्या संख्येत २ कोटींची भर पडली आहे. यातील मोठा हिस्सा महाराष्ट्रातील वाढते शेती संकट आणि बेलगाम बेरोजगारीमुळे वाढला आहे. संयुक्त राष्ट्राच्या नुकत्याच आलेल्या एका अहवालानुसार आता महाराष्ट्रातील बेरोजगारीचा दर गुजरात आणि उत्तर प्रदेशपेक्षाही जास्त झाला आहे. जीवन असुरक्षित आणि उपजीविका अनिश्चित झाल्यामुळे ८० टक्के सामान्य कष्टकरी मराठा समुदायामध्ये असंतोष आणि चीड वाढीस लागली आहे, व महाराष्ट्रातील सत्ताधाऱ्यांसाठी ही चिंतेची बाब आहे.

**वाढते वर्ग अंतर्विरोध दडपून टाकण्यासाठी जातिगत मोर्चेबांधणीचा आधार**

अशा परिस्थितीत मराठा शासक वर्गाने मराठा गरीब समुदायात खदखदणाऱ्या असंतोषाला चुकीच्या दिशेने वळवण्यासाठी वारंवार प्रयत्न केले आहेत. सामान्यपणे मराठा जनतेत जातीय पूर्वग्रह आणि ब्राह्मण्यवादी विचारधारेचा प्रभाव कायम असल्यामुळे त्यांच्या क्रोधाला जातीय रंग देण्यासाठी लागणारी जमीन तयार आहेच. या जातीय पूर्वग्रहांच्या आणि ब्राम्हण्यवादी विचारधारेच्या विरोधात एक अंखड लढा गरजेचा आहे. परंतु हा लढा अस्मितावादी राजकारणाच्या भूमीवर उभे राहून लढता येणार नाही, तर वर्गीय राजकारणाच्या भूमीवर उभे राहून लढावा लागेल, हे विसरून चालणार नाही. सवर्णवादी भांडवली राज्यसत्ता आणि गरीब कष्टकरी दलित समुदाय यांच्यामधला अंतर्विरोध हा शत्रूत्वपूर्ण अंतर्विरोध आहे. परंतु त्याचप्रमाणे कष्टकरी जनतेमध्ये असलेले जातीय पूर्वग्रह जर शत्रूत्वपूर्ण अंतर्विरोधांसारखे दूर करण्याचा प्रयत्न केला गेला तर ते आपल्याला अस्मितांच्या संघर्षाच्या दिशेने घेऊन जाईल आणि दोन्ही अस्मिता अधिक पक्क्या आणि मजबूत होतील. त्यातून अखेरीस व्यापक कामगार वर्ग आणि कष्टकरी जनता, जातीय समीकरणांचे राजकारण करणाऱ्या ब्राम्हण्यवादी शक्ती आणि त्याचबरोबर अस्मितावादी दलित राजकारण करणाऱ्या शक्तींच्या हातातील मोहरा बनेल. हे ब्राम्हण्यवादी शासक आणि आणि रामदास आठवलेसारखे अस्मितावादी दलित राजकारण करणारे शासक यांच्यामधील अंतर्विरोध शत्रुत्वपूर्ण नाहीत. दोघेही शासक जमातीतून येतात. हे खरे आहे की नेहमीप्रमाणे शासकांमध्येसुद्धा राजकीय सत्ता आणि संसाधनांच्या वाटपावरून तंटे होतच असतात. परंतु याचा अर्थ असा नाही की त्यांच्यातही जनतेसारखीच फूट पडलेली असते. बेरोजगारी, गरीबी, महागाई यांसारख्या समस्यांमुळे जनतेच्या वर्गएकतेची शक्यता निर्माण होताच या दोन्ही शक्ती आपला अस्मितावादी राजकारणाचा हुकमाचा एक्का फेकतात आणि जनतेमध्ये फूट पाडतात. शासक वर्गाची विचारसरणी हीच कुठल्याही युगातील वर्चस्वधारी विचारसरणी असल्यामुळे जनतेमध्येसुद्धा अस्मितावादी आणि ब्राम्हण्यवादी राजकारणाचा प्रभाव असतो आणि जातीय पूर्वग्रह सुद्धा असतात आणि ते शासक वर्गाला कष्टकरी जनतेमध्ये जातियवादी वैमनस्य निर्माण करून त्यांच्यात फूट पाडण्याची संधी देतात. सध्याच्या मराठा मोर्चांच्या पाठीशीसुद्धा हेच गतित्त्व काम करीत आहे. अशा परिस्थितीमध्ये याचीसुद्धा नोंद केली पाहिजे की नाशिकमध्ये दलितविरोधी हल्ले होत असताना काही ठिकाणी सामान्य मराठा जनतेने दलित कुटुंबांना संरक्षण देण्याचा प्रयत्न केला. या विखुरलेल्या उदाहरणातून असे दिसून येते की जर क्रांतिकारी शक्तींनी व्यापक कष्टकरी जनतेमध्ये असलेल्या जातीय पूर्वग्रहांच्या विरोधात वर्गीय भूमीवर उभे राहून खंबीरपणे विनातडजोड आणि दीर्घकालीन संघर्ष केला तर ब्राम्हण्यवादी विचारधारेच्या पंज्यावर प्रहार केला जाऊ शकतो. ही शक्यता निद्रिस्त अवस्थेत सामान्य जनतेत अस्तित्त्वात आहे. सचेतन क्रांतिकारी प्रचाराच्या अभावात ही शक्यता निद्रिस्त अवस्थेतच राहील. ते आपोआप होणे कठीण आहे.

कोपर्डीच्या घटनेनंतर मराठा शासक वर्गाला तणाव निर्माण करून जातीय मोर्चेबांधणी करण्याची एक नामी संधी मिळाली. कोपर्डीच्या घटनेचा कोणीही विरोधच करील आणि आरोपींना योग्य दंड देण्याचीच मागणी करील. तमाम नवबौद्ध आणि दलितांनी या घटनेचा निषेध करून दोषींना कडक शिक्षा देण्याची मागणीही केली. परंतु मराठा शासक वर्गाने या घटनेला आधार बनवून मराठा कष्टकरी जनतेच्या क्रोधाला दलित विरोधी दिशा देण्यात यश मिळवले. दुरुपयोग होत असल्यामुळे दलित अत्याचार विरोधी कायदाच भंग करण्याचा मुद्दा पुढे करण्यात आला, तसेच मराठा समुदायाला आरक्षण देण्याची मागणी शुरू झाली. बघता बघता कष्टकरी मराठा समुदायामध्येसुद्धा या जातीय अस्मितेच्या वणव्याने पेट घेतला आणि लाखोंच्या संख्येने मराठा मूक मोर्चांना सुरुवात झाली. हे मोर्चे गैर राजकीय असल्याचे सांगितले जात आहे, व या मोर्चांमध्ये मराठा क्रांती दल, संभाजी ब्रिगेड, मराठा स्वाभीमान सेना यासारख्या संघटनांनी वाटा घेतल्याचे वरकरणी दिसते आहे, परंतु यामागे एनसीपी, काँग्रेस, शिवसेना आणि भाजपच्या मराठा लॉबीचा हात आहे, हे अघड रहस्य आहे. म्हणूनच यांपैकी बऱ्याच पक्षांवर जेव्हा या मोर्चांना चिथावणी देण्याचा आरोप झाला, तेव्हा त्यांनी या आरोपांचे खंडनसुद्धा केले नाही.

वास्तविक, आज प्रदेशातील गरीब मराठा समुदायातील व्यवस्थाविरोधी क्रोध आणि मराठा शासक वर्गाशी असलेल्या त्यांच्या अंतर्विरोधांना दडपण्यासाठी त्यांच्यातील अस्मितावादाला खतपाणी घालून मराठा आरक्षण देण्याची व दलित उत्पीडन विरोधी कायदा रद्द करण्याची मागणी केली जात आहे. या मागण्यामध्ये कसलाच दम नाही. दलित अत्याचार विरोधी कायदा रद्द करण्याच्या मागणीचा प्रत्येक न्यायप्रेमी नागरिकाने विरोधच केला पाहिजे. कुणबी मराठा समुदायाला ओबीसीमध्ये समाविष्ट करून आरक्षण देण्यात आले आहे. याच आधारे मराठ्यांसाठी आरक्षण विस्तारित करण्याची मागणी केली जात आहे. अनुसूचीत जाती जमातींतील एक लहानसा हिस्सा आरक्षणामुळे थोडाफार लाभ प्राप्त होऊन शिक्षण आणि रोजगारामध्ये काहीसे स्थान मिळवू शकला आहे. परंतु आता त्याचा विशेष असा कोणताही लाभ त्या समुदायालासुद्धा मिळेनासा झाला आहे. कारण सरकारी नोकऱ्या तयारच होत नाहीयेत. नवउदारवादी धोरणांतर्गत सतत खाजगीकरण केले जात आहे व त्यामुळे उरल्यासुरल्या सरकारी नोकऱ्यासुद्धा संपुष्टात येत आहेत. अशा वेळी, सरकारी नोकऱ्या नावापुरत्याच असल्यामुळे आता आरक्षणाचा विशेष लाभ दलित आणि मागास समुदायालासुद्धा मिळेनासा झाला आहे. म्हणूनच दलितांमध्ये बेरोजगारीचे प्रमाण भयंकर आहे. अलीकडेच महाराष्ट्र सार्वजनिक सेवा आयोगाने ५ हमालांच्या भरतीसाठी आवेदन काढले. त्यासाठी शैक्षणिक पात्रता चौथी पास होती. त्यासाठी २५०० अर्ज आले. पैकी २५० अर्जदार पोस्ट ग्रॅज्युएट होते आणि १००० हून जास्त ग्रॅज्युएट. यावरून भरमसाठ बेरोजगारीचा अंदाज येऊ शकतो.

दलित अत्याचार विरोधी कायदा रद्द करण्याची मागणीसुद्धा निराधार आहे. महाराष्ट्रात नवबौद्ध, दलित आणि आदिवासी समुदाय १९ टक्के आहे. गेल्या वर्षी नोंद करण्यात आलेल्या एकूण एफआयआरपैकी फक्त एक टक्का तक्रारी दलित वा आदिवासी समुदायाकडून नोंदविण्यात आल्या आहेत. या १ टक्क्यापैकी फक्त ४० टक्के तक्रारी दलित अत्याचार विरोधी कायद्याअंतर्गत नोंदविण्यात आल्या आहेत. या ४० टक्के तक्रारींमध्ये शिक्षा होण्याचे प्रमाण फक्त ७ टक्के आहे. ८७ टक्के प्रकरणे पडून आहेत. मग या कायद्याचा दुरुपयोग होत आहे, या म्हणण्याला काही अर्थ आहे का? अपवादस्वरूप काही प्रकरणांमध्ये दुरुपयोग होत असला, तरी या आधारे भारतीय संविधान आणि दंड संहितेतील प्रत्येक कायदा रद्द करावा लागेल कारण त्या सर्वच कायद्यांचा दुरुपयोग होतच असतो. मराठा समुदायापैकी श्रीमंत मराठ्यांचा हिस्सा ५० टक्के शैक्षणिक संस्था, ७० टक्के जिल्हा सहकारी पतपेढ्या आणि ९० टक्के साखर कारखान्यांचा मालक आहे. राज्याच्या राजकारणावर मराठा श्रीमंत वर्गाचा कब्जा आहे. १९६० नंतरच्या काळात १८ पैकी १० मुख्यमंत्री आणि जवळपास ५० टक्के आमदार हे मराठा भांडवलदार वर्गातून आलेले आहेत. हा वर्ग स्वतःच गरीब मराठ्यांचा शोषक आणि उत्पीडक आहे. या वर्गाला जर खरोखरच मराठा अस्मिता आणि उन्नतीची चिंता असेल तर ज्या प्रदेशात सर्वाधिक गरीब मराठा समुदाय राहतो, उदाहरणार्थ मराठवाडा, तेथील शेतीचे संकट दूर करण्यासाठी सिंचन व कर्जमाफीच्या योजना हे मराठा शासक लागू कां करत नाहीत? रोजगार हमी कायदा आणि बेरोजगारी भत्ता कां लागू करत नाहीत? रोजगार निर्माण करणारी विकास धोरणे कां लागू करत नाहीत? आपल्या साखर कारखान्यांमध्ये किमान वेतन कां लागू करत नाहीत? कारण मराठ्यांमधील हा लहानसा श्रीमंत भांडवलशहा गट आपल्या नफ्याच्या हावरेपणात आंधळा झाला आहे आणि त्यासाठी तो कोणत्या ही थराला जाऊ शकतो. कष्टकरी मराठा समुदायाशी याचे जे वर्गीय अंतर्विरोध आहेत, ते दडपण्यासाठीच हा श्रीमंत मराठा शासक वर्ग आज दलित विरोधी वातावरण निर्माण करीत आहे. व्यवस्था विरोधी असंतोष दाबण्यासाठीच गरिबांना जातीच्या नावावर एकमेकांच्या विरोधात उभे केले जात आहे आणि गैर मुद्द्यांना मुद्दे बनवले जात आहेत.

**सत्ताधाऱ्यांच्या कारस्थानाला बळी पडू नका! कष्टकऱ्यांची वर्गएकता स्थापित करा!**

हे अशाप्रकारचे प्रयत्न आज महाराष्ट्रातच होत आहेत असे नाही. अलीकडेच गुजरातमध्ये पाटिदारांचा उभारसुद्धा यासाठीच निर्माण करण्यात आला होता की पाटिदार पटेलांमध्येसुद्धा एक लहानसा भांडवलदार वर्ग आहे जो स्वतः गरीब पाटिदार-पटेलांना लुटतो आहे, चिरडतो आहे. या गरीब जनतेच्या क्रोधाग्नीचा आपल्याच जातीच्या धनाढ्यांच्या विरोधात भडका उडू नये म्हणून त्यांना दलित आणि आदिवाश्यांच्या विरोधात उभे केले जात आहे. आपण हरयाणामध्ये (जेथे बेरोजगारी सर्वाधिक वेगाने वाढते आहे) हल्लीच आरक्षणासाठी पेटलेल्या जाट आंदोलनामध्ये हेच कारस्थान पाहिलेले नाही का? तेथेसुद्धा गरीब आणि निम्न मध्यमवर्गीय जाट जनतेच्या क्रोधाला इतर जातींच्या दिशेने वळवण्यात आले.

आज देशभरात भांडवली व्यवस्था जनतेला रोजगार, अन्न, वस्त्र, निवारा आणि सामाजिक आर्थिक सुरक्षा आणि न्याय बहाल करण्यात अपयशी ठरते आहे. अशा परिस्थितीत सामान्य कष्टकरी लोकांच्या मनातील क्रोधाने व्यवस्था विरोधी रूप धारण करू नये याचसाठी लोकांना जात आणि धर्माच्या नावाने लढवले जात आहे. महाराष्ट्रात आज जो मराठ्यांचा उभार होत आहे, त्याचे मूळ कारण मराठा गरीब जनतेमधील बेरोजगारी, महागाई, गरिबी आणि असुरक्षा हेच आहे, परंतु मराठा शासक वर्गाने त्याला दलित विरोधी वळण देण्याचा प्रयत्न केला आहे. हे कारस्थान ओळखले पाहिजे. अस्मितावादी राजकारण अथवा जातिगत मोर्चेबांधणी हे या कारस्थानावरचे उत्तर नाही. याचे उत्तर वर्ग संघर्ष आणि वर्गीय मोर्चेबांधणी हेच आहे. हे कारस्थान उघडे पाडले पाहिजे आणि सर्व जातींच्या बेरोजगार, गरीब आणि कष्टकरी जनतेला एकजूट आणि संघटित केले पाहिजे. याच प्रक्रियेत ब्राम्हण्यवाद आणि जातियवादावरसुद्धा प्रहार केला जाऊ शकतो. वास्तविक, जाति उन्मूलन आणि ब्राम्हण्यवादाच्या नाशाचा मार्ग अशाच प्रकारे वर्गीय मोर्चेबांधणीद्वारेच शक्य आहे. कष्टकरी मराठा समाजामध्ये असलेल्या जातीय पूर्वग्रहांच्या आणि जातीय वर्चस्वाच्या विरोधात ठाम व तडजोडविहीन लढा उभारलाच पाहिजे. परंतु जातीय अस्मिता हा त्याचा पाया असू शकत नाही, तर वर्गजाणीव हाच त्याचा पाया असू शकतो. अस्मितांची टक्कर प्रत्येक अस्मितेला बळकटी देते आणि अखेरीस गैर मुद्द्यांवर लढत सामान्य कष्टकरी माणसेच जीव गमावतात. दशकांपासून असेच होत आलेले नाही का? आतासुद्धा आपण शासक वर्गाच्या या ट्रॅपमध्ये फसणार आहोत का? अजूनही आपण त्यांच्याकडून मूर्ख बनवले जाणार आहोत का? नाही मित्रहो. भांडवली व्यवस्थेच्या विरुद्ध एकजूट होऊ या आणि त्याद्वारे या प्रक्रियेत ब्राम्हण्यवाद, जातियवाद आणि सांप्रदायिकतेच्या विरोधात तडजोडविहीन संघर्ष करू या. हाच कष्टकऱ्यांसमोर एकमेव मार्ग आहे.

# भांडवलशाही आणि आजारी आरोग्यसेवा

डॉ नवमीत
(अनुवाद - सोमनाथ केंजळे)

भारतीय संविधानाचा भाग ३, कलम २१ मध्ये एक मूलभूत अधिकार आहे, ज्याला "जीविताच्या रक्षणाचा अधिकार" असं म्हणतात. त्याच सोबत संविधानाच्या मार्गदर्शक तत्वांमध्येही "पोषण आहाराचा स्तर आणि जीवनाचा स्तर उंचावणे तथा लोकांचे आरोग्य सुधारणे बाबत राज्याची कर्तव्य" या बाबतही पुष्कळ लिहलं आहे. याला अनुसरून आपण असं म्हणू शकतो की आपल्या देशातील प्रत्येक नागरिकाच्या जीवीताचे व आरोग्याचे रक्षण करण्याची व काळजी घेण्याची जबाबदारी सरळ सरळ सरकारची आहे. पण होतंय मात्र नेमकं उलट, सरकार सातत्यानं 'आरोग्य सेवेच्या' जबाबदारीतून अंग काढून घेतंय. परिणामी देशातील जनतेचं आरोग्य रक्तपिपासू भांडवलदारांच्या हाती जात आहे.

चला बघुया, कशा प्रकारे ही भांडवली व्यवस्था लोकांच्या आरोग्याशी व जीविताशी खेळते आहे.

सार्वजनिक आरोग्याचा आधुनिक इतिहास ब्रिटीश काळापासून सुरू होतो. इंग्रजांनी भारतातील त्यांची सत्ता दृढ करण्यासाठी ज्या अनेक गोष्टी केल्या, त्यापैकीच आरोग्यसेवेचा उपक्रम ही एक. अर्थातच इंग्रजांना गुलाम देशातील लोकांच्या आरोग्याची फार चिंता नव्हतीच. त्यामुळे या पूर्ण पर्वात भारत एक रोगट व कुपोषित देश बनून राहीला आहे. स्वातंत्र्यानंतर जेव्हा कांग्रेसच्या नेतृत्वात भांडवलदार वर्गाच्या हाती सत्ता आली, तेव्हा पहिल्या पंचवार्षिक योजनेत सार्वजनिक आरोग्याचा समावेश सरकारच्या कार्यक्रमात समाविष्ट करण्यात आला होता. वर उल्लेख झाला त्यानुसार जनतेचे आरोग्य ही सरकारची जबाबदारी आहे, हे मान्य करावं लागलं होतं. तो असा काळ होता, जेव्हा सारं जग केन्सवादी कल्याणकारी राज्याचा फार्मुला लागू करण्याच्या प्रयत्नात होतं, जेणेकरून भांडवलशाहीच्या फाटक्या गोधडीला चार ठिगळं जोडून काम भागवता येणं शक्य होईल. भारतातही हा मुखवटा सांभाळायला काही कल्याणकारी कामांना सुरुवात झाली, पण १९८० चे दशक येता येता हा केन्सवादी फॉर्मुला पार धापा टाकू लागला. सातत्यानं चालू असलेल्या भांडवली अरिष्टांमुळे जगभरातील सरकारांनी लोककल्याणकारी कामांपासून हात झटकले व जगभर जागतिकीकरण व उदारीकरणाच्या धोरणांना सुरुवात झाली. बहुतेक देशांप्रमाणे भारतातही १९९० च्या दशकाच्या सुरुवातीलाच आर्थिक सुधारणांच्या नावाखाली या धोरणांची सुरुवात झाली, जी मागील दोन दशकात अधिक तीव्र झाली आहे. आतापर्यंत 'जागतिक आरोग्य संघटना' या बाबत काम करणारी संस्था होती, मात्र जागतिकीकरणाच्या पर्वासोबतच जागतिक बँक व जागतिक व्यापार संघटना या नव्या भिडूंचा त्यात प्रवेश झाला. या संघटनांच्या आगमनाबरोबरच जगभरात राष्ट्रीय आरोग्याच्या धोरणांबाबत जागतिक आरोग्य संघटनेची भूमिका कमी होत गेली आणि नव्या भिडूंच्या भूमिका महत्वाच्या ठरू लागल्या. १९८७ मध्ये जागतिक बँकेने ' विकसनशील देशांच्या आरोग्य सेवांचे वित्तीय पोषण' या नावाने एक योजना आणली. जागतिक बँकेच्या या योजने अंतर्गत काही सूचना दिल्या गेल्या. त्या अशा होत्या :

i. सार्वजनिक आरोग्य सेवांमध्ये रुग्णांद्वारे केल्या जाणाऱ्या खर्चात वाढ करावी

ii. खाजगी विमा कंपन्यांचा विकास करावा

iii. खाजगी क्षेत्राची आरोग्य सेवेमधील भूमिका अधिक मजबूत केली जावी आणि

iv. सरकारी आरोग्य सेवांचं विकेंद्रिकरण केलं जावं.

जागतिक बँकेने १९९३ मध्ये तिच्या 'जागतिक विकासाचा अहवाल' मध्ये 'आरोग्यात गुंतवणूक' या सदराखाली सर्व सूचना अधिक सुधारीत रूपात सादर केल्या. ते तमाम कर्जदार देश, जे नवउदारीकरणाच्या धोरणांना लागू करण्यापायी घेतलेल्या कर्जाखाली दबले होते, त्यांना या सूचना लागू करायला भाग पाडलं गेलं. त्या सोबतच औपचारिकरित्या सार्वजनिक आरोग्य सेवेचं रूपांतर क्रयवस्तूमध्ये करण्यात आलं. अशा रितीने संपूर्ण जगभर आरोग्यसेवेतून सरकारची भूमिका कमीकमी होत गेली व खाजगी क्षेत्रांचा हस्तक्षेप अधिकाधिक वाढू लागला.

भारताविषयी म्हणाल तर गेल्या दोन दशकांत आर्थिक सुधारणा आणि नवउदारवादी धोरणांमुळे इतर क्षेत्रांप्रमाणे 'जनतेच्या आरोग्या'ची अवस्था खूपच वाईट झाली आहे. जागतिक बँक व जागतिक व्यापार संघटनांच्या हस्तक्षेपामुळे गेल्या काही वर्षांत जी परिवर्तने झालीत त्यांची या ठिकाणी संक्षिप्त चर्चा करणे अगत्याचे आहे. एक तर सार्वजनिक आरोग्याच्या क्षेत्रात गुंतवणूक करायला सरकार हात आखडता घेतं आहे आणि दुसरीकडे अनेक छोटया छोटया तपासण्यांसाठी रुग्णांकडून पैसा वसूल केला जात आहे. तरीही सरकारी रुग्णालयात क्वचितच काही सोयी उपलब्ध असतात. किंवा त्यासाठी इतका वेळ वाट बघावी लागते की शेवटी नाइलाजाने रुग्णांना खाजगी रुग्णालयांची वाट धरावी लागते. तिथंही खर्च इतका भरमसाठ असतो की सामान्य गरीब माणसांना तो झेपतच नाही. एवढे पुरे नव्हते म्हणून की काय, सरकारनं 'आरोग्य वीमा' नावानं अजून एक योजना आणली. ही योजना म्हणजे या भांडवली सरकारने लोकांची केलेली किळसवाणी थट्टा आहे. अगदी स्पष्ट आहे, जर आरोग्य सुविधा सरकारनेच मोफत उपलब्ध केल्या, जे अगदी शक्यही आहे, तर या आरोग्य वीम्यांची गरजच पडणार नाही. पण यासाठीची नियत सरकारची नाही हे ही अगदी स्पष्ट आहे. तिसरी गोष्ट म्हणजे सरकार सातत्यानं या क्षेत्रात खाजगी गुंतवणूकीची भागीदारी वाढवते आहे. आणि भांडवलदार तर कोणतंही काम नफ्याच्या उद्देशानेंच करत असतो, म्हणजे आरोग्य सेवांचा दर वाढणं आलंच, त्या महाग होणारच. परिणाम आपल्या समोर आहे. आता तर त्याच्याही पुढं जाऊन आरोग्य सेवांच्या व्यवस्थापनातील जबाबदारी झटकतं आहे. त्याऐवजी स्थानिक संस्थांना, ज्यामध्ये मोठ्या प्रमाणात साम्राज्यवाद्यांच्या तुकड्यावर पोसणाऱ्या गैरसरकारी संघटनांना ही जबाबदारी देऊ पहात आहे.

बरं, आता आरोग्यसेवेत गुंतवलेल्या पैशाबाबत बोलुयात. जागतिक आरोग्य संघटनेच्या शिफारशीनुसार, कुठल्याही देशाने त्याच्या सकल घरेलु उत्पादनाच्या अर्थात जीडीपीच्या कमीतकमी ५% खर्च आरोग्यावर केला पाहिजे. तुम्हाला माहिती आहे, भारतात किती होतो? गेल्या दोन दशकांत तो सतत १% च्या आसपास आहे. ११ व्या पंचवार्षिक योजनेत २% च उद्दीष्ट ठेवण्यात आलं होत, पण प्रत्यक्षात तो १.०९% इतकाच राहीला. १२व्या योजनेपूर्वीही सरकारने तज्ञांचा एक गट बनवला होता, ज्यांनी या योजनेत, आरोग्य सेवेत जी.डी.पी.च्या २.५% गुंतवणूक करण्याची शिफारस केली होती पण सरकारद्वारे फक्त १.८५% चं उद्दीष्ट ठेवण्यात आलं. अजब आहे, सरकार भांडवलदारांना कित्येक लाख कोटींचं अनुदान, सूट देतं. पण




जनतेसाठी मात्र नेहमी तिजोरी रिकामी असते. याचा स्पष्ट अर्थ असा होतो की सरकारच आरोग्यसेवेत पैसा खर्च करू इच्छित नाही. सरकार जेव्हा एखाद्या क्षेत्रात गुंतवणूक करायला हात आखडता घेते तेव्हा समजावं की त्या क्षेत्रात आता खाजगी कंपन्या गुंतवणूक करतील. भारतात आरोग्य क्षेत्रातील एकूण गुंतवणूकीपैकी ७५% गुंतवणूक खाजगी क्षेत्राची आहे. ही जगातील आरोग्यसेवे अंतर्गत खाजगी क्षेत्राच्या भागीदारीमधील एक मोठी भागीदारी आहे. अशा पद्धतीने या कंपन्या देशातल्या सामान्य माणसांच्या आरोग्याच्या बदल्यात मोठा नफा लाटत आहेत. आता जेव्हा, खाजगी कंपन्यांचा उद्देशच नफा कमवणे आहे, तेव्हा रोगांची रोकथाम व प्रतिबंध, म्हणजे प्राथमिक आरोग्य सेवांमध्ये त्यांना कुठून रस असणार? त्या फक्त आजारी पडल्यावर महाग उपचार उपलब्ध करणार!

यामुळे अगोदरच खिळखिळी झालेली आरोग्य व्यवस्था अगदीच मेटाकुटीला आली आहे. भारतात दर ३० हजार लोकसंख्येमागे १ आरोग्यकेंद्र, दर ५ लाख लोकसंख्येमागे ३० बेड असणारे एक सामुदायिक आरोग्य केंद्र आणि प्रत्येक उपविभागात एक १०० बेडच्या सामान्य रुग्णालयाची तरतूद आहे. ही तरतूद कधीच पूर्ण झाली नाही. त्यात पुन्हा गेल्या दोन दशकांत भारताची लोकसंख्या तर वाढली पण त्या प्रमाणात या आरोग्य केंद्रांची नगण्य वाढ झाली आहे. सरकारी आरोग्य केंद्रांच्या अतिकमतरतेमुळे गरीबांना नाइलाजाने खाजगी डॉक्टरांकडं जाऊन खिशाला कात्री लावाली लागते. अगोदर म्हणालो तसं नफ्याच्या हव्यासापोटी खासगी क्षेत्रांचा प्राथमिक आरोग्यात अजिबात रस नसतो, ते फकत तृतीय आरोग्य सेवांमध्ये, म्हणजे बड्या रुग्णालयांमध्ये गुंतवणूक करतात. आणि देशातली कष्टकरी जनता मोठ्या प्रमाणात संक्रामक रोगांशी झुंजत असते, जिथं तात्काळ प्राथमिक उपचाराची नितांत गरज असते. दुसरं, या खाजगी व कार्पोरेट दवाखान्यांचा खर्चच इतका असतो की कष्टकरी सोडाच पण सामान्य मध्यमवर्गीय माणूसही तो पेलू शकत नाही. परिणामी एक तर त्याला मरावं लागतं, नाहीतर कर्जात बुडावं तरी लागतं. काही अभ्यासांतून असं समोर आलं आहे की केवळ आजारपणात उपचारावर होणाऱ्या खर्चामुळे भारतात दरवर्षी जवळजवळ ४ कोटी लोक दारिद्र्यरेषेच्या खाली ढकलले जातात. नरेंद्र मोदींनी सत्तेत येण्यापूर्वी सर्वांना आरोग्य सुविधा देण्याचं वचन दिलं होत, सत्तेत आल्याआल्या मोदी सरकारने एक सार्वभौम आरोग्य प्रणालीची योजना आखली होती पण २०१५ मध्येच पैशाच्या कमतरतेचा बहाणा पुढं करून संपूर्ण योजनाच गुंडाळण्यात आली. आणि इतर वचनांप्रमाणे हा सुद्धा 'चुनावी जुमला' सिद्ध झाला. कहर म्हणजे, जखमेवर मीठ चोळल्यागत २०१५ च्याच 'राष्ट्रीय आरोग्य धोरणा'मध्ये सरकारने उघडपणे आरोग्य सुविधांच्या खाजगीकरणावर जोर दिला आहे. यासाठी सरकारची घोषणा आहे 'प्राइव्हेट, पब्लीक पार्टनरशीप'. ज्यामध्ये पायाभूत सुविधा आणि पैसा तर सरकार म्हणजेच देशाच्या जनतेचा लागणार आणि नफा मात्र भांडवलदारांचा होणार. यासाठी कारण देण्यात आलय की यामुळे गरीबांना उच्च दर्जाच्या आरोग्य सुविधा मिळतील, मात्र वस्तुस्थिती वेगळीच आहे. गरीबांना फक्त लाथडलं जातं, नहीतर आजारपणातच मरण मिळतं. २००७ मध्ये दिल्ली उच्च न्यायालयाने निर्देश दिले होते की खाजगी दवाखान्यात गरीबांना १०% बेड मोफत असायला हवेत. यासाठी दिल्ली सरकारने अनेक खाजगी रुग्णालयांना नोटीफिकेशनही पाठवले आहे. पण तरीही यामुळे रुग्णालयाच्या मालकांना काहीच फरक पडला नाही. हे मालक एकवेळ रुग्णालयाचे बेड रिकामे ठेवतील पण कुणा गरीबाला कधीच भरती करणार नाहीत. पण पैसे घेऊन कुणी उपचारासाठी आलाच तर त्याचा खिसा रिकामा करायला मागेपुढे पहाणार नाहीत.

बरं आता औषध उद्योगाचं पाहुयात. आरोग्य सुविधा औषधांशिवाय शक्य नाहीत. त्यामुळे औषधांच्या बाजाराचा उल्लेख करणं आवश्यक आहे. जागतिक व्यापार संघटनेच्या तरतुदीपायी भारतासहीत इतर विकसनशील देशांतील तमाम गरीब जनता महागडी औषधं खरेदी करायला मजबूर आहे. जागतिक व्यापार संघटनेचा एक करार आहे, जो "बौद्धीक संपदा अधिकाराच्या व्यापारा संबधीच्या स्वरूपावर" आधारीत आहे. इंग्रजीत याला TRIPS म्हणतात, व जागतिक आरोग्य संघटनेच्या सदस्यांना त्याच्या अधिन रहाणं अनिवार्य आहे. या करारानुसार कुठल्याही कंपनीला त्याच्या पेटंटचा अधिकार २० वर्ष उपभोगता येतो. याचा अर्थ पुढील २० वर्षे संबधित औषधाचे उत्पादन व वितरणाचे सर्वाधिकार फक्त संबंधीत कंपनीलाच आहेत. नावाला म्हणून त्यात तरतूद दिलीय की एखाद्या आणीबाणीच्या प्रसंगी एखादं सरकार पेटंटच्या औषधांच्या स्वस्त उत्पादनासाठी अंतर्गत सूट देऊ शकतं. पण जेव्हाकेव्हा एखाद्या देशाने असा प्रयत्न केला तेव्हा अमेरिका व इतर साम्राज्यवादी देशांनी एक तर त्या देशांची आर्थिक नाकेबंदी केली किंवा त्यांच्याशी असलेले व्यापारी संबंध तोडले किंवा त्यांना त्यांच्या 'दक्षता यादी' त समाविष्ट केले. त्यामुळे भारत सरकारनेही १७० चा पेटंटचा कायदा २००५ साली बदलला. या २००५ च्या कायदयापूर्वी काही प्रमाणात तरी स्वस्त जेनरिक औषधांचे उत्पादन शक्य होत होते, ज्यामुळे मर्यादित स्वरूपात का होईना पण गरीबांना स्वस्त औषधे उपलब्ध करायला मदत होत होती. आता फक्त पेटंटेड औषधे महाग मिळतात एवढेच नाही तर पेटंटेड औषधांवरील 'ड्रग्स प्राईस कंट्रोल ऑर्डर' ज्यामुळे औषधांच्या किंमतीवर नियंत्रण ठेवता येते तेही लागू होत नाही. स्थिती अशी आहे की बहुतेक गरजेची औषधे ही सामान्य माणसाच्या हाती लागतच नाहीत.

आता डॉक्टरांविषयी बोलायचं, तर आरोग्यसेवेतील डॉक्टरांची इतकी कमी आहे की भारतात दहा हजाराच्या लोकसंख्येच्या वाटयाला खासगी व सरकारी दोन्ही मिळून एकूण डॉक्टर आहेत फक्त सात. आणि रुग्णालयातील बेड म्हणाल तर दहा हजारामागं बेड आहेत नऊ. त्यात पुन्हा खाजगीकरण व उदारीकरणामुळे या मर्यादित डॉक्टरांचं व आरोग्य सुविधांचं केंद्रिकरण शहरांमध्ये मर्यादित झालंय. एका अभ्यासानुसार भारतात ८५% डिस्पेंसरीज, ६०% रुग्णालये आणि ८०% डॉक्टर शहरात आहेत, जिथं भारताची फक्त २८% लोकसंख्या राहते. भारतीय माणसाचं सरासरी आयुष्यमान ६८ वर्षे. हे 'ब्रिक्स' देशांतील सर्वात कमी आहे. भारतात ग्रामीण भागात ५ किलोमीटरच्या प्रभावक्षेत्रात बेड असलेल्या रुग्णालयांची उपलब्धता फक्त ३७% लोकांपुरतीच मर्यादीत आहे आणि ६८% च ओ.पी.डी. पर्यंत पोहचू शकतात. अशा परिस्थितीत ग्रामीण गरीबांना उपचार मिळणं दुरापास्त झालं आहे आणि शहरातही उपचारांचा खर्च फक्त श्रीमंतांनाच परवडण्यासारखा आहे.

एकूण काय, तर अशा तऱ्हेने या नफेखोर भांडवलशाहीनं जसं प्रत्येक गोष्टीला बाजारात विकण्याच्या क्रयवस्तून रूपांतरीत केलंय, तसं आरोग्य आणि मानवी जीवनसुद्धा एक बाजारातील 'वस्तू' झालंय. उदारीकरण व जागतिकीकरणानंतर तर आरोग्य सुविधांची अवस्था अधिक बिकट झाली आहे. आणि जोवर ही भांडवली व्यवस्था राहील, तोवर चित्र असंच राहील. यासाठी भांडवलशाहीचा अंत करून समाजवादी व्यवस्थेची स्थापना करणं ही अगत्याची बाब झाली आहे, जेणेकरून मानवी आरोग्यकडं माणसाच्या गरजा म्हणून पाहील जावं आणि व्यवहारात आणल जावं. बाजारातली वस्तू म्हणून नव्हे.

# माणूस मारण्याचा उत्सव

अभिजीत

८ नोव्हेंबर रोजी नरेंद्र मोदी यांनी नोटाबंदीची घोषणा करण्याआधीसुद्धा देशात बरंच काही घडत होतं. काळ्या पैशावर सर्जिकल अटॅक करण्याच्या नावाखाली नोटबंदी करुन सरकारने सर्वसामान्य माणसाची गोची केली, आणि बघता बघता इतर सर्व मुद्दे बाजूला पडले. हीसुद्धा राजकारणाची एक खास तऱ्हा आहे. सत्ताधारी ज्या गोष्टी लपवू पाहतात, मुख्य प्रवाहातील मिडिया ज्या गोष्टींना दुय्यम लेखते त्या सामान्य माणसासाठी जास्त महत्त्वाच्या असू शकतात, किंबहुना त्याच जास्त महत्त्वाच्या असतात हे लक्षात ठेवले पाहिजे. त्यामागचे राजकारण ओळखले पाहिजे. भोपाळमध्ये झालेला ८ आरोपींचा एन्काउंटर ही अशीच एक घटना.

दि. ३१ ऑक्टोबर रोजी सिमी या बंदी असलेल्या संघटनेचे सदस्य असल्याच्या व दहशतवादी कारवायांमध्ये हात असल्याच्या खटल्यातील ८ आरोपींना मध्य प्रदेश पोलिसांनी ठार मारले. त्यापाठोपाठ ताबडतोब वेगवेगळ्या न्यूज चॅनेलवरून, वर्तमानपत्रांमधून आठ दहशतवाद्यांना भोपाळ पोलिसांनी कंठस्नान घातल्याची बातमी पसरू लागली. वास्तविक, आरोपी आणि गुन्हेगार या दोन निराळ्या गोष्टी आहेत. आरोप सिद्ध झाल्याशिवाय कुणालाही गुन्हेगार ठरवता येत नाही. आरोप खरे आहेत की नाही, याचा निर्णय करणे व त्यानुसार शिक्षा देणे अशीच न्यायप्रक्रिया असते. अन्यथा कुठल्याही व्यक्तीला गुन्हेगार ठरवता येईल. दहशतवादाचा आरोप असलेल्या या आठ जणांविरोधात खटला सुरू होता. परंतु त्याचा निर्णय व्हायच्या आत त्यांना ठार मारण्यात आले, व दहशतवाद्यांचा मुडदा पाडल्याबद्दल आनंदोत्सव साजरा करण्यात आला. परंतु या विशिष्ट एनकाउंटरबद्दल प्रशासनाकडून देण्यात आलेल्या वेगवेगळ्या वक्तव्यांमध्ये एवढी विसंगती होती, की कुठल्याही विचारी आणि न्यायप्रेमी नागरिकाच्या मनात शंकेची पाल चुकचुकणे स्वाभाविक होते. त्यानुसार प्रश्न विचारले जाऊ लागताच प्रश्न विचारणाऱ्यांना देशद्रोही ठरवण्याची मोहीम सुरू झाली. पाठोपाठ एनकाउंटर करणाऱ्या पोलिस अधिकाऱ्यांना प्रत्येकी रोख दोन लाख रुपयांचे पुरस्कार देऊन मध्य प्रदेश सरकारने आपली भूमिका स्पष्ट केली. व्यापम घोटाळ्यातील ५० हून अधिक संबंधितांच्या संशयास्पद मृत्यूसाठी कुख्यात असलेल्या मध्य प्रदेश सरकारकडून याहून वेगळी अपेक्षा तरी काय करायची. मात्र प्रश्न अनुत्तरित राहिले, व आता नोटाबंदीच्या गोंधळानंतर ते विस्मृतीत जाण्याची शक्यता आहे.

भोपाळ एन्काउंटर नंतर प्रकाशात आलेल्या व्हिडियोने पोलिस खात्याकडून व सरकारकडून देण्यात आलेल्या घटनेच्या वर्णनावर अनेक प्रश्नचिन्हे निर्माण झाली आहे. व्हिडियोमध्ये आरोपी निःशस्त्र असल्याचे, पोलिसांनी अगदी जवळून गोळ्या झाडल्याचे दिसून येते. चमचे व ताटांपासून बनवलेल्या धारदार हत्यारांचा वापर करून आरोपींनी एका पोलिसाचा मुडदा पाडला, व तुरुंगाच्या उंच भींती ओलांडून पसार झाले असे पोलिस खात्याकडून सांगण्यात आले आहे. हे सगळे घडत असताना तुरुंगातील अद्ययावत सुरक्षायंत्रणा काय करीत होती? तुरुंगातून निसटल्यानंतर एकत्र राहण्याऐवजी फुटून पसार होणे अधिक सोपे झाले असते. तरीही पुढचे आठ तास आठही आरोपी एकत्र राहून पोलिसांशी चकमक होण्याची वाट पाहत होते का? तुरुंगातून बाहेर पडल्यावर आरोपींना जर शस्त्रे मिळाली असतील, तर ती कुणाकडून मिळाली? बाहेर साथीदारांकडून शस्त्रे मिळाली असली, तर शस्त्रे पुरविणारे साथीदार पळून जाण्यासाठी एखाद्या गाडीची व्यवस्था का करू शकले नाहीत? या प्रश्नांची कोणतीही समाधानकारक उत्तरे देण्याचा प्रयत्न करण्याऐवजी सरकारने लोकांच्या प्रश्न विचारण्याच्या लोकशाही अधिकारालाच आव्हान द्यायला सुरुवात केली. सरकार व प्रशासनावर अविश्वास दाखवणे हा देशद्रोह ठरवण्याचा प्रयत्न होऊ लागला. देश आणि सरकार या दोन वेगवेगळ्या गोष्टी आहेत. या दोन गोष्टींमध्ये गल्लत झाली तर सरकारच्या कुठल्याही धोरणावर आक्षेप घेणे, त्याला विरोध करणे हा देशद्रोह ठरेल. हे हुकूमशाही राज्याचे लक्षण आहे.


भोपाळमधील एन्काउंटर त्याच्या अति नग्न रूपामुळे अनेकांना धक्कादायक वाटू शकतो, परंतु एन्काउंटरची एक मोठी परंपरा आपल्या देशाला लाभलेली आहे. चंदनाच्या वीस कथित तस्कारांच्या एन्काउंटरची घटना ताजीच आहे. पोलिस खात्यानुसार दाट जंगलामध्ये १०० तस्कराशी पोलिसांची चकमक झाली, तस्करांनी तुफान दगडफेक केल्यामुळे स्वसंरक्षणासाठी पोलिसांना गोळीबार करावा लागला, व त्यात २० जण मारले गेले. पोलिसांच्या या वर्णनाबद्दल शंका घेतल्या जाऊ लागल्या. तस्करांच्या डोक्यात गोळ्या झाडण्यात आल्या होत्या. घटनास्थळी मृतदेहांची जागा बदलण्यात आली असावी असे दिसून येत होते. मृतांपैकी काहीजण जंगलात गेलेच नव्हते, त्यांना एका बसमध्ये बसवून पोलिस घेऊन जात असताना आपण पाहिल्याचा दावा एका व्यक्तीने घटनेनंतर केला. गुजरातमधील सोहराबुद्दीन एनकाउंटरमुळे तुरुंगाची हवा खाणारे देशाच्या इतिहासातील पहिले गृहमंत्री ठरलेल्या अमित शहा यांच्यावर सीबीआयने दाखल केलेले आरोप ज्यावेळी अहमदाबाद सीबीआय न्यायालयाने फेटाळले त्यावेळी अमित शहा यांनी केलेले विधान एनकाउंटरचे वास्तव समजून घेण्यासाठी फार बोलके आहे. शहा म्हणाले, "माझ्यावर झालेले आरोप राजकीय हेतुने प्रेरित होते. इतर राज्यांमध्ये जास्त मोठ्या प्रमाणात एन्काउंटर होतात, त्या मानाने गुजरातमध्ये खूपच कमी. शांतता राखण्याबाबत गुजरातचा रेकार्ड फारच चांगला आहे." २००२ सालातील गुजरातमधील परिस्थिती जे विसरलेले नाहीत, ते शहा यांच्या शेवटच्या वाक्याकडे फारसे लक्ष देणार नाहीत. अमित शहा यांना निर्दोष ठरवण्यासाठी वरील युक्तीवाद पुरेसा नसला तरी त्यातून आपल्या देशातील कायदाव्यवस्थेबद्दल आपण काही निष्कर्ष नक्कीच काढू शकतो. काश्मीर आणि उत्तर पूर्व भारतामध्ये दहशतवादविरोधी कारवाईच्या नावाखाली भारतीय सैन्य आणि पोलिस खाते हत्याकांडे करीत असल्याचे देशाच्या न्यायालयालासुद्धा मान्य करावे लागले आहे. काश्मीर व उत्तर पूर्व भारतात, जेथे 'आफ्स्पा' कायदा लागू आहे, चकमकीत दहशतवादी मारले गेल्याचे सेना किंवा पोलीस खाते सांगते तेव्हा अनेकदा निःशस्त्र माणसांचे थंड डोक्याने सुनियोजित पद्धतीने मुडदे पाडलेले असतात, हे वारंवार दिसून आले आहे. म्हणूनच गेल्या वीस वर्षांत मणीपूरमध्ये झालेल्या १५०० एन्काउंटरची चौकशी झाली पाहिजे, असे सर्वोच्च न्यायालयाला अलीकडेच सांगावे लागले.

अशा एन्काउंटरमध्ये मारली जाणारी माणसे मुख्यतः जात, वर्ग, आर्थिक परिस्थिती या दृष्टीने समाजातील वर्चस्वधारी समूहाच्याच नव्हे, तर अगदी मध्यमवर्गाच्याही परिघाबाहेरची असतात. त्यामुळे त्यांच्या मरण्याला मुख्य प्रवाहातील मिडियाकडून फारसे महत्त्व दिले जात नाही. स्वच्छ भारत योजनेसारख्या धूळफेक करणाऱ्या योजनांपेक्षाही दुय्यम स्थान या घटनांना मिळते. बऱ्याचदा, व्यापक समाजाच्या भल्यासाठी अशा उपद्रवी घटकांच्या विरोधातील हे आवश्यक "सफाई अभियान" असल्याचेच चित्र निर्माण केले जाते, व या चित्राच्या आडून सत्ताधारी वर्ग शोषित दमित घटकांचा विद्रोहाचा आवाज चिरडून टाकत असतो.

सर्वसामान्य जनतेच्या हिताच्या विरोधी राजकारण राबवत असताना खऱ्या मुद्द्यांकडून लोकांचे लक्ष विचलित करणे, प्रत्येक घटनेकडे सत्ताधाऱ्यांना सोयीच्या असलेल्या दृष्टीकोनातून पाहायला लावणे ही सत्ताधाऱ्यांची गरज असते. आपण केलेली देशाच्या जनतेची दुरवस्था झाकण्यासाठी "विदेश" सरकारसाठी फार उपयुक्त असतो. पाकिस्तानचा बागुलबुवा उभा करणे, परदेशात देशाची प्रतिष्ठा उंचावत असल्याचे फसवे चित्र उभे करणे, दहशतवादी हल्ला होणार असल्याचे भय निर्माण करणे, हक्कांसाठी लढणाऱ्यांना विदेशाची फूस असलेले देशद्रोही ठरवणे हा अशाच सुनियोजित प्रचारतंत्राचाच एक भाग असतो. लोकांच्या सम्मतीने लोकांवर राज्य करणे, हेच भांडवली लोकशाहीचे व्यवच्छेदक लक्षण आहे. त्यासाठी गडगंज पैशाच्या बळावर चालणाऱ्या, भांडवलदारांच्या हातात असलेल्या प्रसारमाध्यमांचा, वेगवेगळ्या रूपांमध्ये झळकणाऱ्या सरकारी जाहिरातींचा, शालेय मुलांच्या अभ्यासक्रमांचा, चित्रपटांचा, थोडक्यात अनेकानेक सांस्कृतिक घटकांचा वापर केला जातो. फॅसिस्ट राजकारण याच्या एक पाऊल पुढे जाऊन राज्यसत्ता ही एक श्रद्धेय बाब आहे, तिच्यावर संशय घेणे पाप आहे, असे लोकांच्या मनावर ठसवण्याचा प्रयत्न करते. पोलिसांच्या किंवा सैन्याच्या कुठल्याही कृतीबद्दल प्रश्न विचारून त्या खात्यांचे खच्चीकरण करू नये, असे एखादा मंत्री सांगतो, तेव्हा तो हेच करीत असतो. खरे तर, पोलिस खात्याकडून होणाऱ्या भ्रष्टाचाराचा, अत्याचारांचा अनुभव सर्वसामान्य जनता पावलोपावली घेत असतेत. म्हणूनच वेगवेगळ्या चित्रपटांमध्ये भ्रष्ट पोलिसव्यवस्थेचे चित्रण पाहून आपण सुखावतो, टाळ्या पिटतो. सिंघमसारख्या पोलिस नायकाचा आपला शोध वास्तवात कधी संपणार नाही, हे आपण मनोमन मान्यही केलेले असते. मात्र एनकाउंटरच्या बातम्या ऐकताना मात्र आपली भावना वेगळी असते. त्यात पुन्हा एनकाउंटरमध्ये मारण्यात आलेल्यांची नावे "मुसलमान" असतील तर आपली खात्रीच पटते. नक्सलवादविरोधी कारवाईत ठार मारण्यात आलेली माणसेसुद्धा प्रामुख्याने आपल्या विशिष्ट संस्कृतीच्या बाहेरचे जीवन जगणारे आदिवासी असतात. तेव्हासुद्धा आपण क्षणार्धात पोलिसांच्या बाजूने विचार करू लागतो. पोलिसांबद्दल आपण अतिशय श्रद्धाळू होतो. आपली अशी विचित्र मनस्थिती तयार होण्यामागे आपले सामाजिक सांस्कृतिक पूर्वग्रह तसेच ते पूर्वग्रह बळकट करण्यासाठी सत्ताधारी वर्गाने सुनियोजित पद्धतीने घातलेले खतपाणी कारणीभूत असते. तसेच व्यवस्थेने आपल्यावर केलेला अन्यायदेखील कारणीभूत असतो. जेव्हा व्यवस्था बिघडते, जेव्हा तिचा ऱ्हास होऊ लागतो तेव्हा ती अधिकाधिक क्रूर आणि रक्तपिपासू होऊ लागते. आपले वर्चस्व टिकवण्यासाठी सत्ताधारी वर्ग प्रत्येक विरोध चिरडून टाकण्यासाठी जास्तीत जास्त क्रूर होऊ लागतो, तर दुसरीकडे अन्यायग्रस्त जनतेच्या मनातही तिच्या आकांक्षा पूर्ण होत नसल्यामुळे, त्यांचे सतत खच्चीकरण होत असल्यामुळे क्रौर्य वाढीस लागते. आपला खरा शत्रू कोण आहे याची जाणीव नसलेली जनता, व्यवस्थेने ज्यांच्याकडे जनतेचे शत्रू म्हणून बोट दाखवलेले असते, त्यांनाच शत्रू मानू लागते. सत्ताधारी वर्गाने केलेल्या हत्याकांडांमध्ये मग जनतासुद्धा प्रत्यक्ष अप्रत्यक्ष सहभाग घेऊ लागते. ही हत्याकांडे जनतेच्या मनातील क्रौर्याच्या भावनेला वाट करून देतात. नालायक व्यवस्थेमुळे निर्माण झालेला रोष, व्यवस्थेच्या विरोधात सक्रीय होण्याऐवजी, खोट्या शत्रूंच्या दिशेने वळतो. व्यवस्थेसाठी काम करू लागतो. आणि मग माणसाला मारण्याचे उत्सव सुरु होतात. सध्या आपल्या देशात तेच घडते आहे. धर्म, जात, गाईसारखी धार्मिक प्रतिके, सैन्यासारखी राष्ट्रवादी प्रतिके यांचा वापर करून जनतेमध्ये फूट पाडली जात आहे, आणि माणसाला मारण्याचे उत्सव घडवून आणले जात आहेत. दहीहंडीसारखे उत्सव प्रायोजित करणारा सत्ताधारी वर्गच हे माणूस मारण्याचे उत्सव प्रायोजित करतो आहे. आणि त्यामध्ये मरतो आहे तो सामान्य माणूसच. काश्मीर हा भारताचा अविभाज्य भाग आहे, अशा आरोळ्या ठोकत सैन्याच्या माध्यमातून अत्याचार होतात, तेव्हा त्या भारताच्या "अविभाज्य भागातील" "भारतीय" माणूसच लाथ्याकाठ्या आणि गोळ्या झेलत असतो, डोळे फोडून घेत असतो, कवडीमोल किंमतीला भूमी भांडवलदारांच्या घशात घालण्याच्या कारस्थानाला विरोध करणाऱ्यांवर जी नक्सलवादविरोधी कारवाई केली जाते, त्यात मारला जाणारा आदिवासी हा एक भारतीय माणूसच असतो, गोरक्षेच्या नावाखाली दलितांना भर रस्त्यात जेव्हा उन्मत्तपणे फटके मारले जातात तेव्हा काळेनिळे पडणारे शरीर माणसाचेच असते आणि नोटाबंदी झाल्यावर तासन्तास रांगेत राहिल्यामुळे, उपचार न मिळाल्यामुळे जीव गमावणारा हासुद्धा सामान्य माणूसच असतो. कधी त्याला देशद्रोही म्हणून मारले जाते, तर कधी देशभक्तीच्या यज्ञात हुतात्मा केले जाते. माणूस मारण्याच्या या उत्सवाचे समर्थन करण्यासाठी असो किंवा त्यांचा विरोध करण्यासाठी असो, त्यांच्याकडे भावनेच्या चष्म्यातून पाहून चालणार नाही, तर या घटनांच्या मागे असलेले आर्थिक-राजकीय हितसंबंध तपासून पाहिले पाहिजेत. व राज्यसत्ता ही सर्वसामान्य जनतेच्या भल्यासाठी असते, हा आपल्याला पढवलेला भाबडा विचार अगोदर दूर लोटला पाहिजे.

राज्यसत्ता ही समाजाच्या वर उभी असलेली एखादी निःपक्षपाती संस्था नसते. वर्गांमध्ये विभागलेल्या समाजामधूनच ती निर्माण होते. वर्गांमध्ये विभागलेल्या समाजातील वेगवेगळ्या वर्गांची हिते एकसारखी नसतात. उदाहरणादाखल, एक कारखानदार आणि त्याच्या कारखान्यात काम करणारा कामगार यांची हिते सारखी नसतात. आपल्या रक्ता-घामाने सगळे उत्पादन करणारा कामगार जास्त पगाराची अपेक्षा करीत असतो, आणि काहीही काम न करता दिवसेंदिवस श्रीमंत होत जाणारा कारखानदार आपला नफा वाढवण्यासाठी कमीत कमी पगारात कामगाराला जास्तीत जास्त राबवून घेण्यासाठी धडपडत असतो. अशा प्रकारे परस्परविरोधी हितसंबंध असलेल्या वर्गांनी एकमेकांच्या विरोधात युद्ध पुकारून स्वतःला उद्ध्वस्त करून घेऊ नये यासाठीच राज्यसत्ता निर्माण होते. परंतु याचा अर्थ असा नाही की ती वर्गांमध्ये समन्वय साधण्याचा, त्यांच्यातील भांडण तटस्थपणे, न्यायाने मिटवण्याचे काम करीत असते. उलट ती आर्थिकदृष्ट्या बलशाली असलेल्या वर्गांचे इतर वर्गांवर प्रभुत्व ठेवण्याचे काम करीत असते. म्हणूनच एका कवीने म्हटल्याप्रमाणे हातांबरोबर शस्त्रांचे संदर्भ बदलतात. सत्ताधारी वर्ग पोलिस, स्थायी सैन्यासारख्या सशस्त्र दळांच्या व तुरुंगांसारख्या यातनादायी संस्थांच्या माध्यमातून आपले वर्चस्व राखत असतो. सामान्य माणसाने शस्त्र बाळगणे बेकायदेशीर असते, मात्र सत्ताधारी वर्ग अधिकाधिक शस्त्रांचा साठा करीत असतो, आणि त्यांचा वापर शोषितांचे लढे चिरडण्यासाठीच केला जातो. गोरगरीब जनता जेव्हा आपल्या हक्कांसाठी जेव्हा रस्त्यावर उतरते, त्यावेळी पोलीस कोणाच्या बाजूने उभे असतात, ते आपल्याला ठाऊक आहेच. म्हणूनच भोपाळमधील मुसलमान आरोपींचा एनकाउंटर हा हिंदुराष्ट्राच्या घोषणेशी सुसंगत वाटत असला, तरी आपल्या जल जंगल जमीनीपासून विस्थापित होण्यासाठी, विरोध करताच नक्सलवादी म्हणून मरण्यासाठी कुणी मुसलमान असण्याची गरज नसते. कारण प्रश्न धर्माचा अथवा जातीचा नाही, तर वर्गाचा आहे. सत्ताधारी वर्गाने रोखलेल्या बंदुका या आपल्याच दिशेने रोखलेल्या आहेत, हे सत्य सर्वसामान्य कष्टकरी समाजाने माणसाला मारण्याचे हे उत्सव साजरे होत असताना लक्षात ठेवले पाहिजे.

# अलविदा फिडेल! जगभरातील स्वातंत्र्यप्रिय जनता तुम्हाला कधीच विसरू शकणार नाही!



फिडेल कास्ट्रो
(ऑगस्ट १३, १९२६ - नोव्हेंबर २५, २०१६)

क्यूबाच्या क्रांतीचे नेते आणि अमेरिकन साम्राज्यवाद विरोधी लढ्यातील झूंझार योद्धा असलेल्या फिडेल कास्ट्रो यांचे आपल्यातून कायमचे निघून जाणे, ही जागतिक मानवमुक्तीच्या लढयाची मोठी क्षति आहे. फिडेल बऱ्याच काळापासून आजारी होते, पण तरीही त्यांची केवळ उपस्थिति आणि लोकप्रियता सुद्धा मानव मुक्तिच्या लढ्याचा एक शक्तिस्रोत होती. कास्ट्रो व चे ग्वेरा यांच्या नेतृत्वाखाली झालेल्या क्यूबन क्रांतीनंतर अमेरिकेच्या नाकावर टिच्चून, सगळे अडथळे व षडयंत्र यांचा सामना करत क्यूबन जनतेने समाजवाद निर्मितीच्या दिशेने मोठी वाटचाल केली. समाजवादी संक्रमण काळातील समस्या क्यूबा मध्ये सुद्धा सोडवल्या जाऊ शकल्या नाहीत आणि क्यूबन समाज आज एका अनिश्चित भविष्याच्या समोर उभा असूनही तिथे झालेल्या प्रारंभिक समाजवादी प्रयोगांमुळे जनता शतकांच्या गुलामगिरीतून मुक्त झाली आणि जनतेचे जीवनमान कित्येक पटीने उंचावले.

आत्यंतिक गरीबी आणि कठोर अमेरिकन प्रतिबन्ध ह्यांचा सामना करत क्यूबामध्ये शिक्षण व आरोग्य सर्वांसाठी विनामूल्य करण्या सारख्या शानदार उपलब्धी खूपच कमी काळात साध्य केल्या गेल्या. क्यूबाच्या अर्थव्यवस्थेचा मुख्य आधार असलेल्या शेती मध्येसुद्धा नेत्रदीपक पथदर्शक प्रयोग केले गेले. एका कालावधी नंतर ह्या प्रयोगांची गती कुंठित झाली आणि कास्ट्रो यांच्या जाण्याने क्यूबातील समाजवादाच्या अस्तित्वावर प्रश्नचिन्ह उपस्थित झाले आहे, तरीही भांडवलशाही आणि साम्राज्यवाद यांच्या विरोधात कास्ट्रो यांनी दिलेला अथक लढा थक्क करणार आहे, ह्यात शंका नाही. बिथरलेल्या अमेरिकन साम्राज्यवाद्यांनी क्यूबामध्ये सत्ता उलथवून टाकण्याचे आणि कास्ट्रो यांची हत्या करण्याचे कैक प्रयत्न केले, पण क्यूबन जनता पूर्ण शक्तिनिशी कास्ट्रो यांच्या पाठीशी उभी राहिली आणि साम्राज्यवाद्यांना त्यांच्या सर्व कारस्थानांमध्ये अपयश बघावे लागले. विसाव्या शतकातील महान मुक्ति योद्धयांपैकी एक, फिडेल कास्ट्रो आज आपल्यात नाहीत परंतु जगभरातील मुक्तिकामी जनतेच्या हृदयात त्यांचे स्थान अढळ राहील.

**‘कामगार बिगुल’च्या वतीने आम्ही त्यांना क्रांतिकारी श्रद्धांजली अर्पण करत आहोत.**



# बिर्सा मुंडा आणि लहूजी साळवे - उपेक्षित स्वातंत्र्य सैनिक

**नागेश धुर्वे**

सुमारे दोन शतकांच्या गुलामीनंतर १९४७ साली भारत इंग्रजांच्या जोखडातून मुक्त झाला. या स्वांतंत्र्यासाठी हजारो ज्ञात अज्ञात स्वातंत्र्यवीरांनी रक्त सांडले, आपल्या प्राणांचे बलिदान केले. त्यापैकी अनेकांच्या त्यागमय जीवनावर आज विस्मृतीची धूळ बसली आहे, किंवा अनेकांना शासकवर्गाने फोटोफ्रेममध्ये अथवा जातीजमातीच्या चौकटीत बंदिस्त करून टाकले आहे. त्यांच्या संघर्षाचे अंतरंग दडवण्याचा प्रयत्न होतो आहे. अशाच दोन थोर विभूती म्हणजे बिर्सा मुंडा आणि लहुजी साळवे.

क्रांतिकारक लहुजी साळवे यांचा जन्म १४ नोव्हेंबर १७९४ ला पुरंदर गडाच्या पायथ्याशी असलेल्या पेठ या गावी झाला. १८१७ साली खडकी येथे पेशव्यांच्या इंग्रजांविरुद्ध झालेल्या युद्धात २३ वर्षांचे लहुजी आपल्या वडिलांबरोबर पेशव्यांच्या बाजूने लढले. या युद्धात लहुजींच्या डोळ्यांसमोर त्यांचे वडिल शहीद झाले. पेशवे युद्ध हरले. या पराभवातूनच त्यांच्या हृ्दयात स्वातंत्र्याची ठिणगी पडली. देशाच्या स्वातंत्र्यासाठी क्रांतिकारक घडवायचे असे त्यांनी ठरवले. आपल्या अंगी असलेले युद्धकौशल्य तरुणांना देण्यासाठी त्यांनी प्रशिक्षण केंद्र सरू केले. या केंद्रात सर्वच जातीजमातीतील युवक तालीम घेण्यासाठी येत असत. बाळ गंगाधर टिळक, वासुदेव बळवंत फडके, ज्योतिबा फुले, गोपाळ गणेश आगरकर, उमाजी नाईक, चाफेकर बंधू, क्रांतिभाऊ खरे यांसारख्या अनेकांनी लहुजींकडून शस्त्रविद्येचे धडे घेतले.

२० जुलै १८७९ रोजी वासुदेव बळवंत फडके ब्रिटिशांच्या तावडीत सापडले. रात्री विश्राम घेत असतानाच ब्रिटिशांनी त्यांना पकडले व त्यांच्यावर राजद्रोहाचा खटला भरण्यात आला. ७ नोव्हेंबर १८७९ रोजी त्यांना जन्मठेपेची शिक्षा ठोठावण्यात आली. लहुजींच्या मनावर हा मोठा आघात होता. वर्षभरानंतरच १७ फेब्रुवारी १८८१ रोजी पुण्याच्या संगपुरा परिसरातील एका झोपडीवजा घरात देशभक्तांच्या आणि समाजसुधारकांच्या या थोर शिक्षकाची प्राणज्योत मालवली.

महाराष्ट्रात लहुजी क्रांतिकारकांना शस्त्रांची दीक्षा देत असतानाच देशाच्या दुसऱ्या टोकाला आणखी एका क्रांतिकारकाचा जन्म झाला ज्याचे जीवन म्हणजे भारतीय स्वातंत्र्यलढ्यातील अनेकार्थांनी वेगळा आणि देदिप्यमान अध्याय ठरले आहे. त्या क्रांतिकारकाचे नाव बिर्सा मुंडा. आज बिर्सा मुंडा हे नाव अन्याय, जुलूमाविरोधात लढणाऱ्यांसाठी एक प्रेरणाचा अक्षय स्रोत बनून राहिले आहे. बिर्साचा जन्म झारखंड येथील मुंडा जमातीत १८७५ साली झाला. त्यांच्या कुटुंबाने ख्रिश्चन धर्म स्वीकारला होता. परंतु ख्रिश्चन मिशनरीसुद्धा आदिवासी समाजाला भ्रमाच्या जाळ्यात अडकवून ठेवण्याचेच काम करतात, याची जाणीव पुढे बिर्सा मुंडा यांना झाली. व्यापक समाजाने आदिवासी समाजाला मुख्य प्रवाहापासून तोडलेले होते. त्यामुळे हा समाज ज्ञानाच्या प्रकाशापासूनही वंचित राहिला होता. आस्थेच्या नावाखाली अंधविश्वासात गुरफटलेला होता. भारतीय जमीनदार – जागीरदारांच्या आणि ब्रिटीश सत्तेच्या शोषणाच्या आगीत तो होरपळत होता. अशा वेळी बिर्सा यांनी आदिवासी समाजाला जागृत आणि संघटित केले. त्यांनी या आदिवासी समाजाला शिक्षणाचा आणि सहकाराचा रस्ता दाखवला. बिर्सा यांच्या नेतृत्त्वाखाली आदिवासी समाजाने बेगारी प्रथेविरुद्ध आंदोलन पुकारले. बिर्सा यांच्या नेतृत्त्वात सुरू झालेल्या या चळवळीमुळे झाड-पाला-अंगाराची दुकाने चालवणाऱ्यांचा धंदा बंद पडला, जमीनदारांच्या घरातील-शेतातील कामे ठप्प झाली. त्याचबरोबर बिर्सा यांनी लोकांना राजकीयदृष्ट्या प्रशिक्षित केले. त्यांनी गावोगावी जाऊन अनुअः दिशोम अनुअः राज (आपला देश आपले राज्य) ची घोषणा दिली आणि संघर्ष तीव्र केला. यावेळी ब्रिटिशांनी त्याना अटक करण्याचा प्रयत्न केला परंतु गावकऱ्यांच्या मदतीने ते निसटले. मात्र काही दिवासांतच बिर्सा यांना अटक करण्यात ब्रिटिशांना यश आले. दोन वर्षांनंतर त्यांना कोणत्याही प्रकारचे प्रचारकार्य न करण्याच्या अटीवर मुक्त करण्यात आले. मात्र बिरसा शांत थोडेच बसणार होते? त्यांनी संघर्ष अधिकच तीव्र केला. १८९७ ते १९०० या काळात बिर्सा यांच्या नेतृत्त्वाखाली आदिवासी जनतेने ब्रिटिशांच्या विरोधात जबरदस्त झुंज दिली. बिर्सा आणि त्यांच्या ४०० साथीदारांनी खुंटी ठाण्यावर हल्ला केला. १८९८ मध्ये तेगा नदीच्या किनारी बिर्सा आणि त्यांच्या साथीदारांची ब्रिटिशांच्या विरोधात लढाई जुंपली व या लढाईत बिर्साच्या सैन्याने ब्रिटिशांना धूळ चारली. त्यानंतर आदिवासी नेत्यांच्या अटकेचे सत्र सुरु झाले. अनेक नेत्यांना ब्रिटिशांनी पकडून तुरुंगात डांबले. जानेवारी १९०० मध्ये डोमवाडी पहाडीवर आणखी एक चकमक झाली. त्यात अनेक स्त्रिया आणि मुलांची ब्रिटिशांनी कत्तल केली. त्यावेळी बिर्सा जवळच एका जनसभेला संबोधित करीत होते. काही दिवसांनी ३ फेब्रुवारी १९०० रोजी बिर्सा यांना चक्रधरपूर येथे अटक करण्यात आली, व ९ जून १९०० रोजी आदिवासी समाजाच्या जल-जंगल-जमीनच्या अधिकारांची घोषणा करणाऱ्या व बलाढ्य ब्रिटिश सत्तेविरुद्ध विद्रोह पुकारणाऱ्या या क्रांतिकारकाचा मृत्यू झाला. ब्रिटिशांनी त्यांना विष देऊन मारले, असे म्हटले जाते.



बिर्सा मुंडा
(१५ नोव्हेंबर १८७५ - ९ जून १९००)



लहूजी साळवे
(१४ नोव्हेंबर १७९४ - १७ फेब्रुवारी १८८१)

अन्याय्य ब्रिटिश राज्यसत्तेविरुद्ध बळाचा वापर करणाऱ्या तसेच जनतेला त्यासाठी प्रशिक्षित करणाऱ्या अनेक नायकांची स्वतंत्र भारताच्या सरकारांनीसुद्धा एक तर उपेक्षा केली किंवा त्यांचे विचार दडपून त्यांच्या फक्त मूल्यविहीन, देवतुल्य प्रतिमा उभारून त्यांचे आदर्श निःसत्त्व करण्याचे प्रयत्न केले. बिर्सा मुंडा, लहूजी साळवे, भगतसिंह यांसारखी अनेक उदाहरणे देता येतील. आणखी एक कारण आहे. उत्पीडित पार्श्वभूमीतून (आदिवासी व दलित) आल्यामुळेसुद्धा बिर्सा मुंडा आणि लहूजी यांच्यावर अन्याय झाला आहे. परंतु अशीच पार्श्वभूमी असणाऱ्या अनेकांचा स्वतंत्र भारताच्या सरकारांनी वेळोवेळी गौरव करून त्यांचे विचारसुद्धा लोकांपर्यंत घेऊन जाण्याचा प्रयत्न केलेला दिसतो. कारण त्यांच्या राजकारणाचा आशय शोषक राजकीय सत्ता बळाने नष्ट करण्यापर्यंत जाणारा नव्हता. अन्यायाच्या विरोधात बळाचा वापर करण्याच्या व बळाचा वापर सशस्त्र संघर्षापर्यंत घेऊन जाणाच्या विचाराचे शासक वर्गाला नेहमीच भय वाटत असते. स्वतंत्र भारताचा शासकवर्गसुद्धा त्याला अपवाद नाही. अन्यायाच्या विरोधात जनतेला संघटित करून बळाने या व्यवस्थेत परिवर्तन घडवून आणणे हीच बिर्सा आणि लहूजीसारख्या क्रांतिकारकांना आपली खरी श्रद्धांजली ठरू शकते.



# नाशिक व पुणे येथील दलित विरोधी अत्याचारांच्या विरोधात मंबईत प्रदर्शन

महाराष्ट्रात वाढत चाललेल्या जातीय मोर्चेबांधणीचे आणखी एक उदाहरण अलीकडेच नाशिकमध्ये पाहायला मिळाले. नाशिकमध्ये एका अल्पवयीन मुलीशी छेडछाडीच्या प्रकरणानंतर दलित वस्त्यांवर हल्ले करण्यात आले. स्टीकरां पाहून वाहने निवडून जाळण्यात आली. आठ गावांमध्ये दलितांच्या विरोधात मोठ्या प्रमाणात हिंसाचार झाला. त्यात ३० हून अधिक माणसे जखमी झाली. गंभीर जखमी कित्येक दिवस मुंबई आणि नाशिकच्या इस्पितळांमध्ये भरती होते. या एकूण प्रकरणात पोलीस आणि प्रशासनाने मूक दर्शकांची भूमिका घेतली. या घटनेच्या विरोधात १७ ऑक्टोबर रोजी अखिल भारतीय जाती विरोधी मंच आणि नौजवान भारत सभा या संघटनांनी लल्लूभाई कंपाउंड मानखुर्दच्या मुख्य चौकात निषेध सभेचे आयोजन केले.

# फासीवाद म्हणजे काय आणि त्याविरुद्ध लढायचे कसे?

गेल्या काही वर्षांपासून चालू असलेल्या खोल आर्थिक मंदीमुळे एकीकडे लाखो लोकांना आपला रोजगार गमवावा लागत असताना बहुतेक देशांमध्ये एक तर फासीवादी पक्ष सत्तेत आले आहेत किंवा बळकट तरी झाले आहेत. (जसे आपल्या देशात फासीवादी राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे निवडणुकांमध्ये प्रतिनिधित्व करणारा भाजप) असे पक्ष सत्तेत येताच कामगारांच्या अधिकारांवर जोरदार हल्ला चढवतात आणि कॉर्पोरेट घराण्यांचा नफा वेगाने वाढविणारी धोरणे बनवतात. जर्मनीत हिटलर आणि इटलीमध्ये मुसोलिनी यांना आपण इतिहासातील फासीवादाचे जनक म्हणून ओळखतो. त्यांनी लाखो-कोट्यावधी निर्दोष माणसांची कत्तल केली आणि आजसुद्धा तमाम फासीवादी त्यांना आपले गुरू मानतात. अशा परिस्थितीत, आर्थिक अरिष्ट किंवा मंदी म्हणजे नेमके काय असते, ती फासीवादाला कसा जन्म देते, फासीवाद कसा ओळखावा आणि त्याच्याशी लढण्याचा खरा मार्ग कोणता, यांसारख्या गोष्टी समजून घेणे गरजेचे आहे.

एखादा फासीवादी पक्ष सत्तेत असतो तेव्हाच फासीवादाचा धोका असतो, आणि फासीवादी पक्ष सत्तेतून बाहेर पडताच फासीवादाचा धोका टळतो, असे मानणाऱ्या लोकांची संख्या कमी नाही. २००९ च्या लोकसभा निवडणुकीत जेव्हा लालकृष्ण अडवाणी यांच्या नेतृत्त्वातील भाजप सरकारचा पराभव झाला होता, तेव्हा अनेकांचा असा गैरसमज झाला होता की फासीवादाचा धोका आता टळलेला आहे. त्यांचा समज किती बालीश होता हे स्पष्ट झालेच आहे, व आता फासीवादाचा धोका सर्वात भयंकर रूपात आपल्या डोक्यावर घिरट्या घालीत आहे. फासीवाद म्हणजे काय? हे समजून घेतल्याशिवाय आपण काही झाले तरी त्यांच्या विरोधात लढण्याचा प्रभावी मार्ग शोधून काढू शकत नाही. त्याच्या सर्वच सामाजिक-आर्थिक-राजकीय-सांस्कृतिक पैलूंची योग्य जाणीव विकसित करूनच आपण त्याला पराभूत करण्याचा एक व्यावहारिक कार्यक्रम आखू शकतो. गेल्या वर्षी मोदी सरकार सत्तेत येताच, पाच वर्षांपूर्वी फासीवादाचा धोका टळला म्हणून सांगणारे लोक रडू-विव्हळू लागले आणि फासीवाद फासीवाद म्हणून ओरडू लागले आहेत. त्यांच्या मते भाजप सत्तेत असला, तर फासीवादाचा धोका असतो आणि जर भाजप सरकार बनवू शकला नाही तर फासीवादाचा धोका टळतो! फासीवादाची एवढी बालीश समज असल्यामुळेच हे लोक फासीवादाला पराभूत करण्याचा जो कार्यक्रम तयार करतात तोसुद्धा विसंगतींनी भरलेला असाच असतो. बिहारमध्ये नुकत्याचा झालेल्या भाजपच्या पराभव म्हणजे फासीवादाचे दिवस संपत आल्याचे द्योतक आहे असे हे लोक मानत आहेत. त्यामुळे ते उत्सव साजरा करण्याच्या मनस्थितीत आहेत. बिहारसारखे महागठबंधन किंवा व्यापक डाव्या आघाडीच्या बळावर फासीवाद संपवण्याची योजना बनवणाऱ्या डॉन क्विहोतेंची सध्या कमी नाही. ते फक्त निवडणुकीच्या माध्यमातून फासीवादाला पराभूत करण्याचे शेखचिल्लीचे स्वप्न पाहत आहेत. परंतु हे खरेच शक्य आहे का? निवडणुकीच्या माध्यमातून फासीवाद संपवला जाऊ शकतो का?

या प्रश्नावर गंभीरपणे विचार करणे व फासीवाद विरोधी लढ्याला योग्य दिशा देणे आज गरजेचे आहे. अशा वेळी, हा दीर्घ लेख फासीवादाची एक सुस्पष्ट समज निर्माण करण्यास वाचकांना साहाय्यक ठरेल, असे आम्हांला वाटते. हा लेख फासीवाद निर्माण होण्याच्या आर्थिक-राजकीय कारणांवर विस्ताराने चर्चा करतो, जर्मनी आणि इटलीमधील फासीवादाच्या इतिहासाचे विश्लेषण करून महत्त्वपूर्ण निष्कर्ष काढतो, भारतातील सर्वांत मोठी फासीवादी शक्ती असलेल्या राष्ट्रीय स्वयंसेवक संघाची एकंदर जन्मकुंडली मांडतो आणि शेवटी फासीवादाशी लढण्यासाठी एक महत्त्वपूर्ण व्यावहारिक कार्यक्रम सादर करतो. फासीवादाच्या निरनिराळ्या सैद्धांतिक पक्षांवरही हा लेख प्रकाश पाडतो व इतिहासात केल्या गेलेल्या सैद्धांतिक चुकांची समीक्षासुद्धा करतो.

हा निबंध सर्वप्रथम २००९ साली कामगारांसाठी प्रसिद्ध होणाऱ्या मजदूर बिगुल या मासिक वृत्तपत्रात सहा भागांमध्ये प्रसिद्ध झाला होता. हा निबंध मुळात हिंदीत लिहिला गेला होता व या लेखाने मांडलेल्या प्रस्थापनांना गेल्या पाच वर्षांतील घटनाक्रमाने योग्य सिद्ध केले आहे.

**संपादक**

भाग - ३
लेखक : अभिनव
मराठी अनुवाद : अमित शिंदे

### इटलीमध्ये फासीवाद

इटलीमधील फासीवादाची विस्तृत चर्चा येथे करण्याचे काही कारण नाही. इटलीतील फासीवादाचा उदय जर्मनीतील फासीवादी उदयाहून वेगळा कोणत्या कारणांमुळे होता, ते फक्त येथे आपण समजून घेऊ.

इटलीमध्ये फासीवादी आंदोलनाची सुरुवात १९१९ मध्ये झाली. युद्धाच्या समाप्तीनंतर इटलीच्या मिलान शहरामध्ये बेनिटो मुसोलिनीने सभा घेऊन फासीवादी आंदोलनाची सुरुवात केली. ह्या सभेला जेमतेम १०० लोक जमले. त्यापैकी बहुतेक युद्धात भाग घेतलेले तरुण सैनिक होते. पहिल्या महायुद्धात मित्र राष्ट्रांच्या बाजूने युद्धात भाग घेऊनही इटलीला त्याचा योग्य मोबदला मिळाला नाही. युद्धात इटलीला मोठे नुकसान मात्र सहन करावे लागले. त्यामुळे संपूर्ण देशात, खास करून सैनिकांमध्ये एक प्रतिक्रियेचे वातावरण तयार झाले होते. दुसरीकडे, देशाची आर्थिक स्थिती मोडकळीस आली होती. सरकार एकदम निष्प्रभ आणि कमकुवत झाले होते. कुठलीही पाउले उचलण्यास सरकार असमर्थ बनले होते. अशा वेळी मुसोलिनीने फासीवादी आंदोलनाची सुरुवात केली. फासीवाद हा मार्क्सवाद, उदारमतवाद, शांततावाद आणि स्वातंत्र्य ह्यांचा उघड शत्रू आहे, अशी घोषणाच या सभेत मुसोलिनीने केली. राज्यसत्तेची सर्वोच्चता, उग्र राष्ट्रवाद, वांशिक श्रेष्ठत्व, युद्ध, नायकवाद, पावित्र्य आणि अनुशासन ह्या मूल्यांवर फासीवादाचा दांडगा विश्वास होता. आर्थिक आणि सामाजिकदृष्ट्या विस्कळीत, असुरक्षितता आणि अनिश्चिततेने ग्रासलेल्या राष्ट्रांना अश्या गोष्टी आकृष्ट करतात. जेव्हा कुठलीही क्रांतिकारी शक्यता दिसत नसते, तेव्हा तर जास्तच. फासीवादाच्या सामाजिक आणि आर्थिक आधारांची चर्चा आपण पुढे करूयात. तत्पूर्वी त्याच्या वैचारिक आधारांबद्दल थोडेसे. मुसोलिनी सुरुवातीस इटलीच्या समाजवादी पक्षात होता. १९०३ ते १९१४ पर्यंत तो समाजवादी पक्षाचा एक महत्त्वपूर्ण नेता होता. त्यानंतर तो जॉर्ज सोरेल नावाच्या संघाधिपत्यवादी विचारवंताच्या प्रभावाखाली आला. संसदीय लोकशाही असू नये आणि श्रम संघांच्या माध्यमातून सरकार चालवले गेले पाहिजे, असे या विचारवंताचे मत. मुसोलिनीवर दुसरा मोठा प्रभाव होता तो फ्रेडरिक नित्शे नामक जर्मन विचारवंताचा. त्याच्या मते मानवी इतिहासामध्ये सत्ता प्राप्त करण्याची इच्छाशक्ती असलेल्या अतिमानवांची आणि नायकांची भूमिका केंद्रस्थानी असते. ह्या सर्व विचारांची भेसळ करून जेण्टाइल नामक फासीवादी विचारवंताच्या माध्यमातून मुसोलिनीने फासीवादी विचारसरणी उभारली. कामगार विरोध, भांडवलाच्या बाजूची खुली हुकूमशाही, अधिनायकवाद, लोकशाही विरोध, कम्युनिजम विरोध आणि साम्राज्यवादी विस्ताराचा उघड पुरस्कार अशा तत्त्वांनी बनलेली अशी ही विचारसरणी होती.

परंतु ही विचारसरणी जेण्टाइल वा मुसोलिनीच्या मेंदूची निर्मिती मात्र नव्हती. जेण्टाइल किंवा मुसोलिनी नसते तर दुसऱ्या कुणीतरी त्यांची जागा घेतली असती. कारण अशा प्रतिक्रियावादी विचारांसाठी अनुकूल परिस्थिती समाजातच मुळात अस्तित्त्वात होती. ही परिस्थिती समजून घेऊनच इटलीमधील फासीवादाचा उदय समजून घेतला जाऊ शकतो.

जर्मनीप्रमाणेच इटलीमध्येही भांडवली विकास उशिरा सुरू झाला. इटलीचे एकीकरण १८६१ ते १८७० च्या दरम्यान पूर्ण झाले. तोपर्यंत इंग्लंड, फ्रांस आणि हॉलंडसारख्या देशांनी भांडवली विकासाचा एक मोठा प्रवास पूर्ण केला होता आणि औद्योगिक क्रांतीसुद्धा संपन्न केली होती, हे आपण मागील प्रकरणात पाहिले आहे. ह्या देशांमध्ये आमूलगामी जमीन सुधारणा पूर्ण झाल्या होत्या. भांडवली विकास एका दीर्घ प्रक्रियेमधून पूर्ण झाला होता. त्यामुळे त्यातून निर्माण झालेला सामाजिक दबाव लोकशाहीच्या चैकटीत राहूनच झेलणे भांडवली व्यवस्थेला शक्य होते. इटलीमध्ये औद्योगिकीकरणाची सुरुवात १९८० च्या दशकात झाली आणि जर्मनी प्रमाणेच तिथेसुद्धा त्याच्या विकासाचा वेग प्रचंड होता. जर्मनीच्या तुलनेत इटलीमधील भांडवली विकासात क्षेत्रीय असमतोल होता. उत्तर इटलीच्या मिलान, तुरीन आणि रोम ह्यांच्यातील त्रिभुजाकार प्रदेशामध्ये उद्योगधंद्यांचा प्रचंड विकास झाला आणि त्याचबरोबर तिथे कामगार चळवळ सुद्धा फोफावली. सुरुवातीस ह्या चळवळीचे नेतृत्व इटलीची समाजवादी पार्टी करत होती, परंतु नंतर ह्या चळवळीमध्ये इटलीच्या कम्युनिस्ट पक्षानेसुद्धा स्थान मिळवले. इटलीच्या उत्तर भागामध्ये काही प्रमाणात भूमी


**मुसोलिनी आणि हिटलर**

सुधारणासुद्धा लागू झाल्या आणि शेतीचे व्यापारीकरण झाले. त्यातून शेतीमध्ये भांडवली विकास झाला. याचा परिणाम म्हणून औद्योगिक आणि कृषी क्षेत्रामध्ये कामगार चळवळीचाही विकास झाला. दुसरीकडे, दक्षिण इटलीमध्ये सामंती (सरंजामी) उत्पादन संबंध कायम राहिले. इथे कोणत्याही भूमी सुधारणा लागू झाल्या नव्हत्या. तेथे मोठमोठाल्या जहागिरी अस्तित्वात होत्या. त्यांची मालकी मोठ्या जमीन मालकांकडे होती. शिवाय, लहान शेतकरी आणि भूमिहीन शेतमजुरांची एक मोठी लोकसंख्या होती. ती ह्या मोठ्या जमीन मालकांच्या नियंत्रणाखाली होती. हे जमीन मालक खाजगी सशस्त्र टोळ्यांच्या माध्यमातून हे नियंत्रण टिकवून होते. ह्याच टोळ्यांना इटलीमध्ये माफिया म्हटले जात असे. पुढे ते एक स्वायत्त शक्ती बनले आणि पैशासाठी लुटमार, खून करू लागले. फासीवाद्यांनी ह्या माफिया टोळ्यांचा पुरेपूर वापर करून घेतला. दक्षिण इटलीमध्ये औद्योगिक विकास नसल्यासारखाच होता. हा फरक असूनही, किंवा हा फरक असल्यामुळेच, असे म्हणूया, फासीवाद्यांना दोन वेगवेगळ्या प्रतिक्रियावादी वर्गांचे पाठबळ मिळाले. हे कसे शक्य झाले यावर आपण नंतर चर्चा करू. मुसोलिनी सत्तेत कसा आला, अगोदर ती प्रक्रिया समजून घेऊ.

स्वतःचे साम्राज्य इरीट्रिया पासून इथियोपियापर्यंत पसरवण्याच्या प्रयत्नात अडोवा येथे १८९६ साली इटलीला एक लाजिरवाणा पराभव पत्करावा लागला. त्यामुळे देशामध्ये ४ वर्ष भयंकर अस्थिरतेचे वातावरण तयार झाले. परंतु १९०० ते १९१४ दरम्यान उदारमतवादी भांडवली पंतप्रधान गियोवन्नि गियोलिटी यांच्या नेतृत्वाखाली थोडेसे स्थैर्य प्राप्त झाले आणि इटलीतील औद्योगिक विकासाने थोडीशी गती घेतली. १९१३ मध्ये सार्विक मताधिकाराच्या आधारे इटलीत सार्वत्रिक निवडणुका घेण्यात आल्या. परंतु ही लोकशाही संसदीय व्यवस्था तिच्या बाल्यावस्थेतच असताना इटलीने मित्र राष्ट्रांच्या बाजूने पहिल्या जागतिक महायुद्धात भाग घेतला. त्यानंतर इटलीमध्ये निर्माण झालेल्या अस्थिरतेमुळे संसदीय व्यवस्था मूळ धरू शकली नाही. १९१७ मध्ये कापोरेट्टो येथे इटली पराभूत होता होता बचावली. युद्धानंतर फारसे काही इटलीच्या हाती लागले नाही. त्यामुळे देश विभागलेला होता. इटलीचे आर्थिक दृष्ट्या छिन्नविच्छिन्न होणे हे सुद्धा याचे एक कारण होते. १९१९ झालेल्या निवडणुकांमध्ये कुठल्याही पक्षाला पूर्ण बहुमत मिळाले नाही.

समाजवादी आणि उदारमतवाद्यांना सर्वाधिक मते मिळाली, परंतु ते एकत्र सरकार बनवण्यास तयार नव्हते. समाजवाद्यांनी बोल्शेविक क्रांतीच्या प्रभावामुळे वेळेच्या अगोदरच सशस्त्र संघर्ष सुरू केला. १९१९-१९२० च्या दरम्यान इटलीच्या पो पर्वत रांगांमध्ये हा संघर्ष बराच पुढे गेला होता. समाजवाद्यांनी बऱ्याच शहरांवरती एक प्रकारे ताबा मिळवला होता. इटली गृहयुद्धाच्या वाटेवर असे, असेच वाटत होते. परंतु विद्रोहावर नियंत्रण ठेवण्यासाठी समाजवाद्यांनी ना स्वतःला तयार केले होता, ना जनतेला. त्यामुळे हा विद्रोह मोडून काढण्यात आला. हा विद्रोह चिरडण्यात भांडवली राज्यसत्तेची भूमिका होतीच, पण त्याच बरोबर फासीवादी सशस्त्र टोळ्यांनीसुद्धा या कामात महत्वपूर्ण भूमिका बजावली. १९१९ च्या निवडणुकांमध्ये फासीवाद्यांना उल्लेखनीय यश मिळाले नव्हते. परंतु १९१९-२० च्या कामगारांच्या विद्रोहाने मालमत्ताधारी वर्गाच्या मनात एक भीती निर्माण केली होती. रशियामध्ये

पान ९ वर

# फासीवाद म्हणजे काय आणि त्याविरुद्ध लढायचे कसे?

पान ८ वरून

जे झाले त्याचे उदाहरण त्यांच्यासमोर होते. अशा वेळी कामगारांच्या विद्रोहाला दडपून टाकण्यासाठी पर्यायी एकजूट उभारू शकेल, अशा शक्तीची त्यांना गरज होती. मुसोलिनीने त्याची हमी दिली. उद्योगपतींनी समर्थन दिले तर औद्योगिक अनुशासन, शिस्त पुन्हा स्थापित करण्याची हमी त्यांना मुसोलिनीने दिली. त्यानंतरच मुसोलिनीला उद्योगपतींकडून मोठ्या प्रमाणात आर्थिक मदत मिळू लागली. या मदतीच्या आधारे फासीवाद्यांनी जबरदस्त प्रचार केला आणि जनतेच्या डोक्यात विष भिनवले. शहरांमध्ये फासीवाद्यांच्या सशस्त्र टोळ्यांनी कामगार कार्यकर्ते, ट्रेड युनियनिस्ट, कम्युनिस्ट आणि संपकऱ्यांवर हल्ले करावयास आणि नंतर त्यांच्या हत्या करण्यास सुरुवात केली. फासीवाद आपल्या सर्व शक्तीनिशी भांडवलदारांच्या आणि त्यातही मोठ्या भांडवलदारांच्या सेवेत रुजू झाला होता.

दक्षिण इटली मध्ये जमिनींच्या मोठ्या तुकड्यांचे मालक स्वबळावर फासीवादी पद्धतीने शेतकरी आणि भूमिहीन शेतमजुरांचे संघर्ष चिरडून टाकू लागले. फासीवाद्यांची ही जमात लवकरच मुसोलिनीला जाऊन मिळाली आणि जमिनीच्या मोठ्या पट्ट्यांचे मालक शेतकरी मुसोलीनीचे कट्टर समर्थक म्हणून पुढे आले. १९२० च्या शेवटी अजून एका प्रतिस्पर्धी फासीवादी संघटनेचा प्रमुख गाब्रियेल दश्अनुंसियो मुसोलिनीच्या फासीवादी प्रवाहात येऊन मिळाला. इटलीच्या समाजवादी पक्षाचा तयारीशिवाय केलेला विद्रोह १९२१ पर्यंत मोडून काढण्यात आला. शहरांमध्ये कायम झालेले कामगार नियंत्रण सुयोग्य योजना आणि सशस्त्र तयारीशिवाय मोडून काढण्यात आले होते. फासीवादी आंदोलनाचे वर्चस्व स्थापित झाले होते. १९२२ मध्ये मुसोलिनीने नेपल्समध्ये फासीवादी पक्षाच्या वार्षिक सभेत रोमवर चढाई करण्याचा निर्णय घेतला. फासीवादी सशस्त्र टोळ्यांनी रोमवर चढाई सुरू केली. तत्कालीन राजा विक्टर इमन्युएल (तिसरा) ने गुडघे टेकले आणि मुसोलिनीला सरकार स्थापन करण्यासाठी पाचारण केले. अशा प्रकारे मुसोलिनी १९२२ मध्ये इटलीचा पंतप्रधान झाला. त्याने स्थापन केलेल्या आघाडी सरकारमध्ये इटलीतील संशोधनवादीसुद्धा सहभागी झाले होते. याचे आश्चर्य वाटण्याचे कारण नाही. ते मुसोलिनीला उदारमतवादी बनवू शकतील, असा त्यांना भरवसा वाटत होता. त्यांची ही इच्छा किती मूर्खपणाची होती, हे इतिहासाने दाखवून दिले आहे.

१९२४ च्या निवडणुकांमध्ये फासीवादी पक्षाला ६५ टक्के मते मिळाली. परंतु, हे दोन तृतियांश बहुमत फासिवाद्यांनी निवडणुकांमध्ये घोटाळे करून आणि बळाचा उपयोग करून मिळवले होते, हे सामाजिक लोकशाहीवादी नेता मात्तिओत्तीने संसदेत पुराव्यानिशी हे सिद्ध केले. मात्र फासीवाद्यांनी संसदेमध्ये गोंधळ घालून त्यांना पुढे बोलू दिले नाही. दोन महिन्यांनंतर फासीवाद्यांनी मात्तिओत्तीची चाकूने भोसकून हत्या केली. लवकरच मुसोलिनीला विरोध करण्याची हिम्मत करणाऱ्या सगळ्यांची हीच गत करण्यात आली. १९२५ मध्ये मुसोलिनीने हुकूमशाही स्थापित करण्याची प्रक्रिया खुलेपणाने सुरू केली. एक-एक करून सर्व पक्षांवर बंदी घालण्यात आली. नोव्हेंबर १९२६ मध्ये "अपवादस्वरुपात लागू केलेल्या कायद्याच्या" माध्यमातून ही प्रक्रिया पूर्णत्वास गेली. त्यानंतरच्या १७ वर्षांत मुसोलिनीने त्याच्या सर्व राजकीय प्रतिस्पर्ध्यांना संपवण्याचे काम केले. त्याने विरोधी शक्तींना अजिबात डोके वर काढू दिले नाही.

फासीवादी सत्ता सुदृढपणे स्थापन झाल्यानंतर कामगाराचा प्रतिरोध क्रूरपणे मोडून काढण्यात आला. दिखाव्यासाठी उद्योगांचे मालक आणि कामगारांचे संघ स्थापन करण्यात आले. त्यांत फासीवादी पक्षाचे लोकही असत. ह्या संघांकडे उत्पादन कीती असावे, कसे करावे आणि कोणासाठी करावे हे ठरवण्याचे अधिकार होते. पण हा केवळ दिखावा होता. वास्तविक पाहता कामगार प्रतिनिधी ह्या संघांमध्ये काहीही बोलू शकत नव्हते. सर्व निर्णय भांडवलदार वर्गाचे प्रतिनिधी फासीवाद्यांच्या सोबत मिळून घेत असत. कामगारांचा एक हिस्सा फासीवाद्यांनी स्वतःबरोबर घेतला होता. त्यामुळे कामगार कुठलाही प्रतिकार संघटित करू शकत नव्हते. कामगारांना स्वतः बरोबर घेण्यासाठी फासीवाद्यांनी कामगारांमध्ये काही सुधारकार्ये केली आणि त्यांच्या मनोरंजनासाठी क्लब उभारले. त्याच बरोबर त्यांच्यामध्ये आर्थिक सहकार्य स्थापन करण्यासाठी संघटना उभ्या केल्या. त्यांचा फायदा १० ते १५ टक्के कामगारांना मिळायचा. परंतु कामगार वर्गाच्या छोट्याश्या हिश्शाला भ्रामक आणि जुजबी फायदा पोहोचवून आणि कामगार वर्गाच्या एका मोठ्या हिश्शाला ह्या फायद्याचे आमिष दाखवून कामगारांची वर्गजाणी आणि एकजूट तोडण्यात फासीवादी यशस्वी झाले. म्हणूनच अशा मालक आणि कामगारांच्या संघांमध्ये कामगारांचे अतोनात शोषण होऊनही त्याविरुद्ध कुठलाही प्रभावी प्रतिरोध होऊ शकला नाही. नंतर संप करण्यावर बंदी घालण्यात आली. कुठल्याही प्रकारची निदर्शने आणि मेळावे करणे हा गुन्हा ठरवण्यात आला. ट्रेड युनियन्सवर बंदी घालण्यात आली आणि त्यांच्या जागी भांडवलदारांचे पाय चाटणारे कामगार संघ बनवण्यात आले. त्यांच्यामध्ये अर्थातच फासीवाद्यांचा भरणा होता. वर्ग सहयोगाच्या नावाखाली फासीवाद्यांनी पगारी श्रमाची गुलामगिरी अधिकच वाढवली आणि कामगारांना भांडवलदारांचे जास्तच गुलाम बनवले.

***फासीवादी सत्ता सुदृढपणे स्थापन झाल्यानंतर कामगाराचा प्रतिरोध क्रूरपणे मोडून काढण्यात आला. दिखाव्यासाठी उद्योगांचे मालक आणि कामगारांचे संघ स्थापन करण्यात आले. त्यांत फासीवादी पक्षाचे लोकही असत. ह्या संघांकडे उत्पादन कीती असावे, कसे करावे आणि कोणासाठी करावे हे ठरवण्याचे अधिकार होते. पण हा केवळ दिखावा होता. वास्तविक पाहता कामगार प्रतिनिधी ह्या संघांमध्ये काहीही बोलू शकत नव्हते. सर्व निर्णय भांडवलदार वर्गाचे प्रतिनिधी फासीवाद्यांच्या सोबत मिळून घेत असत. कामगारांचा एक हिस्सा फासीवाद्यांनी स्वतःबरोबर घेतला होता. त्यामुळे कामगार कुठलाही प्रतिकार संघटित करू शकत नव्हते.***

इटलीच्या फासीवाद्यांना भांडवली शेतकरी वर्गाचेसुद्धा जबरदस्त समर्थन मिळालेले होते. अगोदर सांगितल्याप्रमाणे उत्तर इटलीमध्ये भांडवली शेतीचा विकास झाला होता आणि तेथे संपन्न आणि प्रगत असा भांडवली शेतकरी अस्तित्वात आला होता. पण त्याच बरोबर गरीब शेतकरी आणि भूमिहीन शेतमजुरांचे एक आंदोलन कम्युनिस्ट आणि समाजवाद्यांच्या नेतृत्वाखाली विकसित झाले होते. संघटित छोटे शेतकरी आणि शेतमजुरांच्या संघर्षामुळे नफ्याचा दर खालावत चालला होता. ह्यातून मार्ग काढण्यासाठी भांडवलदारांना राज्यसत्तेच्या समर्थनाची आवश्यकता होती. परंतु इटलीचे एकीकरण झाल्यानंतरची उदारमतवादी भांडवली राज्यसत्ता इतकी प्रबळ नव्हती की ती भांडवलदारांच्या बाजूने कुठलेही उघड दमनात्मक पाउल उचलू शकेल. त्यामुळे इथे फासीवाद्यांच्या उदयास अनुकूल अशी परिस्थिती येथे अस्तित्वात होती. फासीवाद्यांनी ह्या भांडवली शेतकरी वर्गाला शेतमजुरांच्या आंदोलनावर नियंत्रण मिळवून देण्याची हमी दिली. त्या बदल्यात त्यांना मोठ्या भांडवली शेतकरी वर्गाचे समर्थन प्राप्त झाले. राज्यसंस्थेच्या हस्तक्षेपाची जागा फासीवाद्यांच्या नंग्या हस्तक्षेपाने घेतली. दक्षिण इटलीमधील मोठ्या जमिनींचे मालक असलेल्या वर्गाला फासीवाद्यांच्या समर्थनाची गरज नव्हती. कारण ते सर्व प्रकारचे फासीवादी उपाय आणि हिंस्त्र हल्ले स्वतःच्या माफिया टोळ्यांच्या माध्यमातून करत असत आणि गरीब शेतकरी, काश्तकार जनता आणि शेतमजुरांना दडपून टाकत असत. हा जमिनींच्या मोठ्या पट्ट्यांचा मालक वर्गसुद्धा फासीवाद्यांचा जबरदस्त समर्थक बनला.

इटली मधील फासीवाद्यांच्या उदयाची पार्श्वभूमी आणि प्रक्रिया यांच्या विश्लेषणानंतर हे स्पष्ट आहे की इथेही फासीवाद्यांच्या उदयाची कारणे कमी-अधिक प्रमाणात जर्मनीमधील फासीवाद्यांच्या उदयाच्या कारणांसारखीच होती. जर्मनीमध्ये फासीवाद्यांच्या उद्याचा कालानुक्रम वेगळा होता परंतु तरीही त्यामागील प्रेरक शक्ती जवळपास सारख्याच होत्या.

फासीवादाच्या उदयासाठीची परिस्थिती नेहमीच भांडवली विकासामधून निर्माण होणाऱ्या बेरोजगारी, गरिबी, भूक, अस्थिरता, असुरक्षितता, अनिश्चितता आणि आर्थिक संकट यांतून तयार होत असते. ज्या देशांमध्ये भांडवली विकास हा क्रांतिकारी प्रक्रियेमधून न होता एका विकृत, उशिराने झालेल्या कुंठित प्रक्रियेतून झालेला असतो, तेथे फासीवादी प्रतिक्रिया निर्माण होण्याची शक्यता जास्त असते. जर्मनी आणि इटली जगतिक इतिहासाच्या पटलावर उशिराने अस्तित्वात आलेली राष्ट्रे होती. ह्या देशांमध्ये एकीकृत भांडवलशाही आणि तिच्याबरोबरच जन्म घेणारा अंधराष्ट्रवाद अस्तित्वात आला तेव्हा जागतिक पातळीवर भांडवलशाही तिच्या अत्युच्च अवस्थेमध्ये - साम्राज्यवाद- म्हणजेच एकाधिकारी भांडवलशाहीमध्ये पोहोचली होती. त्यामुळे ह्या दोन्ही देशांमध्ये भांडवलशाही विकास अत्यंत वेगाने झाला. त्याने सर्वसाधारण कष्टकरी जनता आणि मध्यम वर्गाला इतक्या वेगाने उध्वस्त केले की त्यांचा दबाव झेलण्याची क्षमता ह्या देशांमधील अर्धविकसित लोकशाहीमध्ये नव्हती. दुसरीकडे, जगातिक महामंदीने ह्या दोन्ही देशांमधील भांडवली वर्गाची अवस्था बिकट करून ठेवली होती. भांडवलदार वर्ग आता उदार भांडवलशाही आणि त्याच्या अंतर्गत राबवल्या जाणाऱ्या कल्याणकारी योजनांचा खर्च उचलण्यास अजिबात तयार नव्हता. तो कामगारांना आता त्यांचे श्रम अधिकार देण्यासही तयार नव्हता. ह्यासाठी सर्व लोकशाही अधिकारांचे दमन आणि कामगार आंदोलनाचा बिमोड करणे गरजेचे होते. कामगार आंदोलनाला एका प्रतिक्रियावादी आंदोलनाच्या मदतीनेच चिरडले जाऊ शकत होते. जर्मनीमध्ये नात्झी पक्ष आणि इटलीमध्ये फासीवादी पक्षाने हे प्रतिक्रियावादी आंदोलन निम्न भांडवलदार वर्ग, लंपट सर्वहारा वर्ग, श्रीमंत आणि मध्यम शेतकरी वर्गाच्या प्रतिक्रियेवर स्वार होत उभे केले. परंतु फासीवादाच्या उदयाने निम्न भांडवलदार वर्ग, लंपट सर्वहारा आणि मध्यम शेतकऱ्यांना काहीही मिळवून दिले नाही, असे इतिहास सांगतो. पुढे चालून त्यांचेही दमन केले गेले. वास्तविक पाहता फासीवादाने नेहमीच मुख्यत्वे दोनच वर्गांना फायदा पोहोचवला. कारण फासीवाद ह्या दोनच वर्गांचा प्रतिनिधी होता - वित्तीय आणि औद्योगिक मोठा भांडवलदार वर्ग आणि श्रीमंत शेतकरी, कुलक आणि मोठ्या शेतकऱ्यांचा वर्ग म्हणजेच मोठा भांडवलदार शेतकरी वर्ग. पण तत्कालीन परिस्थितीमध्ये दुसरा कुठलाही मार्ग इतिहासासमोर नव्हता, असे मात्र नाही. उलट, अशा देशांमध्ये भांडवली संकट निर्माण झाल्यावर क्रांतिकारी शक्यता आणि प्रतिक्रियावादी शक्यता, दोन्ही समान प्रमाणात अस्तित्वात असतात. इटली आणि जर्मनी ह्या दोन्ही देशांमध्ये फासीवादाच्या उदयाचे सर्वात मोठे कारण कामगार वर्गाशी दगाफटका केलेल्या सामाजिक-लोकशाहीवाद्यांचे उद्योग हे होते. ह्या दोन्ही देशांमध्ये क्रांतिकारी शक्यता पुरेपूर उपस्थित होत्या. परंतु सामाजिक-लोकशाहीवाद्यांनी कामगार चळवळीला अर्थवाद, सुधारवाद, संसदवाद आणि ट्रेड युनियनवादाच्या चैकटीत बंदिस्त करून टाकले. जर्मनीमध्ये संपूर्ण कामगार चळवळ सर्वाधिक संगठित होती, पण ती फक्त दबाव टाकण्याचे साधन बनून राहिली. भांडवलशाहीचे संकट भांडवलशाहीच्या पर्यायाची मागणी करत असताना, ही चळवळ मिळवलेल्या लोकशाही हक्कांना चिकटून बसली. कुठल्याही क्रांतिकारी पर्यायाच्या अभावी ही क्रांतिकारी शक्यता प्रतिक्रियावादाच्या मार्गावर गेली. जर्मनीमध्ये नात्झी पक्ष आणि इटलीमध्ये फासीवादी पक्ष त्यासाठी टपूनच बसले होते.

**जिथे भांडवलशाही भांडवली लोकशाही क्रांतीच्या माध्यमातून आली नसून विशिष्ट प्रकारच्या क्रमिक प्रक्रियेमधून अस्तित्वात आली आहे, जिथे क्रांतिकारी भूमी सुधारणा लागू झालेल्या नाहीत, जिथे भांडवलशाहीचा विकास हा दीर्घकालीन, सुव्यवस्थित आणि समाजात मुरलेल्या लोकशाही प्रक्रियेमधून झाला नसून असामान्य रूपात अव्यवस्थित, अराजक आणि वेगवान प्रक्रियेमधून झालाय, जिथे ग्रामीण भागांमध्ये सामंती अवशेष कुठल्या न कुठल्या रुपात शिल्लक आहेत, अशा देशांमध्ये फासीवादी प्रतिक्रिया निर्माण होण्याची शक्यता नेहमीच जागी असते,** असा निष्कर्ष आपण काढू शकतो. अशा सर्व देशांमध्ये भांडवली संकट अतिशय वेगाने उलाथापालथीची परिस्थिती निर्माण करू शकते. समाजामध्ये बेरोजगारी, गरिबी, अनिश्चितता आणि असुरक्षितता तयार होणे आणि करोडो लोकांचे आर्थिक, सामाजिक आणि भौगोलिकदृष्ट्या उध्वस्त होणे अतिशय वेगाने होते. अशात तयार होणाऱ्या परिस्थितीला एक तावून सुलाखून तयार झालेली क्रांतिकारी पार्टीच क्रांतिकारी दिशा देऊ शकते. **अशी परिस्थिती अटळपणे फासीवादाच्या उदयास कारणीभूत ठरत नाही. फासीवादाचा उदय नेहमीच सामाजिक-लोकशाहीवाद्यांचा घृणित विश्वासघात आणि क्रांतिकारी कम्युनिस्टांच्या अकुशलतेमुळे शक्य झाला आहे. जर्मनी आणि इटली दोन्ही देश ह्याचीच साक्ष देतात.**

**पुढील अंकात आपण भारतातील फासीवादी उभाराचा इतिहास वाचू तसेच भारतात फासीवादाच्या विरुद्ध लढण्याच्या क्रांतिकारी मार्गांचा विचार करणार आहोत. आज सर्व क्रांतिकारी शक्तींच्या समोर असलेल्या सर्वांत जीवंत आणि ज्वलंत प्रश्नांपैकी हा एक आहे.**

# ऑक्टोबर क्रांतीच्या स्मृतींतून प्रेरणा घ्या

पान १ वरून

लुधियानातील टेक्सटाइल पट्ट्यातील कामगार, दिल्लीच्या इस्पात कामगारांपासून तिरुपूर आणि यनमचे कामगार आणि चेन्नईच्या आटोमोबाइल कामगारांपासून केरळमधील मुन्नारचे चहा मळ्यातील कामगार गेल्या काही वर्षापासून रस्त्यावर उतरत आहेत. अशा खळबळजनक काळात आपण ऑक्टोबर क्रांतीच्या शताब्दी वर्षात पदार्पण करीत आहोत. **अशा वेळी ऑक्टोबर क्रांतीचे स्मरण कामगार वर्गाने नेमके कशासाठी करायचे? त्यासाठी अगोदर ऑक्टोबर क्रांतीमध्ये नेमके काय झाले होते ते थोडक्यात समजून घेतले पाहिजे. कारण आज असंख्य कामगार आपल्या या महान जागतिक वारशाबद्दल अनभिज्ञ आहेत.**

## महान ऑक्टोबर क्रांतीत नेमके काय झाले?

१९१७ साली रशियामध्ये एक असे परिवर्तन झाले ज्याने जगाच्या इतिहासाला नवे वळण दिले. एक नवे युग सुरु झाले. विसाव्या शतकाच्या पहिल्या दशकापासूनच जागतिक भांडवलशाही संकटाला तोंड देत होती. युरोपमधील वेगवेगळे साम्राज्यवादी देश जगभरातील कष्टकरी जनतेच्या आणि गुलाम राष्ट्रीयतांच्या लुटीमध्ये हिस्सेदारीसाठी आपापसात झगडत होते. त्या वेळेपर्यंत ब्रिटन साम्राज्यवादी जगातील सर्वात प्रमुख शक्ती होता. फ्रान्स हा दुसरी महत्त्वाची वसाहतवादी साम्राज्यवादी शक्ती होता. परंतु एकोणिसावे शतक संपता संपता जर्मनी वेगाने एक प्रमुख आर्थिक शक्ती बनून पुढे आला. दुसरीकडे संयुक्त राज्य अमेरिकेचासुद्धा सर्वात मोठ्या औद्योगिक शक्तीच्या रूपात उदय झालेला होता. परंतु जर्मनीकडे आपल्या विपुल भांडवलाच्या गुंतवणुकीसाठी आणि त्याचबरोबर स्वस्त कच्चा माल आणि स्वस्त श्रमाच्या लाटण्यासाठी वसाहती नव्हत्या. जर्मनीच्या वाढत्या आर्थिक बळाने त्याला ब्रिटन आणि फ्रान्सच्या विरोधात उभे केले. या वाढत्या सम्राज्यवादी प्रतिस्पर्धेचा परिणाम म्हणून १९१४ मध्ये जगाच्या पुनर्विभाजनासाठी पहिल्या महायुद्धाला तोंड फुटले.

एका बाजूला जर्मनी, आस्ट्रिया आणि हंगेरी होते तर दुसरीकडे ब्रिटन, फ्रान्स, अमेरिका आणि रशिया. रशिया हा त्या वेळी एक मागास साम्राज्यवादी देश होता. तो पूर्व युरोपच्या मागास देशांसाठी एक साम्राज्यवादी देश होता. परंतु स्वतः ब्रिटीश, फ्रेंच आणि अमेरिकी वित्तीय भांडवलाच्या वर्चस्वाच्या अधीन होता. रशियामध्ये अजून जारची राजेशाही होती. पहिल्या महायुद्धामध्ये त्याने मित्र शक्ती म्हणजेच ब्रिटन, फ्रान्स आणि अमेरिकेच्या बाजूने भाग घेतला. रशियाची मागास अर्थव्यवस्था आणि सैन्य शक्ती युद्धामध्ये जर्मनीच्या उन्नत सैन्य बळाचा मुकाबला करण्यास अपुरी होती. लवकरच वेगवेगळ्या मोर्चांवर रशियाचा पराभव होऊ लागला. रशियाच्या सैनिकांकडे ना पुरेशा बंदुका होत्या, ना पुरेसे अन्नधान्य. युद्धाचा खर्च रशियाच्या अर्थव्यवस्थेला परवडणारा नव्हता आणि लवकरच देशात खाद्यान्नाच्या तुटवड्याचे संकट निर्माण झाले. सैनिकांची मोठी संख्या शेतकरी कुटुंबांतून आलेली होती. खरे तर गणवेशांच्या आत शेतकरीच होते. रशियामध्ये शेतकऱ्यांची अवस्थासुद्धा भीषण होती. भूदास प्रथेचे कायद्याने १८६१ सालीच उच्चाटन झाले होते, परंतु तिचे अवशेष बऱ्यापैकी टिकून होते. शेतकऱ्यांना भूमीचे वाटप करण्यात आले नव्हते आणि देशातील बहुतेक शेतीयोग्य जमीन एक तर जारच्या मालकीची होती किंवा चर्च आणि मोठ्या जमीनदारांच्या मालकीची. जी भूमी ग्राम समुदायाकडे होती तिच्या चक्रीय वाटपाचा निर्णयसुद्धा मोठे श्रीमंत शेतकरी आणि कुलकच घेत होते आणि प्रत्येक व्यावहारिक मामल्यात या जमिनीवर त्यांचेच नियंत्रण होते. जारची सत्ता युद्धाचे ओझे शेतकऱ्यांच्या पाठीवर टाकत होती आणि भूस्वामींनी शेतकऱ्यांवर दबाव वाढवला होता. जी काही संसाधने होती ती युद्धाच्या मोर्च्यांवर उधळली जात होती.

कामगारांची अवस्थासुद्धा वेगळी नव्हती. अन्नाच्या संकटामुळे शहरांमध्ये अन्नाचा भयंकर तुटवडा झाला. कामगारांना जेवणसुद्धा मिळेनासे झाले होते. कामगारांच्या कामाचे तास १२ वरून १४ होणे ही एक सामान्य बाब होती. पोटभर अन्न मिळण्याइतपतसुद्धा मजुरी मिळेनाशी झाली होती. काही कामगारांना थोडा बरा पगार मिळत होता परंतु अन्नाचा भयंकर तुटवडा आणि अन्नाच्या वाढत्या किमतींमुळे त्यांनासुद्धा पुरेसे अन्न मिळत नव्हते. देशाची जवळपास ८५ टक्के जनता ही गरीब आणि मध्यम शेतकऱ्यांची होती आणि कामगारांची लोकसंख्या १० टक्के. कामगारांना अधिक चांगली कार्यपरिस्थिती, चांगली मजुरी आणि पोटभर अन्न हवे होते आणि शेतकऱ्यांना जमीन हवी होती. कामगार आणि शेतकरी या दोघांनाही युद्धापासून सुटका हवी होती. १९१७ साल उजाडेपर्यंत सामान्य कष्टकरी जनतेचा संयम ढळू लागला. उपासमार, गरीबी आणि महागाईच्या असह्य परिस्थितीने रशियाच्या सामान्य कष्टकरी जनतेमध्ये एक विद्रोहाची परिस्थिति निर्माण केली होती. शेवटी फेब्रुवारी १९१७ मध्ये एका उत्स्फूर्त लोकविद्रोहाने जारची सत्ता उपटून फेकून दिली. तोपर्यंत रशियातील क्रांतिकारी कम्युनिस्ट पार्टी, जिचे नाव रशियाची सामाजिक लोकशाही कामगार पार्टी (बोल्शेविक) होते, या लोकविद्रोहाच्या नेतृत्त्वाचे स्थान मिळवण्यात अपयशी ठरली होती. त्यामुळे, जारच्या सत्तेच्या पतनानंतर एक अस्थायी युती सरकार बनले. या सरकारामध्ये वेगवेगळे भांडवली आणि निमभांडवली पक्ष सामील झाले होते. शेतकऱ्यांना जमीन आणि शांतता देण्याचे, कामगारांना चांगली मजुरी, छोटा कार्यदिवस आणि ट्रेड युनियन बनवण्याचा अधिकार देण्याचे आश्वासन या सरकारने दिले होते. रशिया मित्र देश म्हणजेच ब्रिटन, फ्रान्स आणि अमेरिकेसोबत केलेल्या करारांचे पालन करेल आणि युद्धात सहभाग चालू राहील अशी घोषणा सरकारने केली. त्याचबरोबर भूमीसुधारणा म्हणजे जमिनीचे शेतकऱ्यांमध्ये वाटप करण्याचे काम संविधान सभा तयार होईपर्यंत आणि त्यानंतर कायदा होईपर्यंत पुढे ढकलले. कामगार आणि कष्टकरी जनतेला काही तात्पुरते लोकशाही अधिकार आणि नागरिक अधिकार प्राप्त झाले. त्यामुळे रशियातील वर्गसंघर्ष पुढे नेण्यास तात्पुरती मदत झाली. एवढे करणे हा अस्थायी सरकारचा नाईलाज होता. परंतु जी सर्वांत महत्त्वाची आश्वासने त्याने दिली होती, म्हणजेच जमीन आणि शांततेचे आश्वासन, त्याचा मात्र सरकारला विसर पडला. रशियाचा युद्धामध्ये सहभाग चालूच राहिल्यामुळे देशातील अर्थव्यवस्था, आर्थिक संकट आणि अन्नाचे संकट वाढत जात होते. त्यामुळे देशातील नव्या भांडवली अस्थायी सरकारच्या विरुद्ध लोकसंतोष वाढत चालला होता. देशभरातील औद्योगिक केंद्रांमध्ये संपांची लाट पसरली. त्याचबरोबर, गावातील शेतकऱ्यांचाही संयम ढळू लागला होता आणि त्यांच्यामध्येसुद्धा बंडाची परिस्थिती निर्माण झाली. कित्येक ठिकाणी त्यांनी भूमीसमित्या बनवून जमिनींवर कब्जा करायला सुरुवात केली. जार सरकार जे करीत होते त्याच प्रकारे नव्या सरकारने केरेंस्की नामक भांडवली नेत्याच्या नेतृत्त्वाखाली कामगार संप आणि शेतकरी विद्रोहांचे दमन करायला सुरुवात केली. देशात एक क्रांतिकारी परिस्थिती निर्माण झाली होती आणि अस्थायी सरकार लोकविद्रोह चिरडून ही क्रांतिकारी शक्यता दडपण्याचा प्रयत्न करीत होती. अशा वेळी, बोल्शेविक पक्षाचा नेता लेनिन यांनी एप्रिलमध्ये एप्रिल थिसिस मांडला. यामध्ये त्यांनी बोल्शेविक पक्षाने बंड करून सत्ता हस्तगत करावी असे आवाहन केले. भांडवली अस्थायी सरकार लोकशाही क्रांती पूर्णत्त्वाला नेणार नाही, म्हणजेच जमिनीचे वाटप करणार नाही आणि युद्धापासून सुटकाही मिळू देणार नाही, हे त्यांनी सांगितले. कामगारांच्या लोकशाही मागण्यासुद्धा पूर्ण केल्या जाणार नाहीत. लोकविद्रोहाची शक्यता लक्षात घेऊन सरकार साम्राज्यवाद, भांडवलदार वर्ग आणि त्याचबरोबर देशी जमीनदारांमध्ये समझोते करीत आहे. अशा वेळी, सरकार प्रतिक्रियावादी शक्तींच्या कुशीत शिरून क्रांतीचा गळा आवळण्याचाही धोका निर्माण झाला आहे. अशा परिस्थितीत कामगार वर्गाने आपल्या अग्रदूत पक्षाच्या म्हणजेच बोल्शेविक पक्षाच्या नेतृत्त्वाखाली सत्ता हस्तगत करून समाजवादी क्रांती केली पाहिजे. आता जर कामगार वर्गाने समाजवादी क्रांतीचे कार्यभार पार पाडले नाहीत तर फक्त लोकशाही क्रांती अपूर्ण राहणार असे नाही तर तिची हत्यासुद्धा होईल, अशी मांडणी लेनीन यांनी केली. लेनिन यांचा हा प्रस्ताव अगोदर बोल्शेविक पक्षाच्या नेतृत्त्वानेच अमान्य केला. परंतु जसजसा वेळ जाऊ लागला तसतसा बोल्शेविक पक्षाच्या नेतृत्त्वातील मोठा हिस्सा त्यांचा प्रस्ताव मान्य करू लागला. शेवटी बोल्शेविक पक्षाच्या केंद्रिय समितीने विद्रोह आणि समाजवादी क्रांतीचा लेनिन यांचा प्रस्ताव मान्य केला.

बोल्शेविक पार्टी कित्येक वर्षांच्या वर्गसंघर्षातून तावून सुलाखून निघाली होती. जारच्या हुकूमशाहीच्या काळात तिने कामगारांच्या अनेकानेक संघर्षांचे नेतृत्त्व केले होते आणि पार्टीचे सतत कामगारांमध्ये अस्तित्त्व होते. बोल्शेविक पार्टीने सर्वाधिक उन्नत जाणीव असलेल्या, कट्टर आणि शूर कार्यकर्त्यांची भरती केली होती आणि एका पोलादी अनुशासन असलेल्या आणि गुप्त संरचना असलेल्या बळकट पार्टीची उभारणी केली होती. जारशाही आणि भांडवली सरकारच्या दमनाचा सामना करणे आणि कामगार वर्ग आणि सामान्य शेतकरी जनसमूहांना नेतृत्त्व देणे अशाच पार्टीला शक्य होते. बोल्शेविक पार्टीने सैनिकांमध्येसुद्धा प्रचार केला. ती तर शेतकऱ्यांचीच मुले होती. सैनिकांचा एक मोठा हिस्सा जमीन आणि शांततेच्या मागणीशी सहमत होता. जमीनीचे वाटप आणि युद्धातून माघार या दोन गोष्टी तत्काळ लागू करण्याची मागणी फक्त बोल्शेविक पार्टीच करीत होती. फेब्रुवारी १९१७ पासूनच सामान्य कष्टकरी जनतेमध्ये हे स्पष्ट होऊ लागले होते की भूमी सुधारणा आणि शांतता हवी असेल तर भांडवली अस्थायी सरकार उपटून फेकावेच लागेल. या मार्गावर जनतेला नेतृत्त्व देण्यास फक्त बोल्शिविक पार्टीच तयार होती. लवकरच कामगारांचा एक मोठा हिस्सा बोल्शेविक पार्टीच्या बाजूने उभा राहिला. सैनिकांच्या सिविएतांमध्येसुद्धा बोल्शेविक पार्टीचे नियंत्रण प्रभावी ठरू लागले. कामगार आणि सैनिकांच्या सोविएतांमध्ये बोल्शेविक पार्टीचे नेतृत्त्व स्थापित होताच बोल्शेविक पार्टी विद्रोह करण्याच्या स्थितीमध्ये येऊन पोहोचली.

शेतकऱ्यांमध्ये अगोदर समाजवादी क्रांतिकारी पार्टी नावाच्या एका निम्न भांडवली पक्षाचा प्रभाव होता. बोल्शेविक पार्टीचे स्थान खूपच लहान होते. परंतु भूमीसुधारणेच्या मुद्द्यावर समाजवादी क्रांतिकारी पार्टीसुद्धा घटनेद्वारे कायदा करण्याच्या भूमिकेचे समर्थन करीत होती आणि भूमी सुधारणा टाळल्या जात होत्या. त्यामुळे शेतकऱ्यांची एक मोठी संख्यासुद्धा लवकरच बोल्शेविक पार्टीच्या बाजूने आली कारण बोल्शेविक पार्टीच फक्त तत्काळ भूमी सुधारणा करण्याबद्दल बोलत होती. आता बोल्शेविक पार्टीला बहुसंख्य सामान्य कष्टकरी जनतेचे, म्हणजेच कामगार आणि सामान्य शेतकरी वर्गाचे पाठबळ मिळाले. म्हणजेच आता, बोल्शेविक पार्टीकडे आता क्रांतिकारी अनुशासन असलेली एक गुप्त संरचनासुद्धा होती जी क्रांतीचे नेतृत्त्व करण्यासाठी आवश्यक होती आणि त्याचबरोबर पार्टीला व्यापक जनसुदायाचे समर्थनही मिळाले होते. पार्टीने घोषणा दिली – भूमी, शांतता, भाकरी. युद्ध, गरीबी, उपासमार, बेरोजगारी आणि महागाईमुळे भरडल्या जाणाऱ्या रशियाच्या जनतेला याच गोष्टी हव्या होत्या. बोल्शेविक पार्टीने एक क्रांतिकारी सैन्य समिती स्थापन केली. या समितीचे संचालन विद्रोहाच्या आधी लेनिन यांनी स्वतःच्या हाती घेतले. देशभरात कामगार आणि सैनिक रस्त्यावर होते आणि गावांमध्येसुद्धा शेतकऱ्यांचा विद्रोह उकळत होता. २४ ऑक्टोबरच्या संध्याकाळपासूनच बोल्शेविक पार्टीच्या नेतृत्त्वाखाली क्रांतिकारी सैनिक आणि कामगारांनी भांडवली सत्तेच्या वेगवेगळ्या स्तंभांवर कब्जा करायला सुरुवात केली. सर्व पोस्ट आणि टेलिग्राफ कार्यालये, सैनिक मुख्यालये, पोलिस मुख्यालये, बँक, बंदरे, रेल्वे स्टेशनांवर बोल्शेविकांनी आपले नियंत्रण प्रस्थापित केले. भांडवली सत्ता ज्या स्तंभावर उभी राहून काम करते ते आता कोलमडले होते आणि संपूर्ण भांडवली राज्यसत्ता पूर्णपणे असहाय झाली होती. यानंतर २५ ऑक्टोबर रोजी रशियाच्या राजसत्तेचे प्रतीक असलेल्या शीतमहालात बसलेल्या अस्थायी सरकारच्या मंत्र्यांना शरणागती पत्करण्यासाठी मुदत देण्यात आली. मुदत संपुष्टात येण्याआधी शरणागती न झाल्यामुळे बोल्शेविक सैनिकांनी हल्ला चढवला आणि थोड्याशा प्रतिरोधावर मात करून विजयश्री मिळवली. अशा प्रकारे रशियाच्या जुन्या कॅलेंडरनुसार २५ ऑक्टोबर (७ नोव्हेंबर) रोजी बोल्शेविक क्रांतीच्या नेतृत्त्वाखाली जगातील पहिली यशस्वी समाजवादी कामगार क्रांती झाली. सर्व शक्ती कामगार आणि सैनिकांच्या सोविएतांच्या हवाली करण्यात आली. क्रांतीनंतर ताबडतोब भूमीसंबंधी आदेश काढून भूमी सुधारणांना सुरुवात झाली. दुसरा आदेश युद्धातून माघार घेण्याचा होता. समाजवादी क्रांतीने त्या दोन प्रमुख मागण्या तत्काळ पूर्ण केल्या ज्या भांडवली अस्थायी सरकार ८ महिन्यांपासून पूर्ण करू शकले नव्हते. क्रांतीनंतर साम्राज्यवादी युद्धातून रशियाने माघार घेतली आणि १९१८ चा मध्य येईपर्यंत रशिया या विनाशकारी युद्धातून पूर्णपणे बाहेर पडला.

प्रतिक्रियावादी कुलक आणि जमीनदारांचे उठाव आणि साम्राज्यवादी हस्तक्षेपाचा सामना करण्यासाठी आता रशियातील कामगार सत्तेला सुमारे ३ वर्षांच्या गृहयुद्धात उतरावे लागले खरे, परंतु हे नफ्याच्या लुटीतील वाट्यासाठी चालणारे साम्राज्यवादी युद्ध नव्हते. या गृहयुद्धात कामगार आणि सैनिकांनी शेतकऱ्यांच्या समर्थनाच्या आधारे तीन वर्षांत जमीनदारांचे उठाव मोडून काढले आणि त्याचबरोबर १४ साम्राज्यवादी देशांच्या वेढ्यावरसुद्धा मात केली. १९२१ येईपर्यंत क्रांतिकारी समाजवादी रशियाचा गृहयुद्धामध्ये विजय झालेला होता आणि कामगार सत्ता पक्की झाली होती. यानंतर सुमारे साडेतीन दशके रशियातील कष्टकरी जनतेने समाजवादी व्यवस्था उभारली. सर्व कारखाने, खाणींचे राष्ट्रीयीकरण करण्यात आले. सर्व बँकांचे राष्ट्रीयीकरण करण्यात आले. राज्यसत्तेवर आता क्रांतिकारी बोल्शेविक पक्षाच्या माध्यमातून कामगार वर्गाचे अधिपत्य स्थापन झाले होते, म्हणूनच या सर्व संसाधनांचा सामूहिक मालक कामगार वर्ग आणि गरीब शेतकरी जनता होती. १९१७ मध्ये ज्या भूमिसुधारणा झाल्या त्यांद्वारे अनेक शेतकरी जमीनींचे खाजगी मालक झाले. परंतु १९३१ पासून १९३६ या काळात सोविएत संघामध्ये जमीनीची खाजगी मालकी नष्ट करण्यात आली आणि सामूहिक शेतीची व्यवस्था स्थापन करण्यात आली. १९३० च्या दशकातसुद्धा सोविएत रशियामध्ये अभूतपूर्व गतीने उद्योगीकरण झाले व काही कालावधीतच रशिया जगातील दुसऱ्या क्रमांकाची औद्योगिक शक्ती बनला. एवढ्या मोठ्या प्रमाणात उद्योग उभारण्यास जगातील सर्वांत मोठी औद्योगिक शक्ती असलेल्या अमेरिकेला जवळजवळ दीडशे वर्षे लागली होती. परंतु रशियामध्ये हे कार्य कामगार शक्तीच्या बळावर दीड दशकात पूर्ण केले गेले. देशात साक्षरतेचे प्रमाण १०० टक्क्यांच्या जवळपास गेले. कामगार वर्गाच्या जीवनमानात मोठी सुधारणा झाली. उपासमार आणि बेरोजगारी संपुष्टात आली. महिलांना मतदानाचा अधिकार देणारा रशिया हा जगातील पहिला मोठा देश

पान ११ वर

# ऑक्टोबर क्रांतीच्या स्मृतींतून प्रेरणा घ्या

पान १० वरून

बनला. (त्याआधी न्यूझिलंडमध्ये महिलांना मतदानाचा अधिकार मिळालेला होता) लिंग आणि संपत्तीच्या कोणत्याही अटीशिवाय खऱ्या अर्थाने सार्विक मताधिकार पहिल्यांदा रशियामध्ये लागू झाला. सोविएत संघाने प्रथमच दमित राष्ट्रीयता आणि जातीय समूहांना साम्राज्यवादी दमनापासून मुक्त केले आणि त्यांना आत्मनिर्णयाचा अधिकार दिला. या सर्व दमित राष्ट्रीयता समाजवादी प्रयोगांमध्ये समान वाटेकरी झाल्या आणि आपल्या कपाळावरून हीनतेचा डाग त्यांनी पुसून टाकला. सोविएत संघाच्या समाजातून वेश्यावृत्ती समाप्त करण्यात आली. सर्व आर्थिक बाबतीत रशिया पूर्णपणे स्वतःच्या पायांवर उभा राहीला. आणि वेशेष म्हणजे हा चमत्कार रशियाच्या कामगार वर्गाने हिटलरच्या नाझी सैन्याला पराभूत करीत, दुसऱ्या महायुद्धात कोट्यावधी लोकांची आहुती देऊन आणि उभ्या साम्राज्यवादी भांडवली जगाच्या फोडाफोडीच्या प्रयत्नांना तोंड देत केला. १९५३ साली स्तालिन यांच्या मृत्यूनंतर बोल्शेविक पार्टीचे नेतृत्त्व दुरुस्तीवाद्यांनी काबीज केले. रशियातील समाजवादी प्रयोगांदरम्यान झालेल्या काही चुका त्याला कारणीभूत होत्या. त्यांच्याबद्दल आम्ही कामगार बिगुलमध्ये या शताब्दी वर्षामध्ये विस्ताराने लिहिणार आहोत. हा एक वेगळ्या प्रकारचा अभूतपूर्व प्रयोग होता. ही एक नव्या प्रकारची राज्यसत्ता होती. पहिल्यांदाच शोषक अल्पसंख्येवर शोषित बहुसंख्येचे अधिनायकत्व आणि सर्वहारा लोकशाही स्थापन करण्यात आली होती. कुठल्याही नव्या प्रयोगाप्रमाणेच यामध्येसुद्धा चुका होणे स्वाभाविक होते. ही पहिली कामगार क्रांती होती. तिने उभारलेले समाजवादी प्रयोग चार दशकांनंतर कोलमडले याबद्दल ऐतिहासिक दृष्टिकोन बाळगणाऱ्या कुणालाही नवल वाटणार नाही. आश्चर्य याचे वाटू लागते की चार दशकांच्या अल्पावधीत समाजवादी रशिया ते सर्व काही करू शकला जे भांडवलशाही आपल्या ३०० वर्षांच्या इतिहासात करू शकलेली नव्हती. समता, स्वातंत्र्य आणि भ्रातृत्त्वाची घोषणा तर भांडवली क्रांतीनेसुद्धा दिली होती. **चार दशकांतच सोविएत संघाने येऊ घातलेल्या अधिक चांगल्या जगाची एक झलक दाखवली. भांडवलाचे शासन अमर- शाश्वत नाही, हे त्याने दाखवून दिले. भांडवलशाही ही माणसासाठी सर्वोत्तम व्यवस्था नाही, भांडवलशाही हा इतिहासाचा अंत नाही. अधिक चांगले जग घडवणे शक्य आहे व ते जग जगातील सर्वहाराच घडवू शकतो, हे सोविएत संघाने दाखवून दिले.**

असंख्य कामगारांना या महान प्रयोगांबद्दल माहिती नाही. कारण भांडवली वर्तमानपत्रे, न्यूज चॅनेल, चित्रपट आणि एकूण शिक्षण व्यवस्था आपल्याला त्याबद्दल काहीच सांगत नाही. आपल्याला फक्त त्याच्या अपयशाबद्दल सांगितले जाते. अपप्रचार केला जातो. **दुसऱ्या शब्दांमध्ये सांगायचे झाले तर भांडवली शासक वर्गाने जाणीवपूर्वक ऑक्टोबर क्रांतीला विस्मृतीच्या गर्तेत लोटण्याचा प्रयत्न केला आहे. कामगार वर्गाने आपल्या पूर्वजांच्या या महान प्रयोगापासून शिकवण आणि प्रेरणा घेऊ नये, त्यांनी नेहमी हीनताबोध आणि आत्मविश्वासाच्या अभावात जगावे, हा त्यामागचा हेतू. आपल्या गौरवशाली आणि महान वारशापासून तोडलेला कामगार वर्ग भविष्यातील संघर्षांसाठीसुद्धा आत्मविश्वास आणि आत्मशक्ती एकवटू शकत नाही. म्हणूनच शासक वर्ग ऑक्टोबर क्रांतीला घाबरतो व सतत तिला राख आणि धुळींच्या थराखाली गाडून टाकण्याचा प्रयत्न करतो.** अशा वेळी आपण या महान कामगार क्रांतीचे ऐतिहासिक आणि आंतरराष्ट्रीय महत्त्व समजून घेण्याची मोठी गरज आहे. तिच्यातून आपण भावी संघर्षांसाठी प्रेरणा आणि शक्ती प्राप्त करू शकतो.

## ऑक्टोबर क्रांतीचे महान ऐतिहासिक, युगप्रवर्तक आणि आंतरराष्ट्रीय महत्त्व

महान ऑक्टोबर क्रांतीचे ऐतिहासिक महत्त्व अभूतपूर्व आणि अद्वितीय असे आहे. माणसाच्या इतिहासात त्याआधीसुद्धा क्रांत्या आणि लोकविद्रोह झाले होते. आजपासून सुमारे २०९० वर्षांपूर्वी रोममध्ये गुलामांनी उठाव केला. गुलामांच्या उठावामुळे दास प्रथा कमकुवत झाली आणि कोसळली. दास स्वामींचे शासन संपुष्टात आले तेव्हा जमीनदारांची आणि सामंतांची सत्ता स्थापन झाली. ही अगोदरच्या दास व्यवस्थेहून अधिक चांगली व्यवस्था होती. अगोदर दासांना बोलणारे अवजार समजले जायचे. आपल्या मनोरंजनासाठी दास स्वामी त्यांना एकमेकाशी मरेस्तेवर लढवत. बेशुद्ध होऊन पडेस्तोवर त्यांना राबवून घेतले जाई. दासांना मनुष्य मानलेच जात नव्हते. परंतु सामंती व्यवस्थेत भूदासांची अवस्था दासांपेक्षा बरी होती. या अर्थाने सामंती व्यवस्था म्हणजे माणसाच्या इतिहासातील एक पुढचे पाऊल होते. परंतु तीसुद्धा भूदास आणि शेतकऱ्यांच्या अमानुष शोषणावर आधारलेली व्यवस्था होती. भूदासांना कोणतेही राजकीय स्वातंत्र्य नव्हते. ते जमीनीशी बांधले गेले होते. त्यांना सामंतांच्या जमिनीवर कंबर मोडेपर्यंत काम करावे लागे आणि त्याच्या बदल्यात त्यांना जेमतेम जगण्यापुरते अन्न मिळायचे. शेतकऱ्यांनासुद्धा साऱ्याच्या रूपात सामंतांच्या जमिनीवर बेगारी करावी लागत असे किंवा धान्याच्या किंवा रोख रक्कमेच्या रूपात खंड भरावा लागत असे. पुढे जगभरात सामंती व्यवस्थेच्या विरोधात शेतकऱ्यांचे उठाव होऊ लागले. या उठावांमुळे सामंती व्यवस्था थरथरू लागली. पुढे उदयोन्मुख क्रांतिकारी भांडवलदार वर्गाने शेतकरी आणि दस्तकार व कारागिरांना सोबत घेऊन सामंतांच्या विरुद्ध लोकशाही क्रांत्या केल्या कारण सामंती व्यवस्थेच्या चौकटीत त्यांचा आर्थिक विकास आणि राजकीय सत्ता अशक्य होती. या लोकशाही क्रांत्यांमुळे भांडवलदार वर्ग सत्तेवर आला व त्याने भांडवली लोकशीहीची स्थापना केली. या व्यवस्थेत भांडवलदार वर्ग शासित आणि शोषित अशा कामगार आणि सामान्य कष्टकरी वर्गाकडून सत्ता चालवण्याची संमती मिळवतो. ही संमती निवडणुकांच्या माध्यमातून घेतली जाते. त्यामुळे भांडवलदार सरकार आपणच निवडले आहे असा भ्रम लोकांच्या मनात पक्का होता. परंतु वास्तवात ही संमती भांडवलदार वर्गाने आपला मिडिया, शिक्षणतंत्र आणि इतर राजकीय उपकरणांच्या द्वारे निर्माण केलेली असते. गेल्या निवडणुकीत प्रचारावर दहा हजार कोटी रुपये खर्च करून अंबानी आणि अदानीसारख्या भांडवलदारांनी नरेंद्र मोदी यांना पंतप्रधानप बनवण्यासाठी एकूण समाजात मत तयार केले, अगदी त्याच प्रकारे. असो. अशा प्रकारे भांडवली लोकशाहीच्या रूपात पहिल्यांदाच अशी एक शोषक सत्ता अवतिर्ण झाली जी किमानपक्षी वर वर तरी संमती घेऊन शोषितांवर राज्य करते. शासक वर्गाचे शासन योग्य ठरवण्याचे कार्य प्रत्यक्षपणे धर्माच्या किंवा एखाद्या दिव्यतेच्या सिद्धांताच्या आधारे केले जात नाही. अशा प्रकारे भांडवलशाही ही आपल्या पूर्वीच्या समाजांपेक्षा, म्हणजेच दास व्यवस्था आणि सामंती व्यवस्था यांच्याहून निराळी आहे. परंतु एका अर्थाने ती त्यांच्यासारखीदेखील आहे. भांडवलशाहीतसुद्धा एका शोषित बहुसंख्येवर एका शोषक अल्पसंख्येची हूकूमशाही असते. भांडवली लोकशाहीचा हाच अर्थ आहे – बहुसंख्य कामगार वर्ग आणि सामान्य कष्टकरी जनतेवर भांडवलदारांची हुकूमशाही. ही हुकूमशाही भांडवलदारांची कोणती पार्टी राबवणार याचा निर्णय तेवढा निवडणुकांमध्ये होत असतो. नागनाथ जातो, सापनाथ येतो. **तात्पर्य, ऑक्टोबर क्रांतीच्या आधी सर्वच क्रांत्यांनंतर किंवा उठावांनंतर जी सत्ता अस्तित्त्वात आली ती कोणत्या ना कोणत्या शोषक अल्पसंख्येची शोषित बहुसंख्येवरील शासनाचे प्रतिनिधित्व करीत होती.** दास व्यवस्था म्हणजे बहुसंख्य दासांवर व सामान्य कष्टकरी जनतेवर अल्पसंख्य दास स्वामींचे राज्य होते, सामंती व्यवस्था म्हणजे बहुसंख्य भूदास, शेतकरी आणि दस्तकार जनतेवर अल्पसंख्य सामंती राजांचे शासक होते आणि भांडवली व्यवस्था म्हणजे बहुसंख्य कामगार वर्ग आणि सामान्य कष्टकरी जनतेवर अल्पसंख्य भांडवलदार वर्गाच्या राज्याचे प्रतिनिधित्व होय. ऑक्टोबर क्रांतीने पहिल्यांदाच अशी एक सत्ता स्थापन केली जिच्या अतंर्गत शोषक अल्पसंख्येवर शोषित बहुसंख्येची सत्ता स्थापन झाली. **या अर्थाने ऑक्टोबर क्रांतीने मानवाच्या इतिहासात एका नव्या युगाचा शुभारंभ केला. हे नवे युग आहे समाजवादी संक्रमणाचे दीर्घकालिक ऐतिहासिक युग.** या दीर्घ कालावधीमध्ये जगाच्या वेगवेगळ्या देशांमध्ये कामगार वर्ग समाजवादाचे अनेक अयशस्वी प्रयोग करणार हे स्वाभाविकच होते. विसाव्या शतकात कामगार वर्गाने वेगवेगळ्या देशांमध्ये अनेक प्रयोग केलेसुद्धा. ते महान उपलब्धी प्राप्त करून नंतर कोलमडले. ऱशिया, चीन, पूर्व युरोप, विएतनाममध्ये. परंतु या प्रयोगांमध्ये रशियाच्या ऑक्टोबर क्रांतीचे विशेष महत्त्व आहे. कारण या क्रांतीने त्या शृंखलेची सुरूवात केली आणि जगातील पहिली समाजवादी कामगार सत्ता स्थापन केली.



**भांडवली क्रांतीची कर्तव्ये जी खुद्द भांडवली वर्गाने कधी पूर्ण केली नव्हती ती सर्वाधिक क्रांतिकारी आणि परिपूर्ण रूपात ऑक्टोबर क्रांतीने पूर्ण केली.** सर्वांत अमूलाग्र भांडवली क्रांत्यांनीसुद्धा भूमी सुधारणा आणि लोकशाही अधिकार देण्याची आश्वासने दिली होती, परंतु ही आश्वासने पूर्ण करण्यात त्यांनी तेवढा प्रामाणिकपणा आणि अमूलाग्रता दाखवली नाही, जी ऑक्टोबर क्रांतीने दाखवली. ऑक्टोबर क्रांतीने आठवड्याभरात ते सारे काही केले जे भांडवलदार वर्गाने वेळोवेळी आश्वासने देऊनसुद्धा दोनशे वर्षांत केले नव्हते. म्हणूनच लेनिन यांनी ऑक्टोबर क्रांतीच्या पाचव्या वर्षपूर्तीच्या प्रसंगी केलेल्या भाषणात म्हटले की रशियाच्या विशिष्ट परिस्थितीमध्ये लोकशाही क्रांतीची भांडवली वर्गाकडून हत्या झाली असती ती समाजवादी क्रांतीनी रोखली. समाजवादी क्रांतीने कामगार वर्गाच्या हाती सत्ता सुपूर्द करण्याच्या व समाजवादी निर्माणाच्या दिशेने अग्रेसर होण्याच्या आधी उरलेसुरले लोकशाही कार्यभारसुद्धा पूर्ण केले. रशियाच्या विशिष्ट परिस्थितींमध्ये सर्वहारा वर्गास इतिहासाने सत्ता तत्काळ हाती घेण्यास भाग पाडले होते. लेनिन यांनी म्हटल्याप्रमाणे ऑक्टोबर क्रांतीची वेळ आम्ही आमच्या इच्छेनुसार निवडली नव्हती. **दुसरे महायुद्ध, त्यामुळे निर्माण झालेले आर्थिक संकट, खाद्यान्न संकट, देशभरातील कामगार संप आणि कारखान्यांवर कब्जा करण्याची लाट, सोविएतांचा उत्स्फूर्त उदय आणि भूमी समित्यांचे जमीन कब्जा करण्याचे आंदोलन यांमुळे निर्माण झालेल्या परिस्थितीने सर्वहारा वर्ग आणि त्याच्या अग्रदूत पक्षासमोर वेळेच्या आधीच अशी परिस्थिती निर्माण केली की सर्वहारा वर्गासमोर दोनच पर्याय राहिले – सत्तेवर कब्जा करून समाजवादी क्रांती करायची आणि भांडवली लोकशाही क्रांतीची ती आश्वासने पूर्ण करायची जी पूर्ण करण्यास भांडवलदार वर्ग टाळाटाळ करीत होता, किंवा सर्वहारा वर्ग आणि त्याची अग्रदूत असलेल्या बोल्शेविक पार्टीने भांडवलदार वर्ग, प्रतिक्रियावादी कुलक आणि भूस्वामी वर्ग तसेच राजेशाहीच्या उरल्यासुरल्या प्रतिक्रियावादी तत्त्वांच्या युतीला लोकशाही क्रांतीचा गळा आवळण्याची व कामगार वर्गाला इतिहासाच्या रंगमंचावरून कित्येक दशकांसाठी उचलून बाहेर फेकण्याची परवानगी द्यायची.** लेनिन यांचे हे मूल्यांकन अगदी योग्य सिद्ध झाले. जर त्यावेळी कामगार वर्गाने सत्ता आपल्या हाती घेतली नसती तर सम्राज्यवाद, रशियातील भांडवलदार वर्ग आणि भूस्वामी वर्ग यांनी मिळून रशियाच्या लोकशाही क्रांतीचा गळा आवळला असता. अशाच प्रकारे रशियाच्या विशिष्ट परिस्थितीमध्ये कामगार वर्गाने केलेल्या समाजवादी क्रांतीने लोकशाही क्रांतीची हत्या रोखली आणि लोकशाही क्रांतीचे अनेक कार्यभारसुद्धा तिलाच पूर्ण करावे लागले. साहजिकच या परिस्थितीने रशियाच्या समाजवादी क्रांतीसमोर आणि कामगार वर्गासमोर समाजवादी निर्माणासंबंधी अनेकानेक महत्त्वपूर्ण आव्हाने आणि अडचणी उभ्या केल्या ज्यांना रशियाच्या बोल्शेविक पार्टीला बराच काळ तोंड द्यावे लागले आणि ज्यांच्यामुळे अनेक समस्या आणि विकृतींचा सामनासुद्धा रशियाच्या समाजवादी प्रयोगाला करावा लागला. ही परिस्थिती लक्षात घेता रशियाच्या समाजवादी क्रांतीने लोकशाही क्रांतीचे कार्यभार पूर्ण करणे आणि त्यानंतर समाजवादी निर्माणाच्या दिशेने आगेकूच करणे ही एक अभूतपूर्व उपलब्धी होती.

दमित राष्ट्रियतांचा एक मोठा समुद्र्च रशियाच्या साम्राज्याच्या परिघावर हेलकावत होता. जारच्या शासनाने या राष्ट्रियतांवर दशकानुदशके पाशवी दमन आणि उत्पीडन केले होते. त्याचबरोबर या उत्पीडित राष्ट्रियतांमधील सामंत आणि जमीनदार वर्गाने हे उत्पीडन वाढवण्याचे काम केले होते. भांडवली सरकार अस्थायी सरकार बनवून सत्तेत आला त्यावेळी त्याने जगातील इतर देशांच्या भांडवलदार वर्गासारखेच दमित राष्ट्रियतांना आत्मनिर्णयाचा अधिकार देण्याचे आश्वासन दिले होते, परंतु ते कधीच पूर्ण केले नाही. **रशियातील कामगार वर्गाने आपल्या समाजवादी सत्तेची स्थापना करताच त्वरित या दमित राष्ट्रियतांना आत्मनिर्णयाचा अधिकार प्रदान केला.** त्यामुळे काही राष्ट्रियता व देश सोविएत समाजवादी गणराज्याच्या संघातून काही काळासाठी बाहेर पडले. यामागेसुद्धा तेथील कट्टरतावादी भांडवली राष्ट्रवादाची प्रमुख भूमिका होती. परंतु लवकरच या दमित राष्ट्रियतांच्या कामगार वर्गाने या देशांच्या राष्ट्रीय मुक्ती आंदोलन आपल्या हाती घेतले व त्याला रशियाच्या समाजवादी निर्माणाशी जोडले. या देशातील शेतकरी आणि सामान्य कष्टकरी जनतेनेदेखील पाहिले की रशियाच्या नव्या समाजवादी सत्तेचा त्यांच्यावर बळजबरीने आपले राज्य लादण्याचा कोणताही इरादा नाही आणि आत्मनिर्णयाचे त्यांचे धोरण इनामदार आणि पारदर्शक आहे. त्यामुळे १९२३ पर्यंत सर्व दमित राष्ट्रियतांमध्ये कम्युनिस्ट पक्षाच्या नेतृत्त्वाखाली सोविएत समाजवादी गणराज्य स्थापित झाले होते

पान १२ वर

# ऑक्टोबर क्रांतीच्या स्मृतींतून प्रेरणा घ्या

पान ११ वरून

आणि ते रशिया समाजवादी सोविएत गणराज्याच्या संघाचा भाग बनले. त्यामुळे सोविएत संघ अस्तित्त्वात आला आणि त्यामध्ये पूर्वी जारकालीन साम्राज्यात जबरदस्तीने सामील करण्यात आलेले देशसुद्धा स्वेच्छापूर्वक समाज दर्जासह सामील झाले. कामगार वर्ग कधीच कोणत्याही दमितत राष्ट्रियतांच्या दमन आणि उत्पीडनाचे समर्थन करीत नाही, हेच यावरून दिसून येते. तो स्वतः आपल्या स्वातंत्र्यासाठी लढतो आहे. अशा वेळी, तो इतर कुणाला बळजबरीने आपल्या आधीन कसा ठेवू शकतो? रशियाच्या कामगार वर्गाने भांडवली अंधराष्ट्रवादा नाकारत खऱ्या अंतरराष्ट्रीयतावादाचे दर्शन घडवले आणि दमित राष्ट्रियतांच्या दमनाचा आणि वसाहतीकरणाचा खात्मा करून एक समाजवादी सोविएत गणराज्य स्थापन केले.

**महान ऑक्टोबर क्रांतीने हे दाखवून दिले की समाजवादी क्रांतीशिवाय तमाम देशांना साम्राज्यवादी युद्धाच्या शोकांतिकेपासून आणि विनाशापासून मुक्ती मिळू शकत नाही.** जोपर्यंत साम्राज्यवादी युद्धाचे बळी ठरत असलेल्या वेगवेगळ्या देशांमध्ये कामगार वर्ग सत्तेत येत नाही तोपर्यंत तेथील निरपराध जनता साम्राज्यवादी नफ्याच्या हावेमुळे उद्ध्वस्त होत राहील. आज मध्य पूर्वेच्या देशांच्या बाबतीत हेच घडते आहे. त्या वेळी रशियासोबत एका वेगळ्या प्रकारे हे होत होते. मध्य पूर्वेमध्ये आज जे देश पाश्चात्य साम्राज्यवादाचे बळी ठरत आहेत ते स्वतः मागच्या रांगेतील साम्राज्यवादी देश नाहीत. रशिया स्वतः मागच्या रांगेतली साम्राज्यवादी देश होता. परंतु पहिल्या महायुद्धात त्याची अवस्था ब्रिटन आणि फ्रान्सहून फार वेगळी होती व त्यांच्या नफ्यासाठी रशियाचे सैनिक आणि सामान्य जनतेचा बळी दिला जात होता. या साम्राज्यवादी युद्धाचा सगळा फायदा मोठ्या साम्राज्यवादी शक्ती घेत होत्या आणि त्याचे मोल रशियाच्या कष्टकरी जनतेकडून वसूल केले जात होते. समाजवादी क्रांतीने रशियाला याच भयंकर परिस्थितीतून बाहेर काढले आणि रशियाच्या जनतेला शांतता प्रदान केली. रशिया साम्राज्यवादी जगापासून वेगळा झाला आणि त्याने १९१८ उजाडेपर्यंत साम्राज्यवादी युद्धाच्या प्रत्येक मोर्चाहून आपल्या सैनिकांना माघारी बोलावले. रशियाचा कामगार वर्ग शांततावादी होता असा याचा अर्थ नाही. त्यानंतर त्याने तीन वर्षेपर्यंत रक्त सांडून जमीनदारांचा उठाव चिरडला आणि त्याबरोबर १४ साम्राज्यवादी देशांच्या वेढ्यालासुद्धा धूळ चारली. परंतु हे युद्ध एक क्रांतिकारी युद्ध होतं. या युद्धात कामगार वर्ग आणि शेतकरी वर्गाच्या शूर लढवय्यांनी स्वेच्छेने आपल्या प्राणांची आहुती दिली. त्यांना आपल्या समाजवादी सत्तेचे रक्षण करायचे होते, साम्राज्यवादी भांडवली धनपशूंच्या नफ्यासाठी त्यांनी आपला देह ठेवला नाही.

**ऑक्टोबर क्रांतीची आणखी एक महान उपलब्धी म्हणजे स्त्री पुरुषांमधील वर्गसमाजात असलेल्या घृणास्पद असमानतेवर प्रहार.** ही विषमता काही वर्षांतच नष्ट करता येईल असे म्हणता येणार नाही, परंतु ऑक्टोबर क्रांतीने लैंगिक विषमतेच्या मुळांवर प्रहार केला. स्त्रियांना मतदानाचा अधिकार, समान वेतनाचा अधिकार आणि सामाजिक जीवनात प्रखर आणि मुखर उपस्थितीचा अधिकार मिळाला. समाजवादाच्या निर्माणामध्ये सोविएत संघात स्त्री कामगार आणि सामान्यपणे स्त्रियांनी महत्त्वपूर्ण भूमिका पार पाडली. पहिल्यांदाच इंजिन ड्रायव्हरपासून वैज्ञानिकासारख्या पेशांमध्ये स्त्रियांचा प्रवेश झाला. स्त्रियांना मिळालेल्या या स्वातंत्र्याने रशियाच्या सामाजिक इतिहासात एक क्रांतिकारी आणि युगप्रवर्तक भूमिका पार पाडली.

**परंतु या सर्व उपलब्धींबरोबर जे सर्वांत मोठे पाऊल ऑक्टोबर क्रांतीनंतर समाजवादी सत्तेने उचलले ते म्हणजे भंडवली खाजगी संपत्तीचा खात्मा आणि अशा प्रकारे भांडवली उत्पादन संबंधांतील सर्वांत प्रमुख आयाम म्हणजे भांडवली खाजगी संपत्ती संबंधांवर प्राणांतक प्रहार.** क्रांतीनंतर काही महिन्यातच सर्व बँका, वित्तीय संस्था आणि मोठे कारखाने आणि खाणींचे राष्ट्रीयीकरण तत्काळ प्रभावासह करण्यात आले. १९२० उजाडता उजाडता १० कामगार असलेल्या लहान कारखान्यांचेसुद्धा राष्ट्रीयीकरण करण्यात आले. जमिनीचेसुद्धा राष्ट्रीयीकरण करण्यात आले. मात्र रॅडिकल भांडवली भूमि सुधारणांच्या अंतर्गत जमिनी वेगवेगळ्या शेतकरी कुटुंबांना देण्यात आल्या. १९२१ मध्ये नवे आर्थिक धोरण लागू झाल्यानंतर समाजवादी सत्तेला काही पाउले मागे यावे लागले कारण १९१७ पासून १९२० पर्यंत सुरू असलेल्या गृहयुद्धामुळे निर्माण झालेल्या संकटाने समाजवादी सत्तेला शेककऱ्यांच्या एका मोठ्या हिश्शापासून वेगळे केले होते. याच काळात शेतकरी समुदायापैकी मध्यम आणि उच्च मध्यम हिश्शाने (जो क्रांतीनंतरच्या भूमिसुधारणांनंतर बहुसंख्य हिस्सा बनला होता) धान्याची साठेमारी करायला सुरुवात केली तसेच समाजवादी सत्तेबरोबर असहकार पुकारला. यामुळे उद्योग आणि शेतीमधील विनिमय थांबला होता आणि औद्योगिक उत्पादनालासुद्धा फटका बसला होता,, कारण कामगारांसाठी अन्नधान्याची कमतरता निर्माण झाली होती आणि त्याचबरोबर उद्योगांना पुरेसा कच्चा मालसुद्धा मिळेनासा झाला होता. जमीनदार आणि साम्राज्यवादी वेढ्याच्या विरोधात चाललेल्या गृहयुद्धात या दोन्ही गोष्टींची आवश्यकता होती, नाहीतर समाजवादी सत्ता टिकून राहणे कठीण होते. त्यामुळे गृहयुद्धाच्या काळात जेव्हा कम्युनिस्ट पक्षाने युद्ध कम्युनिझमची धोरणे लागू केली त्यावेळी कामगार वर्गाच्या राज्यसत्तेला शेतकऱ्यांच्या एका बऱ्यापैकी हिश्शाकडून बळजबरीने पीकाची वसुली करावी लागली. बळजबरीने पीक वसूल करण्याचा निर्धारित निशाणा सुखवस्तू श्रीमंत आणि मध्यम शेतकरी होते परंतु कित्येकदा निम्न मध्यम शेतकरीसुद्धा तावडीत सापडायचे, जे एकूण शेतकरी समुदायाचा बहुसंख्य हिस्सा होते. त्यामुळे शेतकरी वर्गाच्या एका मोठ्या हिश्शाने श्रीमंत शेतकऱ्यांच्या नेतृत्त्वाखाली सोविएत सत्तेशी असहकार पुकारला आणि गृहयुद्धाने अशी परिस्थिती निर्माण केली की सोविएत सत्ता ताबडतोब कामगार शेतकरी संश्रयाला पुन्हा बळकटी देण्यासाठी काही करू शकला नाही. त्यामुळे गृहयुद्ध संपेपर्यंत कामगार सत्तेला शेतकऱ्यांच्या असहाकाराचा सामना करण्यासाठी नाईलाजाने बळजबरीने पिकाची बसुली करावी लागली. परंतु १९२० च्या अखेरीस गृहयुद्धात विजय संपादन केल्यानंतर ताबडतोब जबरदस्ती बसुलीची ही व्यवस्था रद्द करण्यात आली आणि पिकाच्या रूपात करव्यवस्था लागू करण्यात आली. १९२१ सालीच छोट्या उद्योगांना स्वायत्तता प्रदान करण्यात आली आणि मोठ्या उद्योगांमध्ये एका व्यक्तीच्या प्रबंधनाचा सिद्धांत आणि बाजार अर्थव्यवस्थेला सूट देण्यात आली. याचे कारण म्हणजे रशियाचा कामगार वर्ग अजून राजकीय आणि तांत्रिकदृष्ट्या संपूर्ण औद्योगिक प्रबंधन आणि उत्पादन व विनिमयाचे संचालन व प्रबंधन आपल्या हातात घेण्याइतपत परिपक्व झालेला नव्हता. म्हणूनच लेनिनच्या नेतृत्त्वाखाली हे आर्थिक परिवर्तन करण्यात आले. ते नवे आर्थिक धोरण म्हणून ओळखले जाते. लेनिन यांनी म्हटले होते की गृहयुद्ध आणि युद्ध कम्युनिझमचा हा टप्पा रशियाच्या क्रांतीवर परिस्थितीने लादलेला होता. या काळात रशियाच्या समाजवादी सत्तेने असे काही किल्ले काबीज केले ज्यांच्यावर टिकून राहणे शक्य नव्हते. म्हणूनच कामगार सत्तेच्या रक्षणासाठी हे आवश्यक होते की सर्वहारा सत्ता टिकवून ठेवण्यासाठी काही पाउले मागे जावे आणि शेतकरी वर्गाशी गृहयुद्धाच्या काळात कमकुवत झालेली एकता पुन्हा करावी. याचे कारण म्हणजे रशियातील समाजवादी सत्ता विशिष्ट परिस्थितीमुळे एका अशा देशात स्थापन झाली जेथे कामगारांची संख्या फक्त १० ते १२ टक्के होती तर मध्यम शेतकऱ्यांसमवेत एकूण शेतकऱ्यांची लोकसंख्या ८० टक्क्यांहन जास्त होती. अशा देशामध्ये समाजवादी निर्माण करताना सर्वहारा सत्तेला कित्येकदा पाऊल मागे घ्यावे लागेल आणि पुन्हा सावधपणे पुढे जावे लागेल, हे लेनिन यांनी स्पष्ट केले होते. १९२१ मध्ये नवे आर्थिक धोरण लागू केल्यानंतर ३ ते ४ वर्षांत रशियाची आर्थिक परिस्थिती सुधरली. १९२३ साली लेनिन यांच्या मृत्यूनंतर समाजवादी निर्माणाच्या कार्याचे नेतृत्त्व स्तालीन यांच्याकडे आले.

बोल्शेविक पार्टीमध्ये बुखारीनच्या उजव्या संधीसाधू धोरणाच्या विरुद्ध ( बुखारीन भांडवली पद्धतीने उत्पादक शक्तींचा विकासाचा मार्ग सुचवीत होता) आणि ट्राट्स्कीच्या डाव्या दुस्साहसवादी लाइनच्या विरुद्ध संघर्ष करीत, जिनोवियेव व कामनेव यांच्या संधीसाधू धोरणाला तोंड देत स्तालिन यांनी समाजवादी निर्माणाचे कार्य पुढे नेले. १९२७-२८ पर्यंत उद्योगांमध्ये राजकीय नियंत्रण पुन्हा बळकट करण्यात आले आणि १९३० पासून १९३५ पर्यंत स्तालिन यांच्या नेतृत्त्वाखाली समाजवादी सामूहिकीकरणाचे आंदोलन चालविण्यात आले. या आंदोलनाच्या अंतर्गत शेतकऱ्यांच्या बहुसंख्येची संमती मिळवून आणि मोठ्या शेतकऱ्यांचा आणि कुलकांचा प्रतिरोध चिरडून शेतीमधूनसुद्धा खाजगी भोगाधिकाराची व्यवस्था संपुष्टात आणण्यात आली व सामूहिक शेते आणि राजकीय शेतांमधून शेतीचे उत्पादन सुरू झाले. १९३६ पर्यंत सोविएत संघात उद्योग आणि शेती दोन्हींतून भांडवली खाजगी संपत्ती नष्ट करण्यात आली. त्यामुळे सोविएत संघाला मोठ्या प्रमाणात उत्पादन करून विकासाची मोठी भरारी घेण्याची संधी मिळाली आणि १९३० च्या दशकाच्या अखेरपर्यंत सोविएत संघ हा जगातील दुसऱ्या क्रमांकाची औद्योगिक शक्ती बनला. हे सारे कार्य भांडवली नफेखोरी आणि लुटीच्या आधारे नाही तर कामगार वर्गाचा पुढाकार आणि सामूहिक मालकीच्या व्यवस्थेच्या बळावर झाले. कामगार वर्गाच्या जीवनमानात मोठी सुधारणा झाली. कामगार वर्गाच्या मुलामुलींना आता असे जीवन मिळाले की त्यांच्यामधूनसुद्धा कलाकार, वैज्ञानिक, तंत्रज्ञ, बुद्धिजीवी, अध्यापक आणि मोठे खेळाडू तयार झाले. सोविएत संघाने विज्ञानाच्या क्षेत्रात मोठी भरारी घेतली आणि समाजवादी टप्प्यातील उपलब्धींच्या बळावरच १९५० च्या दशकाच्या अखेरीस सोविएत संघाने मानवाच्या इतिहासात पहिल्या माणसाला अंतरिक्षात पाठवले. त्याचे नाव होते गागरिन. या समाजवादी विकासाच्या एकूण प्रक्रियेमध्ये स्तालिन आणि बोल्शेविक पार्टीकडून अनेक चुकासुद्धा झाल्या. यापैकी मुख्य चूक म्हणजे भांडवली खाजगी संपत्ती नष्ट करणे म्हणजे समाजवादी क्रांतीचा प्रमुख कार्यभार पूर्ण करणे व आता उत्पादक शक्तींचा विकास हा एकमेव कार्यभार शिल्लक राहतो, हा विचार होय. या विचारामुळे आर्थिक विकासाचा एक असा मार्ग चोखाळण्यात आला ज्यामुळे व्यापक कामगार वर्गाच्या जीवनात हजारो पटीने सुधारणा घडवताना कुशल आणि अकुशल, मानसिक श्रम आणि शारीरिक श्रम, शेती आणि उद्योग व गाव आणि शहर यांमधील अंतर वाढले. त्यामुळे वेतन विषमता आणि अन्य भांडवली अधिकार निर्माण झाले. त्यामुळे समाजात एक असा वर्ग पैदा झाला जो वास्तविक एक नवीन भांडवलदार वर्ग होता. हा नवीन भांडवलदार वर्ग निर्माण होताच पार्टी आणि राज्यसत्तेमध्ये घुसखोरी करू लागला आणि त्याने पार्टी आणि राज्यसत्तेच्या आत मोर्चेबांधणी केली. याच समस्या वाढत गेल्यामुळे स्तालिन यांच्या मृत्यूनंतर सोविएत संघात भांडवली पुनर्स्थापना झाली आणि समाज, पार्टी आणि राज्यसत्ता यांच्यामध्ये एक विशेषाधिकार प्राप्त केलेल्या आणि अधिशेषाचा एक मोठा हिस्सा गिळंकृत करणाऱ्या भांडवलदार वर्गाने पार्टीमध्ये तख्तापलट केले आणि १९५६ च्या विसाव्या कांग्रेसपर्यंत ही प्रक्रिया पूर्ण झाली.

लेनिन आणि नंतर स्तालिन यांनी (१९४८ ते १९५२ पर्यंत) स्वतः या धोक्याकडे लक्ष वेधले होते. परंतु स्तालिन यांना समाजवादाच्या या समस्या सोडवण्याची कधी संधी मिळाली नाही. याचे कारण म्हणजे सोविएत संघात पार्टी आणि राज्यसत्तेमध्ये चालू असलेला वर्गसंघर्ष आणि त्याचबरोबर दुसरे महायुद्ध आणि नाझी धोक्याचा सामना करण्याचे आव्हान आणि त्याचबरोबर बोल्शेविक पार्टीमध्ये असलेला उत्पादक शक्तींच्या विकासाच्या सिद्धांताचा प्रभाव हे होय. लेनिन यांनी ऑक्टोबर क्रांतीच्या पाचव्या वर्षपूर्तीच्या प्रसंगी म्हटले होते की आम्ही चुका करणार हे स्वभाविक आहे, व चुका करूनसुद्धा आम्ही समाजवादी सत्ता टिकवून ठेवू शकणार की नाही, हे काळच सांगेल. परंतु जर आपण समाजवादी सत्ता शेवटर्पयंत टिकवून ठेवू शकलो नाही तर त्यात कोणतेही नवल वाटून घेण्याचे कारण नाही. कारण हा कामगार सत्ता आणि समाजवादी निर्माणाचा पहिलावहिला प्रयोग आहे आणि तोसुद्धा अशा एका देशामध्ये जेथे कामगार वर्ग अल्पसंख्य आहे आणि निमभांडवली शेतकरी बहुसंख्येत आहेत. त्याच्या जोडीला आहेत अत्यंत प्रतिकूल बाह्य परिस्थिती. सोविएत संघामध्ये समाजवादी प्रयोग अखेरीस कोसळला, तरीदेखील चार दशकांमध्ये तिने दाखवून दिले की कामगारांची सत्ता स्थापन होऊ शकते आणि समाजवाद खरोखरच भांडवलशाहीला एक अधिक चांगला पर्याय देऊ शकतो. तो आपल्याला उपासमार, बेरोजगारी, गरीबी, वेश्यावृत्ती, उच्चनीच भेदभाव, राष्ट्रीय उत्पीडन आणि युद्धांपासून मुक्तता देऊ शकतो. ज्या कामगार समुदायाला अडाणी, ग्राम्य, मागास समजले जाते तो एक विशाल देशामध्ये फक्त आपली सत्ता स्थापन करू शकतो एवढेच नाही तर ती सत्ता चालवू शकतो आणि एका अधिक चांगला समाज घडवू शकतो, हे या प्रयोगाने दाखवन दिले. या दृष्टीने ऑक्टोबर क्रांतीने मानव इतिहासामध्ये एक निर्णायक विच्छेद घडवून आणला आणि एका नव्या युगाचा आरंभ केला. समाजवादी संक्रमाणाचे युग. या युगाच्या आरंभानंतर कामगार वर्गाने इतर देशांमध्येसुद्धा समाजवादी प्रयोग करून , प्रामुख्याने चीनमध्ये, नवे मापदंड स्थापन केले आणि नवे चमत्कार केले. परंतु हे सर्वच प्रयोग म्हणजे पहिल्या टप्प्यातील समाजवादी प्रयोग होते. कामगार वर्गाने आपल्या किशोरावस्थेमध्ये काही महान केले परंतु त्यांत त्रुटी होत्या. पहिल्या टप्प्याच्या प्रयोगांनंतर आपण एका दीर्घ निराशेच्या टप्प्यातून जात आहोत. परंतु आता या निराशेच्या टप्प्याचासुद्धा शेवट जवळ आला आहे. भांडवली व्यवस्था जगाला काय देऊ शकते ते आपण पाहतो आहोत. विसाव्या शतकातील हे सगळे प्रयोग म्हणजे आपणा कामगारांचा सामूहिक वारसा आहे आणि या वारशाची नक्कल करून नाही तर त्याच्याकडून वैज्ञानिक दृष्टीने धडा घेऊन आपण एकविसाव्या शतकात नव्या समाजवादी क्रांतीच्या प्रयोगांची अंमलबजावणी करू शकतो. त्यांच्याकडून चिकित्सक भूमिकेतून धडा घेतल्याशिवाय किंवा हा वारसा विसरून आपण नवीन प्रयोग करू शकत नाही. आज भारतात आणि जगभरात कित्येक धुरीविहीन मुक्त चिंतक तथाकथित कम्युनिस्ट क्रांतिकारी संघटना हे करीत आहेत. या महान प्रयोगांतून धडासुद्धा घेतला पाहिजे आणि या प्रयोगांच्या पुढेदेखील गेले पाहिजे. **निश्चितच, या सर्व प्रयोगांमध्ये महान ऑक्टोबर क्रांतीचे नेहमीच एक महान स्थान राहिले आहे, आणि पुढेही राहील.**

**पुढील अंकात- ऑक्टोबर क्रांतीचा वारसा आणि एकविसाव्यात शतकात समाजवादी क्रांतीच्या मार्गातील आव्हाने.**

# राष्ट्रीय स्वयंसेवक संघ आणि देशाचा स्वातंत्र्यलढा

नारायण खराडे

राष्ट्रीय स्वयंसेवक संघ आणि देशाचा स्वातंत्र्यलढासध्या समस्त भारतीयांना राष्ट्रप्रेमाचा अर्थ समजावून सांगण्याची जबाबदारी राष्ट्रीय स्वयंसेवक संघ आणि त्याच्या मित्र संघटनांनी आपल्या शिरावर घेतलेली आहे. त्यामुळे भारत माता, हिंदू राष्ट्र, सनातन धर्म, प्राचीन संस्कृती यांसारख्या संघाच्या आवडीच्या संकल्पनांचे निखारे वणव्याचे रूप घेऊ लागले आहेत. या गदारोळात संघाच्या या संकल्पनांना विरोध करणाऱ्या, तसेच संघावर कोणत्याही स्वरूपाची टीका करणाऱ्या प्रत्येक व्यक्तीला संघ देशद्रोही ठरवीत आहे. अर्थात देशभक्ती आणि देशद्रोहाचे सर्टिफिकेट वाटण्याचा अधिकार संघाला कोणीही दिलेला नाही, हे खरेच, तरीही संघाच्या म्हणण्याकडे दुर्लक्ष करून चालणार नाही, कारण राष्ट्रीय स्वयंसेवक संघ ही ९० वर्षांचा इतिहास, देशभरात ५१३३५ शाखा आणि सुमारे ६० लाख स्वयंसेवक (सक्रिय सदस्य) असलेली संघटना आहे. इतकेच नाही तर गेल्या ५ वर्षांत संघाच्या दैनिक शाखांची संख्या २९ टक्के, साप्ताहिक शाखांची संख्या ६१ टक्के आणि मासिक शाखांची संख्या ४० टक्क्यांनी वाढलेली आहे. शिवाय, देशाचे सध्याचे पंतप्रधान हेदेखील संघाचे प्रामाणिक स्वयंसेवक आहेत, आणि त्याचा त्यांना अभिमानही आहे. म्हणूनच देशभक्तीबद्दल संघाच्या मताकडे दुर्लक्ष करण्याचे धाडस करता येणार नाही . उलट संघाची देशभक्ती आणि राष्ट्रप्रेम यांचा सांगोपांग शोध घेणे आज समाजाच्या दृष्टीने कधी नव्हे एवढे गरजेचे बनले आहे.

राष्ट्रीय स्वयंसेवक संघाची स्थापना १९२५ साली नागपूर येथे झाली. तेव्हापासून १५ आगस्ट १९४७ पर्यंत, म्हणजेच पुढची २२ वर्षे भारतावर इंग्रजांचे राज्य होते. या काळात भारतीय राष्ट्रीय काँग्रेससारख्या मोठ्या संघटनांपासून देशाच्या विविध भागांमध्ये सक्रिय असलेल्या अनेकानेक लहान संघटना इंग्रजांच्या गुलामीतून देशाला स्वतंत्र करण्यासाठी वेगवेगळ्या मार्गांनी प्रयत्न करीत होत्या. अशा वेळी राष्ट्रीय स्वयंसेवक संघ नेमके काय करीत होता? हे समजून घेणे संघाची राष्ट्रभक्ती समजून घेण्यासाठी सर्वाधिक उपयुक्त ठरेल. थोडक्यात सांगायचे तर राष्ट्रीय स्वयंसेवक संघाने एक संघटना म्हणून इंग्रजांच्या विरोधात काहीही केले नाही. उलट, उरात देशासाठी काहीतरी करण्याची उर्मी घेऊन स्वातंत्र्यलढ्यात उडी घेऊ पाहणाऱ्यांना तसे करण्यापासून परावृत्त करण्याचा प्रयत्न आणि देशासाठी बलिदान करणाऱ्या देशभक्तांच्या त्यागाचा अपमान मात्र अथकपणे आणि सुनियोजित पद्धतीने संघाने केला. आज संघाने राष्ट्रभक्तीच्या कितीही बाता मारल्या तरी त्यांचा हा काळाकुट्ट इतिहास त्यांच्याच पुस्तकांमधून व्यवस्थित नोंद झालेला आहे. अर्थात, आपल्या लबाड भूमिकेबद्दल संघाने कधीच लाज बाळगलेली नाही, हेदेखील तेवढेच खरे आहे. अगदी देश स्वतंत्र झाल्यानंतरदेखील स्वातंत्र्यलढ्यापासून स्वतःला अलिप्त ठेवण्याच्या संघाच्या भूमिकेचे समर्थन संघाचे दुसरे सरसंघचालक माधव सदाशिव गोळवलकर (गुरुजी) यांनी पुढील शब्दांत केले आहे, “१९४२ सालीसुद्धा अनेकांच्या अंतःकरणात आंदोलनाचे विचार होते. त्यावेळीसुद्धा संघाचा नियमित कार्यक्रम चालू राहिला. प्रत्यक्षपणे काहीही न करण्याचा संकल्प सघाने केलेला होता. तरीही संघाच्या स्वयंसेवकांच्या मनात खळबळ माजली होती. संघ ही फक्त अकर्मण्य लोकांची संघटना आहे, त्यांच्या बोलण्यात काहीच अर्थ नाही, असे बाहेरचेच लोक नाहीत, तर संघाचे स्वयंसेवकसुद्धा बोलू लागले. ते नाराज झाले.”[1] पण संघाने आपली भूमिका सोडली नाही. संघाला परमपूज्य असणाऱ्या गोळवलकर गुरुजींचे हे शब्द म्हणजे संघाच्या राष्ट्रभक्तीचाच पुरावा आहे.

देशाचा स्वातंत्र्यलढा आणि राष्ट्रीय स्वयंसेवक संघ यांचा संबंध लावताना एक खबरदारी घ्यावी लागेल. संघटना आणि वैयक्तिक स्वयंसेवक यांचा वेगवेगळा विचार करणे भाग आहे. कोणत्याही संघटनेची आपल्या सदस्यांवर पूर्ण पकड असू शकत नाही. संघटनेत वेगवेगळ्या मुद्द्यांवरून मतभेद, विरोधी भूमिका निर्माण होतात. आज्ञापालनासाठी प्रसिद्ध असलेला राष्ट्रीय स्वयंसेवक संघसुद्धा याला अपवाद नाही. अशा वेळी कोणती भूमिका निवडायची याचा निर्णय प्रत्येक संघटना आपल्या तत्त्वप्रणालीनुसार व हेतूंनुसार घेत असते. लोकशाही मूल्ये अथवा बुद्धिवाद मानणारी संघटना मतदान, चर्चा, तर्क यांद्वारे भूमिका निश्चित करेल. मात्र असल्या फडतूस गोष्टींना संघात थारा नाही. संघ एक ध्वज, एक नेता, एक विचारधारा या तत्त्वाबरहुकून आपली भूमिका ठरवतो. मतभेद बाळगणाऱ्यांना, स्वतः विचार करण्याची खोड असणाऱ्यांना दूर व्हावे लागते. संघ वास्तविक एका लहानशा समाजगटाच्या हिताचे प्रतिनिधित्व करतो. मात्र त्यासाठी व्यापक जनतेचे पाठबळ मिळवण्यासाठी खरे हेतू दडवून संघाच्या उद्देश्यांबद्दल एक भ्रामक चित्र निर्माण करणे ही संघाची गरज आहे. त्यासाठी संघाने घडवलेले अतिशय प्रभावी अस्त्र म्हणजे संघाची भावनांना हात घालणारी अलंकारिक उदात्त भाषा. भोळ्या भाबड्या लोकांना संघाशी जोडण्याचे काम या मायावी अस्त्राने वर्षानुवर्षे चोख केले आहे. त्यामुळे सामान्य स्वयंसेवक आणि संघाचे नेतृत्व यांमध्ये वेळोवेळी विरोध निर्माण होत असतो. स्वातंत्र्यलढ्यासंबंधी संघाच्या भूमिकेवरूनही अशा प्रकारचे विरोध निर्माण झाल्याची अनेक उदाहरणे आहेत. म्हणूनच संघाचे स्वयंसेवक व्यक्तिगत पातळीवर स्वातंत्र्यलढ्यात सहभागी झाल्याची उदाहरणे पाहताना त्यावेळी संघटना म्हणून संघाची भूमिका काय होती हे पडताळून पाहणे गरजेचे आहे.

राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे संस्थापक आणि पहिले सरसंघचालक डॉ. केशव बळिराम हेडगेवार यांनी आपल्या राजकीय जीवनाची सुरुवात भारतीय राष्ट्रीय कांग्रेसमधून केली. १९२० साली असहकार आंदोलनात भाग घेतल्याबद्दल त्यांच्यावर खटला भरण्यात आला आणि त्यांना एका वर्षाच्या सश्रम कारावासाची शिक्षा ठोठावण्यात आली. साम्राज्यवादी सत्तेला विरोध करणे हा केवळ अधिकारच नव्हे तर कर्तव्य असल्यामुळे राजद्रोहाच्या खटल्यात सत्याग्रह्यांनी स्वतःची बाजू न मांडण्याचा प्रघात त्यावेळी होता. परंतु डॉ. हेडगेवारांनी न्यायालयात आपली बाजू मांडली. “स्वतःचा बचाव न करता ढेकणासारखे चिरडून जाणे मला योग्य वाटत नाही. आपली बाजू मांडून आपण प्रतिपक्षाचा खोडसाळपणा जगाला अवश्य उघड करून दाखविला पाहिजे. तीही देशसेवाच आहे,” असा युक्तिवाद त्यांनी आपल्या समर्थनार्थ मांडलेला आहे.[2] व देशकार्य करीत असताना तुरुंगातच काय, परंतु जरूर पडल्यास काळ्या पाण्यावर व फासावर जाण्यासही आपण सिद्ध असले पाहिजे, अशी सिंहगर्जनासुद्धा पुढे केलेली आहे. परंतु कारावास भोगून परतल्यानंतर मात्र काळ्या पाण्यावर किंवा फासावर जावे लागणार नाही, याची पुरेपूर दक्षता त्यांनी घेतल्याचे दिसते. देशात राहणाऱ्या सर्व जातीधर्माच्या लोकांचा हा देश आहे, ही भूमिका मान्य नसल्यामुळे ते कांग्रेसपासून दूर झाले. डॉ. हेडगेवारांचे चरित्रकार ना. ह. पालकर यांनी म्हटल्याप्रमाणे “हिंदुस्थानात राहणाऱ्या सर्व लोकांचे हे राष्ट्र आहे, या कल्पनेवरील त्यांचा विश्वास संपूर्णतः उडाला होता व हिंदुत्त्व हेच राष्ट्रीयत्त्व आहे, असा निःसंदिग्ध निर्वाळा त्यांचे मन देऊ लागले होते.”[3] म्हणूनच त्यांनी १९२५ साली राष्ट्रीय स्वयंसेवक संघाची स्थापना केली. या संघटनेद्वारे त्यांनी तरुणांना साम्राज्यवाद विरोधाकडून मुसलमान विरोध आणि कट्टर हिंदुत्ववादाकडे वळवण्यासाठी पुढचे आयुष्य वेचले. स्वातंत्र्यलढ्यात सहभागी होण्याची तळमळ बाळगणाऱ्या तरुणांना हेडगेवारांचे काय सांगणे असायचे ते त्यांच्या चरित्रातील वर्णनावरून उत्तम प्रकारे कळू शकते. या चरित्राचे लेखक ना. ह. पालकर हे स्वतः संघाचे प्रचारक व हेडगेवारांचे सोबती होते, तसेच या चरित्राला संघाचे दुसरे सरसंघचालक गोळवलकर गुरुजी यांची प्रस्तावना लाभलेली आहे. त्यामुळे संघाच्या एखाद्या विरोधकाने जाणूनबुजून खोटे लिहिले असण्याची शक्यताही गृहीत धरता येणार नाही. पालकर लिहितात, “एखादा तरुण सत्याग्रहात सहभागी होण्यास इच्छुक असल्याचे दिसून येताच डाक्टर त्याला प्रश्न करीत, सत्याग्रहानंतर तुरुंगातत जावे लागेल, तयारी आहे का? हो, तरुणाचे ठाम उत्तर असे. किती दिवसांची सिद्धता करून निघाला आहेस? त्याच्याकडून सहा महिने, अशासारखे उत्तर येई. त्यावर डाक्टर म्हणत, सहा महिन्यांच्या जागी दोन वर्षे शिक्षा झाली तर? या त्यांच्या प्रश्नाला चटकन उत्तर मिळे की, भोगीन. इतकी सिद्धता दाखवली की डाक्टर त्याला सांगत असत, की आपणाला शिक्षा झाली आहे असे समजून हा काळ संघकार्याला कां देत नाहीस?”[3] म्हणजेच, स्वातंत्र्यलढ्यात सहभागी होणे हा संघकार्याचा भाग नव्हता. हेडगेवारांच्या अशा उपदेशाला अर्थातच पूर्ण यश मिळत नसे. काही जण आपला विचार बदलत असत, परंतु बरेच जण सत्याग्रहात सहभागी होत. त्यांच्याबद्दल डाक्टरांची भूमिका काय होती. याचेही उत्तर पालकर यांनी दिलेले आहे. “आपण काहीतरी केले असे मिरवण्यास मिळेल अशी जाण्यामागे डोकावणारी लालसा तरुणांत अधिक असलेली पाहून त्यांना (डा. हेडगेवार यांना) दुःख होई.”[3]

मिठाचा सत्याग्रह सुरू होताच संघानेदेखील या आंदोलनात सहभागी होण्यासाठी दडपण येणे स्वाभाविक होते. अशा वेळी पत्रक काढून डॉ. हेडगेवार यांनी संघाची भूमिका पुढीलप्रमाणे स्पष्ट केली, “चालू चळवळीत संघाने संघशः भाग घेण्याचे तूर्त ठरविले नाही. व्यक्तिशः ज्या कोणास भाग घेणे असेल त्याने आपल्या संघचालकांच्या अनुमतीने भाग घेण्यास हरकत नाही. संघाच्या कार्यास पोषक होईल अशा रीतीनेंच त्याने कार्य करावे.”[2] संघाच्या लबाड भूमिकेचे हे उत्तम उदाहरण आहे. स्वातंत्र्यलढ्यात उघड विरोध करणे हे राजकीयदृष्ट्या आत्मघातकी ठरले असते. संघाने ते टाळले. मात्र स्वयंसेवकांना स्वातंत्र्यलढ्यापासून दूर ठेवण्याचे कारस्थान मोठ्या हुशारीने व पूर्ण ताकदीनिशी केले.

राष्ट्रगौरवाच्या बाता मारायच्या आणि स्वातंत्र्यलढ्यापासून फटकून राहायचे या धोरणातून संघ पुरता उघडा पडत होता. स्वयंसेवक व्यक्तिशः सहभागी होत असले तरी संघटना म्हणून संघाची भूमिका स्वातंत्र्यलढ्याच्या विरोधी आहे, हे पावलोपावली दिसून येत होते. यामुळे संघावर टीका होत होती. अशा वेळी संघाने दाखविलेला कोडगेपणा किती उच्च दर्जाचा होता हे भागानगर सत्याग्रहाचे उदाहरण आणि संघाच्या भूमिकेचे डाक्टर हेडगेवार यांनी दिलेले स्पष्टीकरण यावरून दिसून येते. संघावर वर्तमानपत्रातून टीका करणाऱ्यांमध्ये श्री. गो. गो. अधिकारी हे एक होते. अशा टीकेला उत्तर न देण्याची चलाखीची भूमिका एरव्ही संघ घेत असे. परंतु यावेळी परिस्थिति नाजूक असल्यामुळे हेडगेवारांना उत्तर देणे भाग पडले. या उत्तरात डाक्टर म्हणतात, “नित्य कार्ये आणि नैमित्तिक कार्ये यांतला विवेक जर श्री. गो. गो. अधिकारी यांनी ओळखला असता तर संघाविरुद्ध विषारी फूत्कार त्यांनी सोडलेच नसते. भागानगर सत्याग्रह आटोपल्यानंतरही राष्ट्रविमोचनाचे कार्य शिल्लक राहतेच, हे श्री. अधिकारी विसरलेले दिसतात. ज्या वेळी राष्ट्र विमोचनाकरता अखेरचा एकच घाव घालावयाचा असतो त्या अंतिम समरक्षणाच्या आगमनाची पूर्वतयारी हे राष्ट्रविमोचनाचे नित्य कार्य होय, व भागानगर आंदोलनासारखी आंदोलने ही राष्ट्रविमोचनाची नैमित्तिक कार्ये होत. नित्य कार्यात व्यत्यय उत्पन्न होईल अशा रीतीने आपले वैशिष्ट्य व शक्तिसर्वस्व नित्य संस्थेला नैमित्तिक कार्याला वाहता येत नाही.”[2] इंग्रज सत्तेच्या विरोधात आंदोलन करणे हे संघाच्या दृष्टीने एक तुच्छ असे नैमित्तिक कार्य होते. अशा नैमित्तिक कार्यात आपली शक्ती खर्च करायला संघ तयार नव्हता. स्वातंत्र्यलढ्यात सहभागी होण्यास संघाचा असलेला स्पष्ट नकार किती ठाम होता याचा आणखी एक पुरावा क्रांतदर्शी डॉ. केशव बळीराम हेडगेवार या पुस्तकातही पाहावयास मिळतो. या पुस्तिकेचे लेखक डॉ. हेडगेवारांच्या कार्याची थोरवी गाताना म्हणतात, “ज्या काळात स्वातंत्र्यप्रीत्यर्थ चाललेल्या विविध चळवळींव्यतिरिक्त इतरही लहान मोठी सामाजिक कामे घेऊन विविध संस्था कार्य करीत होत्या, त्या काळात डाक्टरांनी असे कोणते ना कोणते विवक्षित काम डोळ्यांसमोर न ठेवता, परिस्थितीनिरपेक्ष देशव्यापी संघटना उभारण्याचे मूलगामी कार्य हाती घेतले. डाक्टर म्हणत असत, “संघाने केवळ हिंदु संघटन हेच लक्ष्य स्वतःसमोर ठेवले आहे.” संघ केवळ संघटन करील, या व्यतिरिक्त काहीही करणार नाही.”[2] संघ खरोखरच फक्त संघटन करीत होता का? या संघटनाचा उद्देश्य काय होता? स्वातंत्र्य चळवळ, इतर सामाजिक कामे यांना ज्या नित्य कार्याच्या प्रेमापोटी संघाने वर्ज्य मानले मानले ते नित्य कार्य नेमके काय होते, व त्याचा हेतू काय होता? संघ खरोखरच कोणतेही नैमित्तिक कार्य करीत नव्हता का? या प्रश्नांच्या उत्तरांसाठी डॉ. हेडगेवार या चरित्रातील नागपूरचा दंगा हे प्रकरण वाचण्यासारखे आहे. हिंदू धर्मनिष्ठ संघ स्वयंसेवकांनी या दंग्यात मुसलमानांचे मुडदे कसे पाडले, मशीद कशी जाळली त्या पराक्रमाचे रसाळ वर्णन लेखकाने मोठ्या अभिमानाने केले आहे. संघाच्या नित्य कार्याचे स्वरूप आणि संघटनाचा हेतू तेथे चांगलाच स्पष्ट झालेला आहे.

संघाचे शस्त्रप्रेम सर्वज्ञात आहे. शस्त्रास्त्रांचे उत्पादन, साठा आणि प्रशिक्षण यांना संघाने स्थापनेपासूनच महत्त्व दिलेले दिसते. वेगवेगळ्या शस्त्रास्त्रांचे प्रशिक्षण संघात स्वयंसेवकांना दिले जायचे. ही शस्त्रास्त्रे इंग्रजांच्या विरोधात कधी वापरण्यात आली का? नागपूरच्या दंग्यात स्वयंसेवकांनी दुरूनच जळत्या बाणांचा वर्षाव करून मशीद जाळली.[3] धनुर्विद्येत एवढे प्रावीण्य स्वयंसेवकांनी मिळवलेले होते, परंतु इंग्रजांच्या कचेऱ्या किंवा पोलीस स्टेशनाच्या दिशेने एकही जळता बण कधी या रामसेवकांच्या धनुष्यातून सुटला नाही. उलट या शस्त्रसाठ्यापैकी मोठा साठा डाक्टर हेडगेवारांनी नष्ट कां केला त्याची कहाणीसुद्धा संघाच्या इंग्रजधार्जिणेपणावर आणि भ्याडपणावर चांगलाच प्रकाश टाकणारी आहे. संघाचे पहिले सरकार्यवाह बाळाजी हुद्दार यांना १९३१ च्या जानेवारीत बालाघाटाच्या राजकीय सशस्त्र दरोड्यात पकडण्यात आले. ( हे बाळाजी हुद्दार पुढे स्पेनच्या गृहयुद्धात लढले आणि तेथून परतल्यानंतर कम्युनिस्ट पार्टी आफ इंडियाचे सदस्य बनले) हा दरोडा अर्थातच संघाने घडवून आणलेला नव्हता. ही बातमी म्हणजे डॉ. हेडगेवार यांच्यासाठी मोठा आघात होता. ना. ह. पालकर यांच्या शब्दांत सांगायचे झाल्यास, “सरसंघचालकाच्या खालोखाल संघटनेत ज्यांचे स्थान आहे त्यांच्यावर असा आरोप येणे म्हणजे पर्यायाने इंग्रजांच्या डोळ्यांत सलू लागलेल्या राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या संघटनेवरील ते गंडांतरच होते. म्हणूनच त्यानंतर डॉ. हेडगेवार यांनी दारुगोळा आणि शस्त्रास्त्रे १९३१ साली नष्ट करून टाकली.”[3] संघ इंग्रजांच्या डोळ्यात सलू लागला होता, असे येथे ना. ह. पालकर म्हणतात. यात कितीसे तथ्य आहे? काही स्वयंसेवकांनी व्यक्तिगत पातळीवर सत्याग्रहांत सहभागी झाल्यामुळे व एकूण देशात स्वातंत्र्य चळवळ ऐन भरात असल्यामुळे इंग्रजांचे संघाकडे लक्ष होते हे खरे. अशा वेळी इंग्रजविरोध हे आपले ध्येय नाही, हे स्वयंसेवकांच्या मनावर बिंबवण्याचा तसेच इंग्रजांना तसा भरवसा देण्याचा डॉ. हेडगेवारांनी संघाचे प्रमुख म्हणून सतत आणि जोरदार प्रयत्न केला. म्हणूनच संघावर बंदी घालण्याची गरज ब्रिटीशांना कधी

पान २ वर

1 श्रीगुरुजी समग्र दर्शन खंड ३

2 डॉ. हेडगेवार : क्रांतदर्शी युगपुरुष – वि. वा. नेने

3 डॉ. हेडगेवार – ना. ह. पालकर

# भूतकाळाच्या कटू आठवणी, भविष्याची सोनेरी स्वप्ने आणि भय व आशेची ती रात्र

**मॅक्सिम गोर्की**
**यांच्या 'आई' कादंबरीचा एक प्रकरण**
**''सत्याचा प्रभाव असा असतो''**

एकदा रात्रीचं जेवण आटोपून पावेलने खिडकीचा पडदा ओढून घेतला व खुर्चीच्या वरच भिंतीतील खिळयाला दिवा टांगून तो कोपऱ्यात वसून वाचू लागला. स्वयंपाकघरातली आवरासावर झाल्यावर आई बाहेर आली व हळूच त्याच्याजवळ जाऊन उभी राहिली. त्याने डोके वर करून तिच्याकडे पाहिले. 'हिला काय हवं आहे?' असाच प्रश्न त्याचे डोळे विचारीत होते.

“काही नाही, उगीच आले होते, पाशा!” एवढंच पुटपुटून ती लगेच घरात निघून गेली. पण तिच्या मनात खळबळ माजली होती ते तिच्या नजरेत स्पष्ट दिसत होतं. आत जाऊनही तिला चैन पडेना. ती हात धुवून परत बाहेर आली व त्याच्याजवळ जाऊन अखेर तिने त्याला विचारलेच,

“तू सारखा काय वाचीत असतोस रे एवढं?”

त्याने पुस्तक मिटले व तो म्हणाला,

“बैस इथे, ममी!”

आता आपल्याला काहीतरी विशेष महत्त्वाचे ऐकायला मिळणार अशा तयारीने ती त्याच्याजवळ बसली व मानचा हिय्या करून तो काय सांगतो त्याची वाट पाहू लागली.

पावेल तिच्याकडे न पाहाताच हळू आवाजात बोलू लागला. त्याच्या आवाजात कां कुणास ठाऊक एक प्रकारचा करारीपणा होता. तो म्हणाला,

“सरकारने आक्षेपार्ह ठरविलेली ही पुस्तकं मी वाचीत असतो. आपल्या कामगारांच्या परिस्थितीची खरीखुरी जाणीव करून देणारं सत्य त्यांत सांगितलं आहे, म्हणून सरकारने त्यांच्यावर बंदी घातली आहे. ही पुस्तकं गुप्तपणे छापली जातात व ती मजजवळ सापडली तर ते मला पकडून तुरूंगात डांबतील - हे सत्य जाणून घेण्याचा प्रयत्न केल्याबदळ मला तुरूंगाची हवा खावी लागेल! आलं का लक्षात?”

हे ऐकून आपला श्वास कोंडला जात आहे असे आईला वाटू लागले. तिने आपले डोळे उघडले व ती मुलाकडे पाहू लागली तेव्हा समोर कोणी तरी परका, अपरिचितच माणूस बसला आहे की काय असा तिला भास झाला. त्याला आवाज निराळा भासत होता - नेहमीपेक्षा गंभीर, सकंप अन् खोल! तो आपल्या ऐटदार मऊ मिशांवरून बोटं फिरवीत होता व खाली वळलेल्या भुवयाखालून त्याचे डोळे कोपऱ्यात विचित्रपणेच टक लावून पाहाता होते. तिला त्याची भीती वाटली व त्याच्या विषयी अनुकंपाही वाटू लागली.

“हे तू का करतोस, पाशा?” तिने विचारले.

त्याने मस्तक वर उचलून तिच्याकडे पाहिले व शांतपणे उत्तर दिले,

“मला सत्य समजून घ्यायचे आहे म्हणून!”

त्याचा स्वर मृदु पण निश्चयी होता. त्याच्या नजरेतही करारीपणा होता. आपल्या मुलाने कसल्या तरी गुप्त व भयंकर कार्याला वाहून घेतले आहे एवढे तिला कळून चुकने. घडणाऱ्या गोष्टी अपरिहार्य असतात असे समजून त्या स्वीकारण्याची व निमूटपणे मान तुकविण्याची सवय तिच्या अंगी भिनून गेली होती. आतासुद्धा पाशाने जे सांगितलं त्यामुळे ती दुःखाने इतकी दडपून गेली व तिच्या अंतःकरणात अशा असह्य वेदना सुरू झाल्या की तिच्या तोंडातून एक शब्दसुद्धा बाहेर पडला नाही. ती फक्त मुळुमुळू रडू लागली.

“रडू नकोस, आई.” पावेल अत्यंत मृदू व प्रेमळ स्वरात तिला म्हणाला. पण तिला मात्र त्या स्वरात असा अर्थ ध्वनित झाला की तो आपला निरोप घेऊन कोठेतरी दूर जाण्याला निघाला आहे!

“आपण हे कसलं आयुष्य जगतो याचा तूच विचार कर, आई! तूच आता चाळीस वर्षांची आहेस, पण तुझ्या वाट्याला आजवर काही तरी सुख आलं आहे का? बाबा तुला मारीत-त्यांना स्वतःला जो छळ सहन करावा लागला, जे खडतर जीवन जगावं लागलं, त्याचा सगळा राग ते तुझ्यावर काढीत होते, हे त्यातलं रहस्य आता मला समजलं आहे. कोणतीतरी शक्ती त्यांना दडपून होती, पण ते काय होतं हे त्यांना उमजलं नाही. तीस वर्षे ते या ठिकाणी गुलामासारखे राबले. इथल्या कारखान्यात त्यांनी कामाला सुरवात केली तेव्हा फक्त विभाग होते, त्या ठिकाणी आता सात झाले आहेत!”

ती उत्सुकतेने त्याचं म्हणणं ऐकत होती, पण त्याचबरोबर तिला एक प्रकारचं भयही वाटत होतं. तिच्या मुलाच्या नेत्रांत एक प्रकारचं तेज विलसत होतं. समोरच्या टेबलावर छाती टेकून तिच्या अश्रूपूर्ण नयनांकडे पाहात तो त्याला नव्यानेच आकलन झालेल्या सत्याचं विवरण करणारं त्याचं पहिलं भाषण करीत होता. त्याच्या बोलण्यात तारूण्याचा दुर्दमनीय उत्साह, आपल्याला प्राप्त झालेल्या ज्ञानाचा विद्यार्थ्याला साजेसा अभिमान व त्यावरील दृढ श्रद्धेमुळे वाटणारा आत्मविश्वास, प्रतीत होत, होता. त्याच्या बोलण्याचा मुख्य हेतु आईला समजावून सांगण्यापेक्षाही स्वतःची कसोटी पाहणे हा होता. काही वेळ बोलून झाल्यावर योग्य शब्द सुचेनात म्हणून तो थांबला तेव्हा त्याला आपल्यासमोर बसलेल्या आईच्या व्यथित चेहऱ्याची तीव्रतेने जाणीव झाली. तिच्या प्रेमळ नेत्रांत अश्रू तरळत होते व ती त्याच्या बोलण्याने चकित होऊन त्याच्याकडे टक लावून पहात होती. आपल्या आईची त्याला करूणा आली व तो तिच्या जीवनाविषयी पुनः बोलू लागला.

“तुला आतापर्यंत कोणतं सुख भोगायला मिळांल? आनंदाचे असे काही तरी प्रसंग तुला आठवतात का ?”

तिचे त्याचं बोलणं ऐकून दुःखाने आपली मान हालवली. तिला काहीतरी नव्याच प्रकारची संवेदना होत होती. तिला दुःख होत होतं व आनंदही होत होता. तिच्या आजवर सतत विव्हळणाऱ्या अंतःकरणावर मायेची फुंकर घातली जात होती. आजवर कुणीच तिच्याशी तिच्या जीवनाबद्दल बोललं नव्हतं. मुलाच्या शब्दांनी तिच्या सुप्त विचारांना नव्याने चालना मिळाली होती. जीवनाविषयी तिला वाटणाऱ्या उबगाची व असंतोषाची भावना जवळजवळ मरून गेली होती ती पुनः उचंबळून आली. विस्मृतीच्या उदरात गडप झालेल्या तारुण्यातील भावना व आशा आकांक्षा पुनःजाग्या झाल्या. तरुणपणी ती बरोबरीच्या मैत्रिणींशी संसाराविषयी बोलायची, पण ती स्वतः व त्या मैत्रिणीसुद्धा दुःखाच्याच कर्मकहाण्या सांगत आपल्या खडतर जीवनाचे मूळ कशात आहे याबद्दल कुणीच कधी विचार केला नव्हता. पण आज तिचा पुत्र तिच्यासमोर बसून जे बोलत होता व त्याच्या डोळयांत व चेहऱ्यावर जे भाव व्यक्त होत होते ते तिच्या अंतःकरणाला जाऊन भिडत होते. आपल्या मुलाला आपल्या आईचे जीवन पूर्णपणे समजले आहे, आल्या दुःखाला त्याच्या तोंडून वाचा फुटत आहे व त्याला आपल्याविषयी सहानुभूती वाटत आहे, या जाणिवेने तिचे अंतःकरण त्याच्याविषयीच्या अभिमानाने भरून आले.

मानेच्या दुःखाची जाणीव कुणालाच नसते, हे ती जाणून होती. परंतु आज तिचा मुलगा स्त्रियांच्या कर्मकहाणीविषयी जे बोलत होता ते तिच्या परिचयाचे कटु सत्य होते, व त्याच्या त्या बोलण्याने तिच्या हृदयातील मृदु भावना चाळवल्या जाऊन तिच्या अंतःकरणाचे पाणीपाणी होत होते.

“पण मग तू काय करणार आहेस?” तिने त्याला मध्येच थांबवून विचारले.

“मी प्रथम स्वतः अभ्यास करणार, अन् मग इतरांना शिकवणार. आम्ही कामगारांनी अभ्यास करायला हवा. आपले जीवन इतके खडतर कां असते हे नीट समजून घ्यायला हवं.”

त्याच्या निळया नेत्रांतील नेहमीचा कठोरपणा व गांभीर्य जाऊन त्याजागी मार्दव व प्रेमळपणाचे नवे तेज दिसू लागले ते पाहून ती हर्षित झाली. तिच्या ओठांवर स्मिताची रेखा उमटली. तिच्या अंतरंगात दोन परस्परविरोधी भावनांचा संघर्ष सुरू होता. जीवनातील दुःखांची इतकी तीव्र व स्पष्ट जाणीव आपल्या मुलाला झाली आहे हे पाहून तिला त्याच्याविषयी एकीकडे अभिमान वाटत होता, तर त्याचबरोबर दुसरीकडे त्याचे वय अजून फार कोवळे आहे, आणि तो इतरांपेक्षा अजिवात निराळं बोलत आहे व तिच्या स्वतःसकट सर्वांनाच अटळ वाटणाऱ्या जीवनातील दुःखांविरूद्ध व हालअपेष्टांविरूद्ध एकाकीच लढण्याचा त्याचा निर्धार आहे, या विचाराने ती चिंताग्रस्त होत होती.

तिला वाटणे, आपण याला म्हणावे, “बेटा! तू एकटा काय करणार?”

पण आपण असं म्हटलं तर त्याच्याविषयीचं वाटणारं कौतुक व आदर यात काहीतरी कमीपणा येईल, अचानकपणे इतकी हुशारी दाखविणाऱ्या व अपल्याला अगम्य असं काहीतरी नवंच बोलणाऱ्या आपल्या मुलाच्या मोठेपणाला त्यामुळे बाधा येईल, असा विचार येऊन तिने ओठावर आलेले ते शब्द मागे परतवले.

आपल्या आईच्या ओठांवरचे स्मित, आपलं बोलणं ऐकण्यातील तिनची एकाग्रता, तिच्या नेत्रांतील प्रेमळ भाव, हे सर्व पावेलने पाहिले आणि आपण प्रतिपादन करीत असलेले सत्य तिला पटवून देण्यात आपल्याला यश आले आहे असे त्याला वाटले. आपल्या शब्दांतील ही शक्ती प्रत्ययास येऊन त्याला युवकसुलभ अभिमान वाटला व त्यायोगे त्याचा आत्मविश्वास दुणावला. तो आवेशाने बोलत होता. मधूनमधून त्याच्या चेहऱ्यावर स्मित दिसू लागे, तर क्षणात त्याच्या कपाळावर आठ्यांचे जाळे पसरे. मधूनमधून त्याच्या शब्दांत जळजळीत चीड व्यक्त होई व त्याचे शब्द इतके कठोर असत की ते ऐकून ती भयभीत होऊन जाई व मस्तक हालवून त्याला मृदु स्वरात विचारी,

“तू म्हणतोस ते शक्य आहे, पाशा?”

“होय, शक्य आहे!” तो निर्धाराने उत्तर देई, आणि मग बहुजनसमाजाचे हित साधण्याची तळमळ असलेले काही लोक जनतेत सत्याचा प्रचार कसा करीत होते आणि त्यामुळे मानवजातीचे शत्रू त्यांना तुरूंगांत डांबून व सक्तमजुरीची शिक्षा देऊन त्यांचा कसा छळ करीत होते, याचे वर्णन करू लागे.

“असा ज्यांचा छळ होत आहे असे लोक माझ्या माहितीचे आहेत. ते खरोखर धरतीमातेचे सुपुत्र आहेत,” तो आवेगाने म्हणाला.

त्या लोकांविषयीच्या विचाराने तिला अधिकच भय वाटू लागलं व हे सारं खरंच का म्हणून पुनःविचारावंसं तिला वाटलं, पण तिला ते शब्द उच्चारण्याचा डोक्यात भरवले होते व ज्यांच्याविषयी नीट आकलन होणे तिच्या तर्कशक्तीपलीकडचे होते, त्यांच्याबद्दलच्या हकीकती ती श्वास रोखून ऐकू लागली, अखेर ती त्याला म्हणाली,

“पहाट होत आली आता, तू आता जाऊन थोडी तरी झोप घे पाहू.”

“हो, झोपतोच मी आता,” तो तिच्याकडे वाकून म्हणाला. “पण मी सांगितलं ते सारं समजलं ना तुला?”

“हो,” ती उसासा टाकून म्हणाली, पुनः तिच्या नेत्रांतून अश्रू वाहू लागले व ती एकदम मोठ्याने म्हणाली, “अशानं तुझा सत्यानाश होईल, बेटा!”

तो उठला व खोलीच्या दुसऱ्या टोकाकडे चालू लागला.

“ते काही असू दे, पण मी काय करतो, कुठे जातो, हे मी तुला सांगितलं आहे. आणि तुझं माझ्यावर खरोखर प्रेम असेल तर तू माझ्या या कार्याच्या आड येऊ नकोस अशी तुझ्याजवळ भीक मागतो, ममी!”

“माझ्या लाडक्या बेटा!” ती हुंदके देत म्हणाली. “कदाचित् तू मला हे सारं सांगितलं नसतं तरच बरं झाले असतं रे!”

त्याने आईजवळ जाऊन तिचा हात हातात घेऊन प्रेमभराने घट्ट दाबून धरला.

त्याने ज्या सहृदयतेने 'ममी' हा शब्द उच्चारला होता व ज्या विलक्षण व नव्याच आवेगाने तिचा हात दाबला होता त्याने ती भारावून गेली.

ती अडखळत म्हणाली, “नाही बेटा, मी तुझ्या आड येणार नाही. पण जपून राहा बरं, जपून राहा बाळ!” कोणत्या संकटापासून त्याचा बचाव करायचा होता याची तिलाच स्पष्ट कल्पना नव्हती, म्हणून ती शोकाकुलपणे एवढंच म्हणाली, “तू दिवसेंदिवस किती सारखा वाळत चालला आहेस रे!”

तिने आपली प्रेमळ नजर त्याच्या उंच शरीरावर वरपासून खालपर्यंत फिरवली व ती म्हणाली,

“तुला योग्य वाटेल तसं कर. मी तुझ्या मार्गाच्या आड कधीच येणार नाही. पण माझं एकच सांगणं आहे. कोणाशीही बोलताना सावधगिरीने वाग. लोकांपासून जपून राहा. लोक एकमेकांना पाण्यात पहात असतात. लोक फार स्वार्थी, लोभी अन् मत्सरी असतात. दुसऱ्याच्या वाईटावर टपलेले असतात. तू एकदा त्यांच्याकडे वोटं दाखवून त्यांचे दोष काढू लागलास म्हणजे ते तुझा द्वेष करतील अन् तुझा नाश करतील!”

पावेल दरवाज्यातच उभा राहून तिचे हे व्यथित अंतःकरणातून निघणारे उद्गार ऐकत होता. तिचे बोलणे झाल्यावर तो किंचित हसून म्हणाला,

“तू म्हणतेस ते बरोबर आहे-लोक वाईट आहेत हे खरं आहे. पण सत्य नावाची काही तरी चीज आहे हे मला कळून आल्यापासून मला वाटू लागलं आहे की लोक काही तितके वाईट नाहीत. माझ्यात हा बदल कसा झाला ते मला ठाऊक नाही, पण मी अगदी लहान होतो तेव्हा मला सर्वांची भीती वाटे, नंतर मी मोठा होऊ लागलो तसा सर्वांविषयी तिरस्कार वाटू लागला. काही लोक फार क्रूर होते म्हणून, आणि इतरांचा का ते मला ठाऊक नाही, पण तिरस्कारच वाटत होता एवढं खरं! पण आता सगळंच निराळं वाटू लागलं आहे. मला आता लोकांचा राग येण्याऐवजी त्यांची दया येते. कां कुणास ठाऊक, पण लोक दुष्ट असतात त्याला सर्वस्वी ते जबाबदार असतात असं नाही हे कळून आल्यापासून मला त्यांच्याविषयी सहानुभूती वाटू लागली आहे?”

मधूनच जणू काय आपल्या अंतरंगातून येणारा आवाज ऐकण्यासाठी तो थांबला व नंतर विचारमग्न होत शांतपणे उद्गारला,” हा सर्व सत्याचं आकलन झाल्याचा परिणाम!”

त्याच्याकडे एक नजर टाकून उसासा टाकीत आई पुटपुटली,

“देवा तूच याचं रक्षण! तुझ्यात काहीतरी भयंकरच बदल घडून आला आहे बेटा!”

थोड्या वेळाने पावेलला झोप लागल्यावर आई स्वतःच्या बिछान्यावरून हळूच उठून त्याच्या बिछान्याजवळ जाऊन उभी राहिली. तो गाढ झोपी गेला होता. त्याच्या तांबुस चेहऱ्यावरील कठोर व निश्चयी भाव व्यक्त करणाऱ्या रेषा पांढऱ्या शुभ्र उशीवर स्पष्ट उठून दिसत होत्या. ती हात छातीवर घट्ट दाबून उभी होती. तिचे ओठ हालत होते, पण त्यातून शब्द बाहेर पडत नव्हते. तिच्या नेत्रांवाटे बाहेर पडणारे टपोरे अश्रूंचे थेंब तिच्या गालांवर ओघळत होते.

# गरीबांच्या तोंडचा घास पळवून फुगतोय मालकांचा नफा आणि वाढतेय जीडीपी

मुकेश त्यागी

भांडवली व्यवस्थेत उत्पादनाचं चारित्र्य सामाजिक झालेलं आहे. म्हणजेच वस्तूंचं उत्पादन वेगवेगळ्या व्यक्तींनी स्वतंत्रपणे करत नाही, तर अनेकानेक श्रमिक ते सामूहिकपणे करत असतात. परंतु या उत्पादित वस्तूंची मालकी सामाजिक नसते, म्हणजेच या उत्पादकांची सामूहिक मालकी नसते, तर उत्पादनाच्या साधनांच्या मालकांचं म्हणजेच भांडवलदारांची खासगी मालकी असते. उत्पादकांना आपली श्रमशक्ती विकण्याच्या मोबदल्यात भांडवलाच्या मालकांकडून ठरलेली मजुरी मिळते, तर उत्पदनांच्या एकूण मूल्यावर मालकांचे स्वामित्व असते. त्यामुळे त्यांचा नफा आणि संपत्ती वाढत जाते. श्रमिकांच्या श्रमशक्तीचे मूल्यसुद्धा बाजारातील मागणी आणि पुरवठ्याच्या नियमांनुसार ठरत असते. कामगारांची एक विशाल बेरोजगार फौज श्रमाच्या बाजारात स्वतःला विकण्यासाठी उपलब्ध असेल, तर हे मूल्य इतके कमी होते की ते त्यांना जगण्यासाठीसुद्धा पुरेसे नसते. कारण मालक भांडवलदाराला श्रमिकांची लांबच लांब रांग स्वतःला विकण्यासाठी तयार असलेली दिसत असते. अशा परिस्थितीमध्ये कामगारांचे जगणे दिवसेंदिवस अधिकाधिक बिकट होत जाते तर भांडवलदारांचे जीवन अधिकाधिक समृद्ध होत जाते. प्रचलित व्यवस्थेत भांडवलदारांच्या नफ्यात आणि संपत्तीत झालेल्या वाढीलाच आर्थिक विकास असे म्हटले जाते. आज भारताच्या अर्थव्यवस्थेला गती मिळाल्याची चर्चा सुरू असते, आणि भारताची अर्थव्यवस्था ही जगातील सर्वाधिक वेगाने वाढणारी अर्थव्यवस्था आहे, असेही सांगितले जाते. या विकासाची खरी कहाणीसुद्धा बहुसंख्य श्रमिक, अर्धश्रमिक जनतेच्या जीवनावर झालेल्या तिच्या परिणामावरून समजून घ्यावी लागेल. १९९१ मध्ये सुरू झालेल्या आर्थिक सुधारणांनी देशाची अर्थव्यवस्था किती मजबूत झाली आहे त्याचे वास्तव जाणून घेण्यासाठी जिडीपी, जीएनपीमधील वाढ, आयात निर्यातीचे आकडे, घरांच्या दुकानांच्या किंमती, अब्जाधिशांची संख्या किंवा सेन्सेक्स आणि निफ्टीचा चढउतार बघण्याऐवजी आपण नॅशनल न्यूट्रिशन मानिटरिंग ब्युरोच्या सर्वेच्या निष्कर्षांवरून आणि इतर स्रोतांपासून मिळणाऱ्या माहितीवरून नजर फिरवू. निवारा, शिक्षण, आरोग्य इत्यादी सोडूनच द्या, पण या काळामध्ये गरिबांना मिळणाऱ्या अन्नाचे प्रमाणसुद्धा सतत घसरत गेले आहे, असे त्यावरून दिसून येते. हा ब्युरो १९७२ मध्ये ग्रामीण जनतेच्या पोषणाकडे लक्ष पुरविण्यासाठी स्थापन करण्यात आला होता, व त्याने १९७५-१९७९, १९९६-१९९७, २०११-२०१२ मध्ये तीन सर्वे केले. या एकूण कालावधीत सरकारे तीव्र आर्थिक विकासाचे अहवाल देतच होती, म्हणूनच जनतेच्या भोजनाच्या पोषणाच्या प्रमाणातही सुधारणा झाली असेल, अशी अपेक्षा स्वाभाविकपणे केली जाऊ शकते. परंतु त्याच्या उलट तळागाळातील जनतेला मिळणाऱ्या पोषणाचे प्रमाण सतत घसरत गेले आहे, असे दिसून आले.

२०१२ च्या न्यूट्रिशन ब्युरोच्या ग्रामीण भारताच्या शेवटच्या सर्वेनुसार १९७९ च्या तुलनेत सरासरी प्रत्येक ग्रामीण माणसाला ५५० कॅलरी उर्जा, १३ ग्राम प्रोटीन, पाच मिलीग्राम लोह, २५० मिग्रा कॅल्शियम आणि ५०० मिग्रा विटामीन दिवसापाठी कमी मिळते आहे. त्याचप्रकारे ३ वर्षांखालील मुलांना आवश्यक असलेल्या सरासरी ३०० मिली दुधाच्या तुलनेत ८० मिली दूधच मिळते आहे. सर्वे असेही सांगतो की १९७९ मध्ये सरासरी दैनिक गरजेपुरते प्रोटीन, उर्जा, आयर्न, कॅल्शियम उपलब्ध होते, परंतु २०१२ येता येता फक्त कॅल्शियम पुरेश्या प्रमाणात मिळू शकते आहे. दैनंदिन आवश्यकतेच्या तुलनेत प्रोटीन फक्त ८५ टक्के, उर्जा ७५ टक्के, तसेच आयर्न फक्त ५० टक्के मिळते आहे. फक्त विटामीन ए एकमेव असे पोषक तत्त्व आहे ज्याचे प्रमाण १९७५ च्या ४० टक्क्यांच्या तुलनेत १९९७ मध्ये वाढून ५५ टक्के झाले होती. परंतु तेसुद्धा २०१२ मध्ये कमी होऊन दैनिक गरजेच्या ५० टक्के होऊन राहिले. म्हणूनच ३५ टक्के ग्रामीण स्त्रीपुरुष कुपोषित आहेत, तर ४२ टक्के मुले मानक स्तराहून कमी वजनाची आहेत. ही आकडेवारी एकूण लोकसंख्येची आहे, गरीब जनतेमध्ये तर परिस्थिती अधिकच वाईट आहे. आजीविका ब्युरो नावाच्या संघटनेद्वारे दक्षिण राजस्थानच्या गावांमध्ये केलेल्या सर्वेनुसार अर्ध्या मातांना डाळ मिळालेली नव्हती, तर एक तृतियांशांना भाजी मिळू शकलेली नव्हती. फळे, अंडी, किंवा मांस तर कुणालाही मिळण्याचा प्रश्नच नव्हता. म्हणूनच अर्ध्या मातांना आणि त्यांची मुले ही कुपोषित आहेत.

या परिस्थितीची कारणे काय आहेत? याचे उत्तर न्युट्रिशन ब्युरोच्या सर्वेमध्येच आहे. वास्तविक १९७९ मध्ये ३० टक्के ग्रामीण जनता भूमिहीन होती, आज ४० टक्के आहे. मजुरीवर अवलंबून असलेल्या कुटुंबांची संख्या ५१ टक्क्यांवर पोहोचली आहे तर २७ टक्के गरीब शेतकरी आहेत ज्यांचे उत्पन्न अगदीच कमी आहे व त्यांना उपजीविकेसाठी आपल्या जमिनीवर विसंबून राहता येत नाही, म्हणून त्यांना उरल्या वेळेत मजुरीच करावी लागते. २०११ च्या जनगणनेनुसार भूमिहीन



शेतमजुरांची संख्या २००१ मधील १०.६७ टक्क्यांवरून १४.४३ टक्क्यांवर पोचली आहे. सुपीक जमिनीची मालकी असलेले शेतकरी पूर्वीच्या निम्म्यानेच आहेत. म्हणजेच तीन चतुर्थांश ग्रामीण जनता आता भोजनासाठी बाजारातील खरेदीवर अवलंबून आहे. सरकारने या वर्षी अगोदरच संसदेत सांगितले आहे की महागाईशी जुळवून घेण्यासाठी शेतीमधील मजुरीचा दरसुद्धा कमी झाला आहे. २०१४ आणि २०१५ मध्ये ती १ टक्का कमी झाली आहे. इतर वस्तूंच्या तुलनेत खाद्यपदार्थांच्या दरांमध्ये जास्त वाढ झालेली आहे, हेसुद्धा लक्षात घ्यावे लागेल – ६.७ टक्क्यांच्या तुलनेत १० टक्के. खाद्यपदार्थांमध्येसुद्धा डाळी, चरबी तसेच भाज्यांच्या किंमती जास्त वेगाने वाढल्या आहेत. नॅशनल सँपल सर्वेनुसार शहरांतील आणि गावांतील सर्वांत गरीब माणसे खरेदी करीत असलेल्या वस्तूंच्या किंमती शहरी श्रीमंत वापरत असलेल्या वस्तूंच्या तुलनेत ५ टक्के जास्त वाढल्या आहेत. म्हणजेच ग्रामीण भारतातील बहुसंख्या आता ना पुरेसे अन्न उत्पादन करण्यास समर्थ आहे, ना खरेदी करण्यास. बहुसंख्य लोकांसाठी डाळी, भाज्या, फळे, दूध, अंडी, मांस इत्यादी पदार्थ दुर्लभ होत चालले आहेत.

विकसित देशांच्या गोष्टी क्षणभर बाजूला ठेवू. मिडिया भारताची तुलना उदयोन्मुख म्हटल्या जाणाऱ्या ब्रिक्स देशांशी करते. त्यांच्याशी तुलना करून पाहता भारतातील कुपोषणाची स्थिती ब्राझीलपेक्षा १३ पटीने, चीनपेक्षा ९ पटीने आणि १९९४ पर्यंत भयंकर वर्णद्वेषी शासन झेलणाऱ्या दक्षिण आफ्रिकेपेक्षाही ३ पटीने वाईट आहे. तरीही कुपोषण ही लक्ष पुरवण्याजोगी समस्या आहे, असे आपल्या शासकांना वाटत नाही. भारताच्या आर्थिक राजधानीला, मुंबईला, लागूनच असलेल्या पालघर येथे गेल्या वर्षी ६०० आदिवासी मुलांचा कुपोषणामुळे मृत्यू झाला. याबद्दल आदिवासी खात्याच्या मंत्र्यांना विचारले असता त्यांचे उत्तर सरळ होते, "म्हणून काय झाले?" आता तर "सबका साथ सबका विकास"वाल्या मोदी सरकारने हा न्यूट्रिशन ब्युरोच बंद करून टाकला आहे. म्हणजे आता गैर सोयीचे वास्तव उजेडातच येऊ नये. परंतु सत्याचा आवाज इतक्या सहजासहजी दाबता येतो का?

उपरोक्त आकडेवारी ग्रामीण भारतासंबंधी असली तरी शहरी कामगारांची, निम्न मध्यम वर्गाची अवस्था याहून वेगळी नाही, हे आपल्याला चांगलेच ठाऊक आहे. देशातील ८० टक्के लोकांसाठी या सुधारणांचा अर्थ भूक आणि कुपोषण एवढाच आहे. आपण वाढता कार्पोरेट नफा, अब्जाधिशांची वाढती संख्या याबद्दल ज्या बातम्या वाचतो त्यामागचे कटू वास्तव हेच आहे की गरीब कामगार, शेतकरी, निम्न मध्यमवर्गीय लोकांच्या तोंडातला घास हिसकावूनच हा नफा, अब्जावधींची संपत्ती गोळा होते आहे. म्हणूनच या सर्व सर्वेच्या बातम्या किंवा त्यांवर चर्चा कार्पोरेट मिडियामध्ये होताना कधी दिसत नाही.

चला, आता शहरांतील गरिबांच्या परिस्थितीवर नजर फिरवू. शहरांच्या वरवर दिसणाऱ्या झगमगाटामुळे त्यांची अवस्था फार चांगली आहे, असे समजू नये. दिल्ली आणि मुंबईसारख्या शहरांच्या झोपडपट्ट्यांमध्ये राहणारी एक चतुर्थांश जनता, म्हणजेच १० कोटी अत्यंत गरीब माणसंसुद्धा भूक आणि कुपोषणाने तेवढीच प्रभावित आहेत. आणि जसजशी भारत आर्थिक महासत्ता बनत असल्याची चर्चा वाढत जाते, तसतशी उपासमार झेलणाऱ्या लोकांची संख्या कमी होण्याऐवजी वाढत जात असते. युनिसेफनुसार भारतात दर वर्षी पाच वर्षांखालील १० लाख मुले कुपोषणाशी संबंधित कारणांमुळे आपला जीव गमावतात. सरासरीपेक्षा कमी वजन असलेल्या ५ वर्षांखालील मुलांची संख्या पाहिली तर लक्षात येऊ शकेल की विकसित देशांची गोष्ट दूर राहिली, ब्राझील, चीन, दक्षिण आफ्रिकासारखे तिसऱ्या जगातील देशही बाजूला ठेवू, शहरी मुलांच्या कुपोषणाच्या बाबतीत आपण बांगलादेश-पाकिस्तानपेक्षाही आपली अवस्था वाईट आहे. भारतात ही टक्केवारी ३४ आहे, तर बांगलादेशमध्ये २८, पाकिस्तानमध्ये २५ दक्षिण आफ्रिकेत १२, ब्राझीलमध्ये २ आणि चीनमध्ये १ टक्के.

भारताची राजधानी दिल्ली आणि आर्थिक राजधानी मुंबईबद्दल विस्तारपूर्वक जाणून घेऊ कारण तेथील जास्त माहिती उपलब्ध आहे. त्यातून इतर शहरांबद्दलसुद्धा अंदाज करता येईल. या दोन्हींच्या एकूण लोकसंख्येचा निम्मा भाग म्हणजेच सुमारे २.४० कोटी लोक झोपडपट्ट्यांमध्ये राहतात. या झोपडपट्ट्या भयंकर गर्दी, गरीबी आणि कुपोषणाची केंद्रे आहेत. येथे माणसे कशा प्रकारे राहतात ते समजून घेण्यासाठी एवढेच सांगणे पुरेसे आहे की मुंबईच्या एकूण लोकसंख्येचा ६० टक्के हिस्सा झोपडपट्ट्यांमध्ये राहतो ज्यांचे क्षेत्रफळ एकूण भूभागाच्या फक्त ८ टक्के इतकेच आहे. मुंबईच्या गोवंडी, मानखुर्द किंवा दिल्लीच्या अशाच कुठल्याही कामगार वस्तीमध्ये गेल्यावर उघडी पडलेली गटारे, कचऱ्यांचे ढीग आणि घोंघावणाऱ्या माशा-मच्छरांसह डबक्यात राहिल्यासारखी माणसे राहत आहेत. देशाच्या वेगवेगळ्या गावांत त्यांच्या आजीविकेची साधने नष्ट झाल्यावर त्यांनी झोपडपट्ट्यांमध्ये आसरा घेतलेला असतो. परंतु यांपैकी काही तर या झोपडपट्ट्यांमध्येसुद्धा धड निवारा मिळवू शकत नाहीत, कारण कधी बुलडोजर, कधी प्रापर्टी डिलरांच्या माफिया टोळ्या त्यांच्या थोड्याफार भांडाकुंड्यांचीसुद्धा तोडफोड करतात, घराला आगी लावतात.

या गरीब कामगार वस्त्यांमध्ये सर्रास आईवडिलांना बहुतेक वेळ कष्टाची कामे करण्यात घालवावा लागतो, कामासाठी येण्याजाण्यातही बराच वेळ जातो व स्वतःसाठी स्वयंपाक करण्यासही वेळ मिळत नाही, एवढी कमाईसुद्धा नसते की आपश्यक पोषणयुक्त भोजन सामग्री विकत घेता येईल. अशी माणसे व त्यांची मुले पोषणाच्या नावाने फक्त पीठ, मैदा, साखर आणि चिकट तेलातील कचरा-अन्न (जंक फूड) विकत घेणे तेवढे त्यांना परवडते. डाळीच्या नावाने कधी कधी स्वस्त मसूर आणि भाजीच्या नावाने डाळ मिळते, फळे अथवा दूध स्वप्नासारखे असते. नाश्ता म्हणून चहासोबत शेव-चिवड्यावर वेळ मारून नेली जाते आणि मुलांना भूक लागली तर मैद्याचे नूडल्स किंवा मैदा, साखर, तेलकट जिलेबीसारख्या पदार्थांनी काम चालवले जाते. ही गरीब कुटुंबे अशा प्रकारचे जेवण चवीसाठी स्वीकारत नाहीत तर ते पोषक नसते परंतु भूक मारण्याचे काम करते म्हणून स्वीकारतात. त्याहून महत्त्वाचे कारण म्हणजे ते डाळ, भात, पोळी, भाजी, सलाद अशा संतुलित आहाराच्या एक तृतियांश किंमतीत मिळत असते तसेच वेळेची अडचण असल्यामुळे कित्येक कामगारांसाठी ते सोयीचे असते. परंतु अशा प्रकारच्या अन्नाचा परिणाम म्हणजे कमी उंची, वेडीवाकडी हाडे, किडके दात, फुगलेली पोटे, आजारांचा प्रतिकार करण्यास अक्षम शरीर म्हणजेच कुपोषण. अशी मुले डायरिया, मलेरिया, न्युमोनिया यांसारख्या आजारांना सहज बळी पडतात. दर वर्षी सुमारे १० लाख मुले कुपोषणामुळे ५ वर्षांच्या आत मृत्यूमुखी पडतात. त्याचबरोबर हा आहार फक्त शरिराची हानी करतो असे नाही, तर मेंदूसुद्धा क्षीण बनवतो. त्यांची शिकण्याची, अभ्यास करण्याची क्षमता कमी करतो. दिल्लीतील २० लाख मुलांची शारिरीक व बौद्धिक वाढच कुपोषणामुळे खुंटलेली आहे. देशातील गरीब कामगार शेतकऱ्यांचीच नाही तर निम्न मध्यमवर्गीय कुटुंबांची अवस्थासुद्धा अशीच होऊ लागली आहे, कारण एकीकडे घसरलेले वास्तविक उत्पन्न आणि दुसरीकडे खाद्यपदार्थांची साठेबाजी – काळाबाजार यामुळे आकाशाला भिडलेले दर अधिकांश भारतीयांना शारीरिक- बौद्धिक आरोग्याच्या ऱ्हासाच्या गर्तेत ढकलत आहेत.

जागतिक अन्न आणि कृषी संघटना () च्या २०१५ च्या जागतिक भूक अहवालानुसार भारतात एकूण १९.४६ कोटी लोक कुपोषणाचे बळी आहेत ज्यांची संख्या गेल्या ५ वर्षांमध्ये २.६ टक्क्यांनी वाढली आहे. म्हणजेच ५ वर्षांपूर्वी त्यांची संख्या १८.९९ कोटी इतकी होती. म्हणजेच पाकिस्तानच्या एकूण लोकसंख्येपेक्षाही भारतात १.२० कोटी जास्त माणसे कुपोषित आहेत. येथे कुपोषणाचा अर्थ काही दिवस अन्नाची कमतरता झेलणे एवढाच नाही, तर अशी माणसे ज्यांना सतत एक वर्ष किंवा त्याहून जास्त कालावधी

पान ३ वर

# काळ्या पैशाच्या नावाखाली नोटबंदी
# आपले अपयश झाकण्यासाठी जनतेची फसवणूक

गेल्या ८ नोव्हेंबरच्या रात्रीपासून देशभरात जणू अफरातफरी माजली आहे. बँकांच्या बाहेर लोकांच्या लांबच लांब रांगा लागल्या आहेत. सगळी महत्वाची कामं सोडून लोक आपल्याच मेहनतीचा आणि बचतीचा पैसा घेण्यासाठी धक्के खाताहेत. कुठे दवाखान्यात रुग्णांचा इलाज होत नाहीये, कुठे बाजार बंद आहे, कामगारांना त्यांचा पगार मिळाला नाहीये, लोक त्यांच्या दैनंदिन किरकोळ गरजांची पूर्तता करू शकत नाहीत. देशात अनेक ठिकाणी या धक्क्यानं अनेकांना जीव गमवावा लागण्याच्या बातम्या येताहेत. गंमत म्हणजे देशातल्या बड्या भांडवलदारांना-व्यापाऱ्यांना, अधिकारी-नेत्यांना, अभिनेत्यांना काळ्या पैशाच्या या तथाकथित सर्जिकल स्ट्राईकमुळे त्रास झालेला नाही. ज्यांच्याकडे काळा पैसा असण्याची जास्त शक्यता आहे ते तर कुणीच बँकेच्या रांगेत धक्के खाताना दिसत नाहीत. उलट ते सरकारच्या निर्णयाचं स्वागत करत आहेत. काय गौडबंगाल आहे ?

**काळा पैसा ही खरच काय भानगड आहे ?**

ज्या देशात श्रमाची लूट कायदेशीर असते, जिथं भांडवलदाराना कायदेशीर सूट असते की कष्टकऱ्याच्या रक्ताघामाची पिळवणूक करून आपल्या तिजोऱ्या भरता येईल, तिथ बेकायदेशीर काळा पैसा तर निर्माण होणारच. आज देशाच्या १० टक्के लोकांकडे ९० टक्के संपत्ती आहे आणि त्यातील अर्धी सम्पत्ती फक्त १ टक्का लोकांकडे आहे. हे सगळं श्रमाच्या आणि निसर्गाच्या अतिव लूटीतूनच शक्य आहे. मोदी सरकार सत्तेवर आल्यापासून याच्यात अतिशय वाढ झालीय.

काळा पैसा फक्त उश्यात, बॅगांमध्ये वा जमिनीत पुरुन ठेवला जात नाही. सत्य हे आहे की काळ्या धनापैकी फक्त ६ टक्के हिस्सा नगदी रूपात आहे. आज काळ्याधनाचा सर्वात मोठा हिस्सा मुख्यतः रियल इस्टेट, विदेशातील धन आणि सोन्याच्या खरेदीत लागतो.

काळा पैसासुध्दा पांढऱ्या पैश्यासारखा बाजारात फिरत असतो आणि त्याचा मालक त्याला अजून वाढविण्यासाठी धडपडत असतो. आज पैशाच्या रूपात जे काळधन आहे ते एकूण काळ्या धनाचा खूप छोटा हिस्सा आहे आणि तोही लोकांच्या घरात नाही तर बाजारात लावलेला आहे. आज देशातील काळ्या धनाचा मोठा हिस्सा बँकांच्या माध्यमातून पनामा, स्विस आणि सिंगापूर च्या बँकेत पोहचला आहे. आज खरा भ्रष्टाचार श्रमाच्या लुटीशिवाय सरकारद्वारे जमिनी व नैसर्गिक संपत्ती चवली पावलीला भांडवलदाराना विकून केला जातो आहे. सोबतच बड्या कंपन्यांच्या कमी अथवा जास्त किमतीच्या खोट्या बिलातून, बँकांची कर्ज बुडवून आणि नंतर तिला नान परफार्मिंग संपत्ती घोषित करून आणि त्याची भरपाई नंतर जनतेच्या खिशातून करून, बॅड लोनची माफी आणि त्याचीही भरपाई जनतेच्या पैशातून करून केली जाते. मोठ्या भ्रष्टाचाराचे स्वरूप असे आहे, व त्याया कायद्याचा मुलामा चढवलेला असतो. भांडवलदारांनी हडप केलेला हा पैसा विदेशातील बँकांत जमा होतो आणि तिथून तो देशी विदेशी बाजारात लावला जातो. वस्तुतः याच्यातला एक हिस्सा छोट्या व्यापाऱ्यांना व अधिकाऱ्यांनाही जातो पण तो या एकूण काळ्याधनाच्या प्रमाणात खूप छोटा आहे.

मे २०१४ मध्ये सत्तेत आल्यावर जून २०१४ मध्येच परदेशात पाठवल्या जाणाऱ्या पैशावर असलेली ७५ हजार डालर प्रतिव्यक्ती मर्यादा वाढवून १ लाख २५ हजार डालर करण्यात आली, तेव्हाच मोदी सरकारच्या काळ्या पैशावरच्या नाटकाचे पितळ उघडे पडले होते. आज ही मर्यादा २ लाख ५० हजार डालर इतकी आहे. गेल्या ११ महिन्यांमध्ये ३० हजार कोटी रूपये एवढी संपत्ती परदेशात गेली आहे. परदेशातून काळा पैसा परत आणण्याची आणि दोन दिवसात काळा पैसावाल्यांना तुरुंगात पाठवण्याची डरकाळी फोडणाऱ्या मोदी सरकारने गेल्या दोन वर्षांमध्ये एकालाही तुरुंगाचा रस्ता दाखवलेला नाही. कारण या यादीमध्ये मोदींच्या आवडत्या अंबानी, अदानीपासून अमित शाह, स्मृती इरानी आणि भाजपच्या कित्येक नेत्यांची नावे आहेत. उठता बसता लष्कराचे नाव घ्यायचे आणि दुसरीकडे सैन्यासाठीच्या शवपेट्यांच्या खरेदीतही घोटाळा करायचा. असल्या तथाकथित देशभक्तांना आपण ओळखत नाही का?मध्य प्रदेशमधील व्यापम घोटाळा, पंकजा मुंडे आणि वसुंधरा राजेंचा घोटाळा आपण विसरलो आहोत का? विजय मल्या आणि ललित मोदींसारखे चोर हजारो कोटींच्या संपत्तीसह परदेशात जाऊन बसले ते याच सरकारच्या काळात. आज देशातील ९९ टक्के काळा पैसा याच रूपात आहे आणि त्यात देशातील नेते, मंत्री आणि भांडवलदारांचाच वाटा आहे, हे आपल्याला माहीत आहेच.




दुसरी गोष्ट म्हणजे आज देशातील एकूण ५०० आणि १००० च्या नोटांचे मूल्य १४.१८ लाख कोटी इतके आहे. हा एकूण काळ्या पैशाच्या फक्त ३ टक्के इतकाच आहे. सरकारी संस्था, राष्ट्रीय सांख्यिकीय संस्थेच्या अनुसार यापैकी नकली नोटांचा वाटा फक्त ४०० कोटी इतकाच आहे. देशातील ५०० आणि १००० च्या नोटांचा अर्धा हिस्सा हा काळा पैसा आहे, असे मानले (प्रत्यक्षात तसे नाही) तरीसुद्धा दीड टक्क्याहून जास्त काळ्या पैशाला चाप बसणार नाही. दुसरीकडे ज्या पाकिस्तानी नकली नोटांबद्दल थयथयाट करून मोदी सरकार लोकांची दिशाभूल करीत आहे त्या फक्त ४०० कोटींच्या आहेत. म्हणजेच अर्धा टक्कासुद्धा नाहीत. दुसरे म्हणजे सरकारने २००० रुपयांच्या नव्या नोटा जारी केल्या आहेत. म्हणजेच येत्या काळात भ्रष्टाचार आणि काळा पैसा १००० रुपयांच्या तुलनेत आणखी वाढणार आहे. आताच तमिलनाडूमध्ये निवडणूक आयोगाने ७ कोटी रूपयांच्या नव्या २००० च्या नोटा जप्त केल्या आहेत, हा त्याचाच पुरावा. यापूर्वी १९४६ आणि १९७८ साली नोटा बदलण्याचा निर्णय झाला होता, परंतु सामान्य जनतेची अशी होरपळ झाली नव्हती. त्यामुळेच मोदी सरकारचा हा निर्णय म्हणजे लोकांना टोपी घालण्याचा प्रयत्न आहे, हे कळू शकते. हाच भाजप २०१४ साली नोटबंदीच्या विरोधात गळा काढत होता. आज देशातील छोटे व्यापारी, अधिकारीसुद्धा काळ्या पैशाचा बहुतेक वाटा जमीन, रियल इस्टेट, सोने आणि शेअर्समध्ये गुंतवतात.

**मग मोदी सरकारने हा निर्णय कशासाठी घेतलाय?**

जनतेला दिलेली खोटी आश्वासने, भयंकर महागाई, अभूतपूर्व बेरोजगारी आणि शेतकरी-कामगार समुदायाची लूट, दमन आणि दलित-अल्पसंख्याकांवरील हल्ले व आपल्या फॅसिस्ट धोरणांमुळे मोदी सरकारने आपली लोकप्रियता गमावलेली आहे. म्हणूनच नोटबंदी करून काळ्या पैशावर आपण हल्ला चढवल्याचे नाटक करून सरकार आपली देशभक्ती सिद्ध करून थोडे बळ गोळा करू पाहते आहे. उत्तर प्रदेश व अन्य ठिकाणच्या निवडणुकांच्या तोंडावर पुन्हा एकदा खोटा प्रचार करून सरकार लोकांच्या डोळ्यांत धूळफेक करीत आहे. वेगवेगळ्या बातम्या आणि तथ्यांवरून असे दिसून आले आहे की भाजपाने आपल्या खात्यांमध्ये पैसे जमा केले होते. उदाहरणादाखल, नोटबंदीच्या घोषणेच्या दिवशीच, घोषणा होण्याच्या काही तास आधी पश्चिम बंगाल भाजपने आपल्या खात्यामध्ये एक कोटी रुपये जमा केले. त्यामुळे पैशाच्या बळावर निवडणुका जिंकण्याच्या या काळात त्यांनी आपली बाजू बळकट करून घेतली आहे. तिसरी आणि सगळ्यात महत्त्वपूर्ण बाब ही आहे की देशातील मंदीच्या काळात आणि भांडवलदारांनी बँकांची कर्जे बुडवल्यानंतर जनतेच्या घामाची जी कमाई आता बँक खात्यांमध्ये जमा होणार आहे, त्यातून या भांडवलदारांना पुन्हा नफा कमावण्यासाठी कर्जे वाटली जाऊ शकतात. भांडवलदारांनी मोठमोठी कर्जे बँकांकडून घेतली आहेत आणि त्यांची परतफेड केलेली नाही. आज सार्वजनिक क्षेत्रातील बँका ६ लाख कोटी रुपयांच्या भयंकर कमतरतेला तोंड देत आहेत. भांडवलदारांना पुन्हा कर्ज हवे आहे आणि सरकार आता लोकांच्या पैशांवर दरोडा घालून बँकांची भर करते आहे. त्यातून पुन्हा कर्जे दिली जातील. पैकी १,२५००० कोटी रिलायन्सला आणि १,०३,००० कोटी वेदांता ग्रुपला देण्यात येणार आहेत. या रांगेत आणखीही बरेच मोठे भांडवलदार आहेत.

ही नोटबंदी जनतेला काय देणार आहे? मोदी सरकारने केलेली नोटबंदी म्हणजे जनतेची आणखी एक फसवणूक आहे. आणखी एक कारस्थान. आणखी थोडी लूट. दुसरे काहीच नाही. बाजारू फासीवादी प्रचारतंत्राला बळी न पडता, विचार करा. बँका आणि एटीएमसमोर लांबच्या लांब रांगांमध्ये कोण उभे आहे? टाटा, अंबानी, अदानी, बिर्ला आहेत? मोदी किंवा अमित शहा आहेत? की कोणी मोठा अधिकारी आहे? तर मग देशातील सगळा काळा पैसा पाच-पंधरा हजार रुपये कमावणाऱ्या मोलमजुरांपाशी आणि सामान्य जनतेपाशी आहे का? पूर्व उत्तर प्रदेशमध्ये हातात दोन हजार रुपये पकडून एका महिलेने बँकसमोर जीव गमावला, महाराष्ट्रात एक गरीब पैशांसाठी बँकेत गेला व पैसे परत न मिळाल्याच्या धक्क्याने मेला, रात्री उशीरापर्यंत काम करून परत जाताना आठ बँक कर्मचारी अपघातात मारले गेले. अशाच प्रकारे अनेकांनी आपले जीव गमावले आहेत. काळ्या पैशासाठी त्यांचीच आहुती द्यायची होती का? रिक्शा चालवणारी, मोलमजुरी करणारी, लहानसहान नोकरी करणारी माणसे बँकांसमोर रांगा लावून उभी आहेत. अनेकांचे बँक खाते नाही, ओळखपत्र नाही. लोकांकडे दैनंदिन कामांसाठी पैसे नाहीत, रेशनचे पैसे नाहीत. दलालांची दिवाळी सुरु आहे. अफवांचा बाजार गरम आहे. कुठे मीठ भरमसाठ दराने विकले जात आहे, तर कुठे ५०० च्या नोटा ४०० वा ३०० रुपयाला विकल्या जात आहेत. देशभरात हीच स्थिती आहे. ज्या कोट्यावधी गोरगरिबांनी अडीअडचणीसाठी पैसे जमवले होते त्यांची घामाची कमाई बघता बघता कागदाच्या चिटोऱ्यात बदलताना बघावी लागते आहे. कुणाच्या मुलीचे लग्न आहे, कुणी इस्पितळात अडकला आहे. एक महिला प्रेतासमोर अंत्यसंस्कारांसाठी पैसे नसल्यामुळे धाय मोकलून रडते आहे. आजसुद्धा देशातली मोठ्या लोकसंख्येपाशी बँक खात्याची सोय नाही. ते कष्ट करून दोन वेळची भाकरी कमावतात आणि त्यातून थोडे पैसे अडीअडचणीसाठी जमा करून ठेवतात. त्यांनी आज काय करावे? देशाचा आणि काळ्या पैशाचा प्रश्न आहे, असे म्हणून आपण सगळे अत्याचार मुकाट सहन करायचे का,?नव्या नोटा छापण्यासाठी जो १५००० कोटी रुपये खर्च येणार आहे, तो जनतेच्या कमाईतूनच वसूल केला जाणार आहे.

आपण या थापाड्यांचे सत्यस्वरूप ओळखले पाहिजे. आज भामटे आणि खोटारडे मोदी सरकार जनतेच्या व्यापक हिश्शाला रोजगार, शिक्षण आणि आरोग्य या मूलभूत सोयी पुरवण्यातही अयशस्वी ठरले आहे. सरकारच्या अच्छे दिनचे पितळ उघडे पडले आहे. म्हणूनच ५०० आणि १००० च्या नोटा बंद करून एका जनताविरोधी कार्यवाहीद्वारे काळा पैसा नाहीसा करण्याचे नाटक केले जात आहे. जनतेची व्यापक एकता हेच याला उत्तर ठरू शकते.

• संपादक मंडळ – नारायण खराडे, सत्यनारायण • संपादकीय कार्यालय- रूम नंबर १०३, बिल्डिंग नंबर ६१, लल्लुभाई कम्पाउण्ड, मानखुर्द (वेस्ट) मुंबई ४०००४३
मो. नं. ९७६४५९४०५७, ९६१९०३९७९३ • संकल्प प्रिंटर्स, जी-१, द्रोणगिरी कॉ. ऑ. सोसायटी, साईनाथ नगर, ठाणे फोन न. ०९०२९९१६५०५ कडून मुद्रित